मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

मुंबई/ पालघर | शनिवार, २६ जुलै २०२५ | वर्ष- ३० | अंक-३६ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



## निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नाही !



**अमरावती :** सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले भूषण गवई यांनी निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नसल्याचे म्हटले आहे. मी निवृत्तीनंतर जास्तीत जास्त वेळ दारापूर, अमरावती आणि नागपुरात या आपल्या मूळ गावी घालवणार असल्याचे गवई यांनी म्हटले आहे. सरन्यायाधीश झाल्यानंतर प्रथमच भूषण गवई हे त्यांच्या मूळ गाव असलेल्या दारापुरात पोहोचले होते. यावेळी ते गावकऱ्यांशी बोलत होते. सविस्तर वृत्त पान 6



# मुख्यमंत्र्यांच्या राजधानीत गाठीभेटी...

प्रतिनिधी
■ नवी दिल्ली

राज्यातील विविध विकास प्रकल्पांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेले दोन दिवस दिल्लीत अनेक नेत्यांच्या भेटी घेतल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर तसेच नीती आयोगाशी या बैठका झाल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची संसद भवनात सदिच्छा भेट घेतली. महाराष्ट्राशी संबंधित विविध प्रकल्पांवर तसेच विषयांवर त्यांनी चर्चा केली. सुमारे 25 मिनिटे ही बैठक चालली. मुख्यमंत्र्यांनी संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांचीही सदिच्छा भेट घेतली आणि विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा केली. केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर आणि हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांचीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत सदिच्छा भेट घेतली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली आणि त्यात जागतिक वित्तीय संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी केंद्रीय आर्थिक व्यवहार मंत्रालयाकडून परवानगी देण्याची मागणी केली. महाराष्ट्राने आपली अर्थव्यवस्था सर्व निकषांवर उत्तम राखल्याबद्दल सीतारामन यांनी यावेळी प्रशंसा केली.

या प्रकल्पांमध्ये 1000 लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडण्यासाठीचा प्रकल्प आहे. यासाठी आशियाई डेव्हलपमेंट बँकेकडून 1 अब्ज डॉलर्स (सुमारे 8651 कोटी रुपये) इतके आर्थिक सहाय्य मागण्यात आले आहे. दुसरा प्रकल्प महाराष्ट्रातील समुद्रकिनाऱ्याची पातळी वाढत असल्याने त्याचे नैसर्गिक उपायांनी निराकरण करणे हा आहे. यासाठी 500 मिलियन डॉलर्स (सुमारे 4326 कोटी रुपये) इतकी मदत मागण्यात आली आहे. तिसरा प्रकल्प महापालिका शहरांमधून सांडपाण्यावर प्रक्रिया करुन उद्योगांसाठी पुनर्वापर हा आहे. यासाठी 500 मिलियन डॉलर्सचे (सुमारे 4326 कोटी रुपये) अर्थसहाय्य मागण्यात आले आहे. उर्वरित दोन प्रकल्पांसाठी पान 8 वर

## विदर्भात पावसाचा जोर, मराठवाड्यात पावसाची प्रतिक्षा

# मुंबईत पावसाची संततधार

प्रतिनिधी
■ मुंबई

काल गुरीवारी हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट दिला होता. श्रावण महिन्याचा पहिलाच दिवस पावसाने गाजवला. शहर भागापेक्षा उपनगरात जास्त पाऊस पडला. मुंबईत सुरू असलेल्या सततच्या पावसाच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेची सर्व यंत्रणा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर कार्यरत होती. महानगरपालिकेचे तब्बल १० हजाराहून अधिक अधिकारी व कर्मचारी वर्ग विविध ठिकाणी उपस्थित आहे. राज्यात विदर्भात पावसाचा वाढत जोर असून मराठवाड्याला मात्र पावसाची मोठी प्रतीक्षा आहे.

मुंबईतील अंधेरी, जुहू, कुर्ला, घाटकोपर, सायन, चुनाभट्टी, चेंबूर आदी सखल भागात कमी, अधिक प्रमाणात पाणी साचले होते. मध्य रेल्वे मार्गावरील विद्याविहार ते सायन रेल्वे स्थानक दरम्यान येथे रेल्वे रूळावर काही प्रमाणात पाणी साचले होते. तसेच, अंधेरी सब वे मध्ये देखील पावसाचे पाणी साचले होते. या पावसामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवर एकूणच मुंबईकरांच्या जनजीवनावर काहीसा परिणाम झाला. सुदैवाने समुद्रात मोठी भरती असताना जोरदार ते अति जोरदार पाऊस पडला नाही. अन्यथा शहर व उपनगरात सखल भागात जास्त प्रमाणात पावसाचे पाणी साचले असते. त्याचा मुंबईकरांना मोठा फटका बसला असता. दरम्यान, काल सकाळी ८.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत मुंबई शहर भागापेक्षा उपनगर भागात जास्त पाऊस पडला. पान 8 वर

## सखल भागात साचले पाणी



### सहा जिल्ह्यांसह पुणे-सातारा घाट परिसरात रेड अलर्ट

राज्यात पुढील २४ तासासाठी रायगड, रत्नागिरी, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या सहा जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट परिसरात रेड अलर्ट देण्यात आला असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रामार्फत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना दि.२५ जुलै २०२५ सायंकाळी ५.३९ ते दि. २७ जुलै २०२५ रात्रौ ८.३० पर्यंत ४.१ ते ४.८ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशारा देण्यात आला असून जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी इशारा पातळी ओलांडली असून नागरीकांना सतर्कतेचा सूचना देण्यात आल्या आहेत. पवना धरण ८२.२१% भरले असून पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू आहे पवना धरणातून १६०० क्युसेक्स पाणी नदीपात्रात सोडले जाऊ शकते त्या अनुषंगाने नागरिकांना सूचित करण्यात आले आहे.

# मुंडेंना मंत्रीपद देऊ !

## अजित पवारांचे स्पष्ट संकेत




प्रतिनिधी
■ मुंबई

राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर आली आहे, कृषी विभागाच्या आरोपांवर धनंजय मुंडे यांना न्यायालयानं क्लिनचिट दिल्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा त्यांना मंत्रिपदी संधी देणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. कराड प्रकरणातून मुंडेंना क्लिनचीट मिळाल्यानंतर त्या प्रकरणाशी त्यांचा संबंध नसल्याचं सिद्ध झाल्यानंतर आम्ही त्यांना पुन्हा मंत्रिपद देऊ, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे.

धनंजय मुंडेंच्या बाबतीमध्ये तुम्ही पेपरला वाचलं, त्यांच्यावर कृषी विभागाचे जे आरोप झाले त्यावर न्यायालयानं काय सांगितलं? त्यांना त्या प्रकरणात क्लिनचिट देण्यात आली, त्या प्रकरणात त्यांचा कुठेही दोष नाहीय, आता अजून त्यांच्या संदर्भातील एक गोष्ट आहे, त्यावर देखील पोलीस यंत्रणा त्यांच्या पद्धतीनं कारवाई करत आहे, या प्रकरणात जर त्यांना क्लिनचिट मिळाली तर आम्ही त्यांना पुन्हा मंत्रिपद देऊ, असं अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली, देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यभरात संतापाची लाट होती. या प्रकरणात वाल्मिक कराडचं नाव समोर आलं, त्याला संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात अटक करण्यात आली आहे. कराड हा धनंजय मुंडे यांच्या जवळचा कार्यकर्ता असल्यामुळे विरोधकांकडून सातत्यानं धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत होती. अखेर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला, प्रकृतीच्या कारणांमुळे आपण मंत्रिपदाचा राजीनामा देत आहोत, असं त्यावेळी त्यांनी म्हटलं होतं. मात्र आता पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे, तसे संकेत अजित पवार यांनी दिले आहेत.

## 'सामाजिक न्याय'च्या बैठका परस्पर घेतल्याने शिरसाट नाराज



**जळगाव:** भाजप, एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील महायुती सरकारमध्ये सर्व काही आलबेल आहे का असा प्रश्न उपस्थित होत आहे. याच कारण शिवसेना नेते आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी भाजप नेत्या सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना लिहिलेलं पत्र आहे.

**राज्यमंत्री मिसाळ यांना खरमरीत पत्र**

महायुतीतील मंत्र्यांमध्ये विभागीय कामकाजावरून जुंपल्याचं पाहायला मिळतंय. सामाजिक न्याय विभागातील कामकाजासंदर्भातील बैठका राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी परस्पर घेतल्याच्या आरोपावरुन संजय शिरसाट यांनी एक खरमरीत पत्र लिहिलं आहे. सामाजिक न्याय विभागातील कामकाजाच्या बैठका राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी परस्पर घेतल्याच्या आरोपावरून याच खात्याचे कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट नाराज झाल्याचं कळतंय. नाराज मंत्री संजय शिरसाट यांनी थेट राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना पत्र लिहून आपल्या विभागातील बैठक घ्यायची झाल्यास, बैठक माझ्या अध्यक्षतेखाली घ्यावी असे पत्र लिहिलं आहे. सामाजिक न्याय विभागातील कामकाज मंत्री आणि राज्यमंत्री यांच्याच वाटप झाले असताना आमदारांच्या पत्रावरून मिसाळ यांनी काही बैठका लावत अधिकारी आणि कर्मचारी यांना विविध निर्देश दिले होते, मात्र याबाबत शिरसाट यांना कल्पना नव्हती. या बैठकांची माहिती शिरसाट यांना मिळाल्यानंतर शिरसाट यांनी थेट राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना पत्र लिहून नाराजी व्यक्त केली आहे.

# दारु विक्री करणाऱ्या ट्रकवर भाजपच्या राज्यमंत्र्याचं नाव

प्रतिनिधी
■ पुणे

हडपसर येथून नागपुरकडे निघालेल्या दारु विक्री करणाऱ्या एका अवैध ट्रकवर राज्यमंत्री मेघनादिदी साकोरे-बोर्डीकर असं नाव ठळक अक्षरात लिहिण्यात आले आहे. हा ट्रक पोलिसांनी जप्त केला आहे. ट्रकवर भाजप आमदार आणि राज्यमंत्र्याचं नाव असल्याचे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

मेघना बोर्डीकर या परभणी जिल्ह्यातील जिंतूरच्या भाजप आमदार आणि राज्यमंत्री आहेत. त्यांचं नाव लिहिलेल्या ट्रकमधून दारूची अवैध विक्री करण्यात येत असल्याचे आढळले आहे. या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली आहे. पुसद पोलिसांनी ही कारवाई केली आहे. 40 लाख 23 हजार रुपयांची दारू, ट्रक, सात मोबाईल, तीन दुचाकी असा एकूण 64 लाख 72 हजार रुपयांचा मुद्देमाल पुसद पोलिसांनी जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेला ट्रक हा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या चुलतभावाच्या मालकीचा असल्याचे प्राथमिक तपासात पोलिसांना आढळले आहे.



मनीष ईश्वरू सुरुळे (१९, रा. वाडी नामदार, ता. पैठण, जिल्हा संभाजीनगर, हल्ली मुक्काम कारेगाव, पुणे), राजेश्वर मधुकर पवार (२३), सचिन उद्दल चव्हाण (२३), सचिन सावन चव्हाण (२४), गोकुळ बाबूसिंग चव्हाण (२३), विक्रम बळीराम जाधव (२०) सर्व रा. तुळशीनगर ता. महागाव आणि प्रवीण दत्ताजी जोहरे (३०), रा. वाई गौळ, ता. मानोरा, जि. वाशीम यांना पुसद पोलिसांना ताब्यात घेतले आहे.

# राज्यातील कंत्राटदारांचे 'कामबंद'

## थकीत देणी मिळेपर्यंत काम न करण्याचा निर्णय

प्रतिनिधी
■ सांगली

कंत्राटदार हर्षल पाटील याच्या आत्महत्येनंतर सरकारच्या अडचणीत आता वाढ होणार आहे. कारण राज्यातील कंत्राटदार आक्रमक झाले असुन कंत्राटदारांची थकीत बिले जोपर्यंत मिळत नाही. तोपर्यंत काम बंद करण्याचा निर्णय कंत्राटदारांच्या बैठकीत घेण्यात आला आहे. यामुळे आता राज्यातील सर्व कंत्राटदारांनी आपले कामबंद आंदोलन सुरु केले आहे.

सांगली जिल्ह्यातील कंत्राटदार हर्षल पाटीलने आत्महत्या केल्याची घटना घडल्याने राज्यभरातील कंत्राटदार एकवटले असून आंदोलन छेडले आहे. दरम्यान हर्षल पाटील याला श्रद्धांजली वाहण्यासाठी सांगलीमध्ये कंत्राटदार संघटनांच्यावतीने सभेचे आयोजन करण्यात आलं होते. या वेळी पार पडलेल्या बैठकीमध्ये राज्यातील हजारो कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची बिले थकविल्याप्रकरणी चर्चा करण्यात आली. दरम्यान शासनाकडून कोट्यवधींची बिले थकित असून राज्यभर परिस्थिती गंभीर असल्याने जोपर्यंत थकीत बिले दिली जात नाहीत, तोपर्यंत राज्यातील सर्व कामे बंद करण्याचा निर्णय सांगलीतील अभियंता आणि कंत्राटदार संघटनेच्या बैठकीत घेण्यात आला आहे. अर्थात राज्यातील सर्व कंत्राटदार बिल मिळेपर्यंत काम बंद ठेवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.



हर्षल पाटील या तरुण कंत्राटदाराने शासनाकडे बिल थकीत असल्यामुळे आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. यानंतर जालना जिल्ह्यातील कंत्राटदारांची देखील शासनाकडे ४०० कोटीपेक्षा अधिक बिले थकीत असून शासनाने लवकरात लवकर बिल न दिल्यास जिल्ह्यातील कंत्राटदार १५ ऑगस्टला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहन आंदोलन करणार असल्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने अमर्यादित निविदा काढून निवडणूक जिंकली. हे स्वतः गुहाटीला जाऊ शकतात. मात्र छोट्या कंत्राटदाराला शासन पैसे देत नाही. महाराष्ट्र शासन तरुणाईला संपायला निघाले आहे. असा संताप देखील व्यक्त केला आहे.

# शारीरिक संबंधासाठी सहमतीचं वय १८ वर्षेच

## केंद्राचं सर्वोच्च न्यायालयात स्पष्टीकरण

■ नवी दिल्ली

सुप्रीम कोर्टात सुनावणी दरम्यान केंद्र सरकारने ठामपणे सांगितले की भारतात लैंगिक सहमतीची वयोमर्यादा 18 वर्षांहून कमी केली जाऊ नये. सरकारने दिलेल्या सादरीकरणात सांगितले की, अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण थांबवण्यासाठी 18 वर्षे वयोमर्यादा अनिवार्य आहे, आणि याला कदापि कमी करणे मुलांच्या संरक्षण कायद्यांसाठी धोकादायक ठरू शकते.



अल्पवयीन मुलांचे संरक्षण करणाऱ्या कायद्यांमध्ये कोणताही बदल मुलांच्या शोषणाला वाव देणारा ठरेल. या मुद्याचा विचार करताना, सरकारने न्यायालयाला मुलांच्या कायदेशीर सुरक्षिततेची गांभीर्याने दखल घ्यायला सांगितले. केंद्र सरकारने सांगितले की, 18 वर्षे वयाच्या खाली असलेल्या व्यक्तीला लैंगिक सहमती देण्याची क्षमता असणे शक्य नाही. त्याच्या मते, मुलांची पान 8 वर

# मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील वाहतूक ठप्प; बोरघाटात कोसळली दरड

प्रतिनिधी
■ लोणावळा

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर बोरघाटात दरड कोसळल्याची घटना घडली. यामुळे खोपोलीजवळ वाहतूक ठप्प झाली. रस्त्यावरील मलबा बाजूला करण्याचं काम रात्रीपर्यंत सुरु होतं.

मागच्या आठवड्याभरापासून दडी मारलेल्या पावसाने पुन्हा हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. दोन दिवसांपासून पुण्यासह मुंबई परिसरात वरुणराजा बरसत आहे. पावसामुळे घाटरस्त्यांवर दरड कोसळण्याच्या घटना कायमच घडत असतात.



शुक्रवारी सायंकाळच्या दरम्यान मुंबई-पुणे रस्त्यावर खोपोलीजवळ बोरघाटामध्ये दरड कोसळली. रस्त्यावर मलबा साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. विशेषतः मुंबईकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली. त्यामुळे या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी काळजी घेणं गरजेचं आहे.

## श्रावणचा पहिल्या दिवशीच त्र्यंबकेश्वर मंदिरात पासचा काळाबाजार

### 5 जणांना अटक



प्रतिनिधी
■ नाशिक

दोन दिवसानंतर श्रावणातील पहिला सोमवार आहे. श्रावण महिन्यात भाविक शिवमंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. त्यातच, त्र्यंबकेश्वर मंदिराच्या दर्शनसाठी दिल्या जाणाऱ्या पासेसमध्ये काळाबाजार होत असल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी पोलिसांनी 5 जणांच्या टोळीला अटक केली आहे.

देवस्थान ट्रस्टच्या वेबसाईटवरून तिकीट बुक करून भाविकांना जादा किमतीने विक्री करणारे रॅकेट कार्यरत असल्याचं पोलीस तपासात उघडकीस आले. या टोळीकडून 200 रुपये किंमतीचा पास 800 ते 1000 रुपयांना विक्री होत असल्याचे पोलीस तपासात समोर आलं आहे. त्र्यंबकेश्वरच्या दर्शनासाठी दररोज साधारणपणे 20 हजार भाविक येतात, त्यापैकी 5 हजार भाविकांना 200 रुपये शुल्क आकारुन देणगी दर्शन दिले जाते. त्यापैकी 3 हजार भाविकांना मंदिराच्या उत्तर दरवाजा जवळून देणगी दर्शनाचे पास दिले जातात, तर 2 हजार भाविकांना ऑनलाइनच्या माध्यमातून पास दिले जातात. याच ऑनलाइन पास विक्रीत घोटाळा झाला आहे.

# पंतप्रधान मोदी म्हणजे मीडियाने फुगवलेला फुगा!

प्रतिनिधी
■ नवी दिल्ली

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. पंतप्रधान मोदी म्हणजे मीडियाने फुगवलेला फुगा आहेत, अशी टीका त्यांनी केली आहे. दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये काँग्रेसच्या एका कार्यक्रमात बोलताना ते असं म्हणाले आहेत.




राहुल गांधी म्हणाले की, नरेंद्र मोदी हे फक्त दिखावा आहेत, त्यांना जास्त महत्त्व देण्यात आले आहे. प्रत्यक्षात असे काहीही नाही. राहुल गांधींनी असाही दावा केला की, पंतप्रधान मोदींना दोन-तीन वेळा भेटल्यानंतर आणि त्यांच्यासोबत एकाच खोलीत बसल्यानंतर त्यांना समजले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्यासाठी कधीही मोठी समस्या नव्हते.

राहुल गांधी पुढे म्हणाले की, माझा वैयक्तिक अनुभव आहे की, त्यांच्यात (पंतप्रधान मोदींमध्ये) हिंमत नाही. हिंदुस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये वंचित आणि उपेक्षित समुदायांचे कमी प्रतिनिधित्व असल्याबद्दलही राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. राहुल गांधी म्हणाले, देशाच्या लोकसंख्येच्या सुमारे 90 टक्के लोक दलित, मागासवर्गीय, आदिवासी आणि अल्पसंख्याक आहेत. पण जेव्हा अर्थसंकल्प तयार झाल्यानंतर हलवा वाटला जात होता, तेव्हा या 90 टक्के लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणारे कोणीही नव्हते. ही 90 टक्के लोकसंख्या ही देशाची उत्पादक शक्ती आहे.

### ओबीसी समाजाने पूर्ण ताकतीने राहुल गांधी यांच्यासोबत उभे राहावे

देश संविधानावर चालवायचा असेल तर मागास ओबीसी समाजाने पूर्ण ताकतीने राहुल गांधी यांच्यासोबत उभे राहावे लागेल. हा देश संविधानाने चालवायचा की मनुस्मृतीने चालवायचा याचा निर्णयाचा तुम्हाला घ्यावा लागणार असल्याचे आवाहन काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे. दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये पक्षाच्या ओबीसी सेलने आयोजित केलेल्या 'भागीदारी न्याय संमेलन'त ते बोलत होते. या वेळी वडेट्टीवार यांनी म्हटले की, सर्वांना देश संविधानावर चालावा असे वाटत असेल तर पूर्ण ताकतीने राहुल गांधी यांच्या सोबत उभे राहावे लागणार आहे. त्याचवेळी हा देश संविधानावर चालेल. त्याच वेळी ओबीसी मागासवर्गीयांचे हक्क शाबूत राहतील.



मुंबई: शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसा निमित्त महाराष्ट्र राज्य शिवसेना शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी सेना व अखिल झावबाववाडी साई सेवा मंडळ यांनी २२१ घरकाम करणाऱ्या महिला व पुरुष यांना महाराष्ट्र राज्याच्या घरेलु कामगार महामंडळ चे विनामूल्य रजिस्ट्रेशन करून सरकारी योजना उपलब्ध करून दिली. या नोंदणीचे कामगारांना सामाजिक सुरक्षा लाभ, आर्थिक सहाय्य, कायद्यांतर्गत संरक्षण अणि इतर सरकारी योजनांसाठी पात्रता. असे फायदे मिळणार आहे. अध्यक्ष शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी संजय पांडुरंग नटे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमा करीता विशेष परिश्रम शेखर शिर्सेकर, मुंबई संघटक व अध्यक्ष, अखिल झावबाववाडी साई सेवा मंडळ यांनी व इतर पदाधिकारी यांनी घेतले



## थोडक्यात

### श्री लोटस डेव्हलपर्स अँण्ड रिॲल्टीचे समभाग विक्रीला

**मुंबई:** श्री लोटस डेव्हलपर्स ॲण्ड रिॲल्टी लिमिटेडने आपल्या पहिल्यावहिल्या प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री कार्यक्रमासाठी (IPO) ₹१/- दर्शनी मूल्य असलेल्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी ₹१४०/- ते ₹१५०/- असा किंमतपट्टा निश्चित केला आहे. या IPO ची सदस्यता बुधवार, ३० जुलै २०२५ रोजी सुरू होईल आणि शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १०० इक्विटी शेअर्स आणि त्यानंतर १०० शेअर्सच्या पटीत अर्ज करू शकतात. पात्र कर्मचाऱ्यांसाठी राखीव कोट्यात ₹१४/- ची सवलत देण्यात आली आहे. श्री लोटस डेव्हलपर्स ॲण्ड रिॲल्टी ही मुंबई, महाराष्ट्रातील निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प विकसित करणारी कंपनी आहे. "Lotus Developers" या ब्रँडअंतर्गत विशेषतः पश्चिम उपनगरांमध्ये अल्ट्रा लक्झरी आणि लक्झरी श्रेणीतील पुनर्विकास प्रकल्पांवर कंपनीचा भर आहे.कंपनी मुख्यतः ₹३ कोटी ते ₹७ कोटी किंमतीच्या २BHK व ३BHK फ्लॅट्स ("लक्झरी रेसिडेन्शियल सेगमेंट") तसेच ₹७ कोटींपेक्षा अधिक किंमतीचे ३BHK, ४BHK आणि पेंटहाऊस यांचा ("अल्ट्रा लक्झरी रेसिडेन्शियल सेगमेंट") विकास करते.

### केटेक्स फॅब्रिक्स चा आयपीओ मंगळवारी खुला होणार

**मुंबई:** कापड, तयार कपडे आणि ॲक्सेसरीजच्या उत्पादनात गुंतलेली डिजिटल टेक्सटाइल प्रिंटिंग कंपनी केटेक्स फॅब्रिक्स लि. तिच्या एसएमई सार्वजनिक ऑफरमधून ६९.८१ कोटी रुपयांपर्यंत निधी उभारण्याची योजना आखत आहे. कंपनीला राष्ट्रीय शेअर बाजाराच्या एसएमई प्लॅटफॉर्म - एनएसई इमर्जवर सार्वजनिक ऑफर सुरू करण्यास मान्यता मिळाली असून सार्वजनिक ऑफर २९ जुलै २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडणार आणि ३१ जुलै रोजी बंद होईल. सॉक्रॅडॅमस कॅपिटल प्रा. लि. ही ऑफरची बुक रनिंग लीड मॅनेजर आहे. अनेक उद्देशांसाठी निधी उभारणे हा या ऑफरचा उद्देश आहे. अमृतसरमध्ये अतिरिक्त गोदाम सुविधेच्या बांधकामाकरिता भांडवली खर्चासाठी २.५६ कोटी रुपये, अमृतसरमध्ये समर्पित विक्री कार्यालय बांधण्यासाठी ३.७३ कोटी रुपये, अमृतसरमधील विद्यमान प्रिंटिंग, डाईंग आणि प्रोसेसिंग युनिटसाठी प्रगत फॅब्रिक प्रोसेसिंग सिस्टम खरेदी करण्यासाठी ५.०१ कोटी रुपये वापरले जाणार आहेत. तसेच ३० कोटी रुपये खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरले जातील. उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट उद्देश आणि इश्यूच्या खर्चासाठी वापरली जाईल. प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याच्या ३८,७८,४०० इक्विटी शेअर्सच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरमध्ये ३१,९९,२०० पर्यंत इक्विटी शेअर्सचा नवीन इश्यू आणि प्रवर्तक संजीव कंधारी आणि अमित कंधारी यांच्याकडून ६,७९,२०० पर्यंत इक्विटी शेअर्सची विक्री ऑफर समाविष्ट आहे.

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# स्वातंत्र्यानंतर 75 वर्षे, पण डुंगीपाडा मूलभूत सुविधांपासून वंचित!

प्रतिनिधी
■ जव्हार

स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली, सरकार योजना घेऊन घरोघरी पोहोचत असल्याचा दावा करते, पण डुंगीपाडा वस्तीला अजूनही कोणत्याही सुविधेचा गंध नाही. जव्हार तालुक्यातील सारसून ग्रामपंचायत हद्दीत येणारी ही डुंगीपाडा वस्ती म्हणजे शासनाच्या दुर्लक्षाचं जिवंत उदाहरण बनली आहे.गावात ११ घरं, लोकसंख्या सुमारे ५०, पण समस्या अनेक. गावात शाळा नाही, त्यामुळे या वस्तीतील ९ विद्यार्थ्यांना दररोज 1 किमी चिखलात पाय उचलत दरड चढून पवनमाळ शाळेत जावं लागतं. पावसाळ्यात तर वाटचाल ही अक्षरशः जीवघेणी होते.पिंपळकडा फाट्यापासून पवनमाळपर्यंतचा रस्ता सुमारे २० वर्षांपूर्वी बनवला, पण त्याची देखभाल कधीच झाली नाही. त्यात डुंगीपाडा पर्यंतचा रस्ताच नाही. त्यामुळे वाहन जाऊ शकत नाही, रेशनची पोती डोक्यावरून नेण्याची वेळ गावकऱ्यांवर येते. दर महिन्याला १० किमी अंतरावरून रेशन आणावं लागतं.डुंगीपाडा ही वस्ती १९५४ पासून अस्तित्वात आहे, मात्र आजपर्यंत तिथे ना रस्ता, ना शाळा, ना आरोग्य सुविधा, ना अंगणवाडी इमारत, ना पाणी, काहीच नाही. शासनाच्या कुठल्याच योजना प्रत्यक्षात दिसत नाहीत. 'आम्हाला फक्त जगण्यासाठी मूलभूत सुविधा हव्यात', एवढंच गावकऱ्यांचं सांगणं आहे.





**डुंगीपाडा ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या:**
- ▶डुंगीपाडा वस्तीपर्यंत पक्का रस्ता तात्काळ तयार व्हावा.
- ▶विद्यार्थ्यांसाठी शालेय वाहनाची सोय किंवा गावातच अवस्थापित शाळा सुरू करावी.
- ▶रेशन वितरण जवळच्याच केंद्रावरून नियमित व्हावे.
- ▶गावात अंगणवाडी इमारत व्हावी.

"सारसून ग्रामपंचायतचा डुंगी पाडा येथील ही वस्तुस्थिती आहे. निवडून आलेल्या पंचायत समिती सदस्य जिल्हा परिषद सदस्य यांनी या पाड्याला कधी भेट दिली नाही. पंचायत समितीचे अधिकारी कर्मचारी यांचेही ह्या वस्ती कडे दुर्लक्ष यामुळे या पाड्याचा विकास कामापासून अजूनही कोसो मैल दूर आहे. याबाबत राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने आम्ही आज जव्हार पंचायत समिती गट विकास अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून शासनाला रस्त्याच्या विकासाबाबत निवेदन देण्यात आले

**- बळवंत गावित, कार्यकर्ता राष्ट्रीय काँग्रेस पार्टी जव्हार**

# वृद्ध,निराधारांची सेवा करणे ईश्वरीय काम आहे - आ. राजेंद्र गावित



प्रतिनिधी
■ पालघर

निराधार आणि वृद्धांची सेवा करणे हे एक महत्त्वाचे ईश्वरीय काम आहे.असे गौरोदगार पालघर विधानसभेचे आमदार राजेंद्र गावित यांनी व्यक्त केले.शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष,पालघर जिल्हा चे वतीने आमदार राजेंद्र गावित यांचा वाढदिवस पालघर शिरगाव येथील आनंदश्रम वृद्धाश्रमात साजरा करण्यात आला.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख ॲड.निलेश राऊत यांच्या माध्यमातून ज्येष्ठांशी संवाद आणि अल्पोपहार चे आयोजन करण्यात आले होते. तसेच वृद्धांचे मनोरंजनासाठी गीते सादर करण्यात आली.यावेळी आश्रमाच्या संचालिका श्रीमती मनिषा कोटक,वसई तालुका प्रमुख कु प्रथमेश बांदेकर, केळवा विभाग प्रमुख दीपेश घरत,पालघर युवासेना उपप्रमुख .वृषभ वारे,सामाजिक कार्यकर्ते .तुषार संखे, डॉ.महम्मद कुर्लागिरी.शुभम पाटील,दर्शन चांबरे, जाधव, राहुल सांबरे, हितेंद्र म्हात्रे,पत्रकार , यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष च्या उपक्रमाचे मान्यवरांनी कौतुक केले.रॉयल फाऊंडेशन ने खाद्य जिन्नस आश्रमा करीता भेट दिली.

**मुंबई:सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, संचालक रमेश श्रीराम खानविलकर यांनी ज्येष्ठ विधीतज्ञ पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांची सदिच्छा भेट घेऊन राष्ट्रपती नियुक्त खासदार पदी नियुक्त झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या आणि सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित आर के लॉ कॉलेजच्या उद्घाटन सभारंभाच्या कार्यक्रमात आमंत्रित केले.**



# मिनी बसेस हलविण्यासाठी लिक्विडेटरला पत्र पाठवले आहे

## 'आणिक डेपो'बाबत बेस्टचा खुलासा

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्टच्या आणिक डेपोत कंत्राटदाराच्या मिनी बस गेल्या अनेक वर्षांपासून उभ्या आहेत. बसच्या प्रसारात असलेली झाडे वाढून त्यात या बस कापल्या असल्याचे दृश्य आता दिसत आहे. त्या संदर्भात सातत्याने बातम्या वृत्तपत्रात येत असतात. कामगार संघटनांचे नेतेही त्या संदर्भात नेहमी बोलत असतात. त्याचा खुलासा आता बेस्ट ने केला आहे.

डिसेंबर २०१९ मध्ये मेसर्स एमपी एंटरप्रायझेसला भाड्याने २७५ मिनी बसेस चालविण्याचे कंत्राट देण्यात आले. कराराच्या पूर्वनिर्धारित अटी आणि शर्तींचे पालन न केल्याबद्दल कंत्राटदाराला अनेक नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र नियमांचे पालन न केल्याने ही बससेवा बंद करण्यात आला असे बेस्टने स्पष्ट केले.

राष्ट्रीय कंपनी कायद्याच्या आदेशानुसार, कंपनीने एप्रिल २०२३ मध्ये कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया (CIRP) मध्ये आपला दावा दाखल केला. ट्रिब्यूनल (एनसीएलटी), मुंबई येथे एक अंतरिम ठराव व्यावसायिक (आयआरपी) देखील नियुक्त करण्यात आला आहे. आणिक डेपोमध्ये उभ्या असलेल्या बसेस त्यांच्या नियंत्रणाखाली आहेत. या बसेसचा लिलाव लिक्विडेटरकडून केला जातो असे कळते. या बसेस हलविण्यासाठी लिक्विडेटरला पत्र पाठवण्यात आले आहे. हे प्रकरण अंतरिम ठराव व्यावसायिकांच्या अधिकारक्षेत्रात असल्याने या बसेस हलवल्या जात नाहीत असा खुलासा बेस्ट च्यावतीने जनसंपर्क अधिकारी सुदाम सावंत यांनी केला आहे.

# नायगाव पूर्व वाहतूक कोंडी आणि खड्ड्यांच्या विळख्यात

## शाळकरी विद्यार्थी, चाकरमानी आणि वाहनचालक त्रस्त

प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्व परिसरात सध्या खड्डे आणि वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांचे अक्षरशः हाल होत असून शाळकरी विद्यार्थी, नोकरदार वर्ग आणि वाहनचालक या दैनंदिन प्रवाशांसाठी हा रस्ता आता एक 'दु:खदायी प्रवास' ठरत आहे. रिक्षा स्टँड ते बापाणे आणि वामन धाबा ते टीवरी रेल्वे फाटकदरम्यानचा रस्ता पूर्णपणे खड्ड्यांनी भरलेला असून, अर्धवट उड्डाणपुलामुळे वाहतूककोंडीने गंभीर रूप घेतले आहे.

दररोज हजारोंच्या संख्येने नागरिक या मार्गावरून प्रवास करतात. पावसामुळे या रस्त्यांवरील खड्डे पाण्याखाली लपून गेले असून त्यामुळे दुचाकीस्वारांसाठी अपघाताचा धोका वाढला आहे. वाहनांच्या रांगाच रांगा, उशीराने पोहोचणारे विद्यार्थी आणि घाम गाळणारा नोकरदार वर्ग अशी परिस्थिती नायगाव पूर्व भागात पाहायला मिळत आहे.सदर मार्गावरील जुचंद्र उड्डाणपुलाचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले आहे.





या अर्धवट कामामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून परिणामी संपूर्ण रस्त्यांवर तासन्तास कोंडी होत आहे. शुक्रवारी तर मुसळधार पावसात अर्धा ते एक तास वाहतूक ठप्प झाली होती.दुसरीकडे, स्थानिक राजकारणी आणि प्रशासन हात झटकत आहेत. एकमेकांवर जबाबदारी ढकलण्यातच धन्यता मानली जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाचं वातावरण आहे. महापालिका प्रशासनाने या गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.या भागातील रस्त्यांची हीच दयनीय अवस्था दरवर्षी पावसाळ्यात पाहायला मिळते. मात्र, तरीही दरवर्षी केवळ डांबरी लेप लावून प्रशासन जबाबदारी झटकते. त्यामुळे नागरिकांचा संयम आता सुटू लागला आहे.

# वसईतील उसगाव, पेल्हार धरण ओव्हरफ्लो; आता प्रतीक्षा सूर्या-धामणी भरण्याची

## वर्षभराच्या पाणीपुरवठ्याची चिंता दूर



प्रतिनिधी
■ वसई

पावसाळ्याच्या सुरुवातीस निराशा दिल्यानंतर आता मुसळधार पावसाने दमदार हजेरी लावत वसई-विरारकरांना मोठा दिलासा दिला आहे. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे वसई-विरार शहराला पाणीपुरवठा करणारी दोन महत्त्वाची धरणे उसगाव व पेल्हार पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाली आहेत. तर सूर्या-धामणी धरण ८२.४६ टक्क्यांपर्यंत भरले असून लवकरच तेही ओसंडून वाहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार सूर्या-धामणी, उसगाव आणि पेल्हार ही तीन धरणे वसई-विरार महापालिकेच्या पाणीपुरवठ्याचा कणा मानली जातात. सूर्या धरणातून दररोज सुमारे २०० एमएलडी पाणी महापालिकेला मिळते, तरएमएमआरडीएच्या नव्या योजनेमुळे अतिरिक्त २०० एमएलडी पाणी पुरवठा शक्य होणार आहे.उसगाव धरणातून २० एमएलडी आणि पेल्हार धरणातून १० एमएलडी पाणीपुरवठा नियमित केला जातो.गेल्या जून व जुलैच्या सुरुवातीला पावसाने फारसा प्रतिसाद दिला नव्हता. परिणामी या धरणांमध्ये पाणीसाठा अत्यंत कमी होता. मात्र, गेल्या चार दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील जलसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. सध्या उसगाव आणि पेल्हार ही धरणे पूर्ण क्षमतेने भरून वाहत असून सूर्या-धामणी धरणदेखील येत्या काही दिवसांत भरून वाहण्याच्या तयारीत आहे.ही स्थिती लक्षात घेता वसई-विरारकरांचा आगामी हिवाळा व उन्हाळा ऋतूसुद्धा सुरळीत पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने निश्चिंत ठरणार आहे. यामुळे पाणीटंचाईचा धोका जवळपास टळला आहे.तसेच, या दमदार पावसामुळे भातलावणीच्या हंगामालाही गती मिळाली असून, जुलै अखेरीस लावणी पूर्ण होण्याची शक्यता कृषी क्षेत्रातून वर्तवली जात आहे.एकूणच, पावसाने दिलेला हा दिलासा वसई-विरारकरांसाठी सुखद अशी 'पावसाची भेट' ठरत आहे.

# स्मार्ट मीटर हटवण्याच्या मागणीसाठी डहाणू महावितरण कार्यालयावर माकपचा धडक मोर्चा

प्रतिनिधी
■ डहाणू

संपूर्ण राज्य भारतील विभागात स्मार्ट मीटरविरोधात उभ्या राहिलेल्या लोकभावनेचा जोरदार विस्फोट आज डहाणू येथे पाहायला मिळाला. भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) व त्यांच्या संलग्न संघटनांच्या वतीने महावितरण कार्यालय डहाणूवर हजारो नागरिकांनी धडक मोर्चा काढला. पावसाच्या जोरदार सरी सुरू असतानाही सकाळी ११ वाजता सुरू झालेला मोर्चा अधिकाधिक तीव्र होत गेला.

"स्मार्ट मीटर हटाव – गरीब शेतकरी, मध्यमवर्गीय वाचवा" या मुख्य घोषणेखाली महावितरण कार्यालयाचा घेराव करत आंदोलकांनी ठिय्या आंदोलन छेडले. यामुळे काही काळासाठी कार्यालयातील कामकाज ठप्प झाले होते. या आंदोलनात जिल्हास्तरीय अधिकारी सुनील भारंबे आणि तालुकास्तरीय अधिकारी गणेश दंडगव्हाळ यांच्यासमोर शिष्टमंडळाने मागण्यांचे निवेदन सादर केले.

मोर्चामध्ये सहभाग घेतलेल्या आमदार कॉ विनोद निकोले यांनी संतप्त स्वरात जनतेशी संवाद साधताना स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, "जर सरकारने वेळेत स्मार्ट मीटर हटवले नाहीत, तर तलासरी, डहाणू, जव्हार तसेच इतर ठिकाना वरून नागरिक स्वतःच्या घरांतील मीटर काढून ते डोक्यावर घेऊन पालघर महावितरण कार्यालयात जमा करतील!"



**मोर्चेकऱ्यांनी पुढील प्रमुख मागण्या मांडल्या:**
- ▶ स्मार्ट मीटरद्वारे अवास्तव, ₹४,००० ते ₹५०,००० पर्यंतचे वाढीव वीज बिल लावणे त्वरित थांबवावे
- ▶ स्मार्ट मीटर कोणावरही सक्तीने लादू नयेत; ज्यांना हवे आहे त्यांनीच ते स्वीकारावेत
- ▶ शेतकऱ्यांना वेळेवर घरपोच वीज बिल मिळावे

स्मार्ट मीटरमुळे जनतेची लूट सुरू आहे, अशा भावना आंदोलकांनी व्यक्त केल्या. वीज बिलांत झालेली प्रचंड वाढ, मिटरची अचूकता संदिग्ध असणे, तसेच महावितरणकडून कोणतीही जनजागृती न करता ही यंत्रणा सक्तीने लादली जाणे, या मुद्द्यांवर रोष व्यक्त करण्यात आला.

अखिल भारतीय किसान सभा राष्ट्रीय अध्यक्ष कॉ. अशोक ढवळे, केंद्रीय कमिटी सदस्य व आमदार कॉ. विनोद निकोले, माकप जिल्हा सचिव कॉ. किरण गहला, जनवादी महिला संघटना राज्य कमिटी सदस्य कॉ. प्राची हातवलीकर, तालुका सेक्रेटरी रडका कलंगडा, महिला संघटना सचिव कॉ. लहानी दौडा, महाराष्ट्र राज्य किसान सभा कार्याध्यक्ष व ठाणे-पालघर जिल्हाध्यक्ष कॉ. चंद्रकांत घोरखाना यांचा आंदोलनामध्ये सक्रीय सहभाग होता

हा मोर्चा ही केवळ एक सुरुवात आहे. जर सरकारने तातडीने योग्य तो निर्णय घेतला नाही, तर हे आंदोलन अधिकच तीव्र होईल असा इशारा आमदार निकोले यांनी दिला. महावितरण प्रशासनाकडून अद्याप ठोस निर्णय आलेला नसला तरी, या तीव्र आंदोलनानंतर सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली आहे.

# आजपासून उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शाखा क्रमांक 177, 200, 201 चे विविध उपक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेना पक्षप्रमुख राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या रविवारच्या वाढदिवसानिमित्त आज शनिवार २६ जुलै ते ३ ऑगस्ट २०२५ पर्यंत शिवसेना सचिव खासदार अनिल भाऊ देसाई, विभाग प्रमुख आमदार महेश सावंत, महिला विभाग संघटिका श्रद्धा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वडाळा विधानसभेमध्ये विविध सामाजिक शैक्षणिक आरोग्य,शिबिर आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवसेना शाखा क्रमांक २०० च्या वतीने वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम, शाखा क्रमांक २०१ वतीने ज्येष्ठ शिवसैनिकांचा सत्कार, शाखा क्रमांक १७७ च्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप, शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात रुग्णांसाठी फळवाटप, त्याचप्रमाणे शिवसेना वडाळा विधानसभा प्रमुख सुरेशभाई कदम यांच्या वतीने, शिवसेना वडाळा विधानसभा क्षेत्रातील, गणेशोत्सवा निमित्त कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांसाठी मोफत बस सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, तसेच दादर स्टेशन हनुमान मंदिर, अलबेला मारुती मंदिर वडाळा , मुन्सिपल लेबर कॅम्प , सदाकांत ढवन उद्यान, भोईवाडा या ठिकाणी लाडू वाटप करण्यात येणार आहे. अशी माहिती सुरेश कदम, विधानसभा संघटक राकेश देशमुख, मुकुंद पड्याळ यांनी दिली.

## पालिकेच्या जाचक अटी मुळे नागरिक त्रस्त

# वीज केबल दोष आणि पाण्याच्या मुख्य पाईपलाईनमधील गळती झाल्यास रस्ते खोदण्याची परवानगी मिळावी - जावेद जुनेजा

प्रतिनिधी
■ मुंबई

या चालू पावसाळयात वीज केबल दोष आणि पाण्याच्या मुख्य पाईपलाईनमधील गळती, हमी कालावधीतील रस्त्यांवरील गॅस पाइपलाइनमधील गळती आणि हमी कालावधीत नसलेल्या रस्त्यांवरील गॅस पाइपलाइनमधील गळती दूर करण्यासाठी खंदकांना परवानगी देण्याबाबत पालिका प्रशासनाने काही सूचना करणारे परिपत्रक २० जून २०२५ रोजी काढले आहे. त्यात स्पष्टपणे तिसऱ्या वर्षापर्यंतच्या हमी कालावधीत असलेल्या रस्त्यांवर खंदकाची परवानगी दिली जाणार नाही. पावसाळयात मुंबईत दूषित पाण्याच्या समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागते. पण पालिकेच्या परिपत्रकामुळे खोदकाम करण्याची परवानगी मिळत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

या संदर्भात काँग्रेचे माजी नगरसेवक जावेद जुनेजा यांनी काल पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र देऊन हमी कालावधीतील व हमी कालावधीत नसलेल्या रस्त्यांवर खोदकाम करण्यासाठी परवानगी मिळावी अशी मागणी केली आहे.मुंबई महानगर पालिकेच्या u/no. MGC/F/9301 Dated 20.06.2025 या खंदक धोरणानुसार नव्याने बनविण्यात आलेल्या रस्त्यांवर DLP रस्त्यांना किमान ३ वर्षे आणि NON DLP रस्त्यांना ३ वर्षाहून अधिक काळ खोदकाम करण्यासाठी परवानगी नाकारण्यात आली आहे. परंतु या रस्त्यांवर विद्युत पुरवठा करणाऱ्या भूमिगत केबल, पाणी पुरवठा करणाऱ्या भूमिगत जल वाहिन्या, या किमान ६० ते ७० वर्षे जुन्या आहेत तसेच भूमिगत गॅस पाईप लाईन्स या असल्याने त्यांची होणारी दुरावस्था व त्यावर करावयास लागणारी डागडुजी याकरीता सदर ठिकाणी खोदकाम करणे गरजेचे असते. सध्या काही विभागात येणारे दुषित पाणी पुरवठा त्यामुळे विभागीय नागरीक होणाऱ्या त्रासामुळे त्रस्त आहेत. त्यामुळे अश्या कामांना परवानगी घेण्णसाठी मुख्य अभियंता (रस्ते व वाहतूक) यांच्याकडे अर्ज केला असता तेथून परवानगी मिळण्यासाठी किमान १५ ते २० दिवसांचा कालावधी जातो. जर विभागात कुठे दुषित पाणी पुरवठा होत असेल तर तेथील नागरीकांना नाहक या १५ ते २० दिवसांच्या कालावधीत दुषित पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. जेथे वीज पुरवठा खंडित झाला असेल तर तेथील नागरीकांना या १५ ते २० दिवसांच्या कालावधीत अंधारात राहावे लागत आहे. अश्या समस्या नजरेसमोर ठेऊन जसे पूर्वी या NON DLP रस्त्यांवर खोदकामासाठी विभागीय आयुक्त यांना परवानगी देण्याचे अधिकार होते तसे अधिकार भविष्यात त्यांना देण्यात यावे. तसेच मुंबई महानगर पालिकेच्या u/no. MGC/F/9301 Dated 20.06.2023 या खंदक धोरणामध्ये NON DLP रस्त्यांवर खोदकाम करण्यासाठी लावण्यात आलेली अट शिथिल करावी तसेच या सिमेंट कॉन्क्रेटीकरण केलेल्या रस्त्यावर भूमिगत जुन्या झालेल्या पाण्याच्या जलवाहिन्या दुरुस्ती करण्यासाठी किंवा बदलण्यासाठी किंवा विद्युत पुरवठा केबल दुरुस्ती असो किंवा विद्युत प्रवाह करणाऱ्या ज्या जुन्या झाल्या आहेत त्या बदलून उच्च दर्ज्याच्या केबलु टाकण्यात याव्यात जेणेकरून भविष्यात वारंवार तक्रारी येणार नाहीत अत्यावश्यक सेवेत येणाऱ्या या भूमिगत कामांसाठी परवानगी देताना या सर्व लोकोपयोगी सेवांचा उल्लेख करावा अशी या निवेदनाद्वारे विनंती वजा मागणी जावेद जुनेजा यांनी आयुक्तांना केली आहे.

## पब्लिक नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, गांव मौजे निळेमोरे, तालुका: वसई, जिल्हा : पालघर येथील सी ग्रेप्स टॉवर ई अँण्ड एफ को-ऑप. हौ. सो. लि., बिल्डींग नं. ७. फेज १. सेक्टर ३ मधील फ्लॅट नं. २०४, दुसरा मजला, ई/विंग असा फ्लॅट श्री. राम शंकर खंदारे यांच्या मालकीचा असून ते दिनांक ०६/०४/२०२५ रोजी मयत झालेले आहेत व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांना १. वैशाली राम खंदारे (पत्नी), २. प्राजक्ता चंद्रकांत मोरे (मुलगी), ३. शशांक राम खंदारे (मुलगा) असे वारस आहेत. दिनांक ०३/०६/२०२५ रोजीच्या हक्कसोडपत्राने वैशाली राम खंदारे व प्राजक्ता चंद्रकांत मोरे यांनी सदर फ्लॅटमधील त्यांचा हिस्सा श्री. शशांक राम खंदारे यांना कायमचा सोडून दिलेला आहे त्यामुळे सदर फ्लॅट आता श्री. शशांक राम खंदारे यांचे एकट्यांचे मालकीचा व कब्जेवहिवाटीचा आहे. तरी सदर फ्लॅटवर अगर त्याचे एखाद्या भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा वारसा हक्क, हिस्सा, दावा असल्यास त्यांनी तो निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या १११, कपाडीया हाऊस, गावठण रोड, विरार प. येथील कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून १४ दिवसांचे आंत कळवावा, तसे न केल्यास तशा प्रकारचा कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसबंध नाही असे समजून किंवा कोणाचा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.
कळावे.

दि. २६.०७.२०२५

आपला विश्वासू
आर. टी. पाठक
वकील

Printed and Published by Bhushan B.Mhatre for Owner Marik Media And Communication Pvt .Ltd. at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - Deepak B. Mhatre, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - Sham Deulkar

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty
Issu - 36
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक भूषण भा. म्हात्रे यांनी मालक मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि. साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - दीपक भा. म्हात्रे, E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - शाम देऊळकर

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- तीसावे
अंक - ३६
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

मुंबई: कुर्ली - घोणसरी धरण माजी मुख्यमंत्री नारायणराव राणे यांच्या कार्यकाळात पूर्ण झाले. परंतू त्याचे पाणी पाटबंधारे खात्यातुन कालवा बांधुन अजुन पंचक्रोशीत पोहचलेच नाही. त्यामुळे सिधुंदुर्ग जिल्ह्यातील जमीन ओलिता खाली आली नसल्याने शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. ऊस लागवड, फळबाग व शेतीसाठी पाण्याची कमतरता जाणवत आहे. मंत्री नितेश राणे यांच्या मंत्रीपदाच्या कार्यकाळात (पालकमंत्री) हे काम पूर्ण व्हावे आणि कणकवली-देवगड मतदार संघ सुजलाम सुफलाम व्हावा अशी अपेक्षा वाघेरी ग्रामविकास मंडळ, मुंबई यांनी मंत्री राणे यांची भेट घेऊन केली.



# भाजप स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक स्वबळावर लढणार

## मुंबईसाठी घेणार शिंदे, अजित पवारांची मदत; रवींद्र चव्हाण यांची अमित शहांशी भेट

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यातील सत्ताधारी भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांची आगामी निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केल्याची विश्वसनीय माहिती समोर आली आहे. त्यानुसार भाजप मुंबई वगळता संपूर्ण महाराष्ट्रात स्वबळावर निवडणूक लढवेल. पण मुंबईत एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवारांच्या राष्ट्रवादीची मदत घेईल. भाजपच्या या रणनीतीमुळे महायुतीच्या घटकपक्षांच्या पोटात भीतीचा गोळा उठला आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी गुरूवारी रात्री उशिरा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीत त्यांच्यात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर चर्चा झाल्याची माहिती आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप महाराष्ट्रात स्वबळावर निवडणूक लढवेल. काही दिवसांपूर्वी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसे संकेत दिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती कायम राहील. पण ज्या ठिकाणी युती होणार नाही, त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील, असे ते म्हणाले होते. आता मुंबई वगळता उर्वरित सर्वच ठिकाणी भाजप स्वबळावर निवडणूक लढवेल असे समोर आले आहे.



### 3 टप्प्यांत निवडणूक होण्याची शक्यता

सूत्रांच्या माहितीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ३ टप्प्यांत होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक शेवटच्या टप्प्यात होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोग सध्या वार्डांचे सीमांकन करत आहे. त्यानंतर त्यांचे आरक्षण निश्चित केले जाईल. अखेरीस मतदार यादीवर काम सुरू होईल. त्यामुळे नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यात ही निवडणूक होण्याची शक्यता आहे.

### महायुती मुंबई वगळता सर्वत्र स्वबळ

सूत्रांच्या मते, महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना हे तिन्ही पक्ष मुंबई वगळता सर्वच ठिकाणी स्वबळावर लढताना म्हणजे एकमेकांविरोधात प्रचार करताना दिसून येतील. पण मुंबईत ते एकमेकांना पुरक अशी भूमिका घेऊन मुंबई महापालिका ताब्यात घेण्याचा प्रयत्न करतील. मुंबई हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. पण शिवसेनेतील बंडखोरीनंतर येथील आपले वर्चस्व कायम राखण्यासाठी उद्धव ठाकरे यांना मोठा घाम गाळावा लागणार आहे.मुंबईतील ठाकरे ब्रँड अबाधित राखण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यापुढे मैत्रीचा हात पुढे केला आहे. पण राज यांनी अद्याप त्यावरील आपली भूमिका स्पष्ट केली नाही. त्यामुळे या दोघांच्या आघाडीविषयी अजूनही संभ्रमावस्था आहे. याच संभ्रमावस्थेचा लाभ घेण्याचा महायुतीचा प्रयत्न आहे.

# विमा संस्थांनी जनजागृती, विश्वासार्ह सेवांवर भर द्यावा!

▶ राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे आवाहन
▶ आयबीएआयच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्थापना दिन




प्रतिनिधी
■ मुंबई

विमा हा केवळ आर्थिक उत्पादन नसून तो सामाजिक सुरक्षा, जोखीम व्यवस्थापन आणि आर्थिक स्थैर्य यासाठी अत्यावश्यक साधन आहे. भारतीय विमा ब्रोकर संघटनेसारख्या संस्थांनी नागरिकांना केवळ विमा पॉलिसीची विक्री न करता जनजागृती, सुलभ माहिती आणि विश्वासार्ह सेवा देण्यावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

कफ परेड येथे भारतीय विमा ब्रोकर संघटनेच्या (आयबीएआय) रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्थापना दिन कार्यक्रमात राज्यपाल राधाकृष्णन बोलत होते. भारतीय विमा ब्रोकर संघटनेचे अध्यक्ष नरेंद्रकुमार भरिंदवाल, राज्यपालांचे उपसचिव एस. रामामूर्ती, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणचे सदस्य सत्यजित त्रिपाठी, विमा समितीच्या सदस्या श्रीमती टी.एल. अलामेलू, आयबीएआयचे उपाध्यक्ष मोहन एस, सचिव निर्मल बजाज आदींसह शासकीय व नियामक संस्थांचे वरिष्ठ अधिकारी, विमा व वित्तीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, ही संस्था रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने हा आनंदाचा क्षण आहे. विमा दलाल (ब्रोकर) हे विमाधारक व विमा कंपनी यांच्यातील दुवा आहेत. ते ग्राहक केंद्रित आणि उपयोगी उपाय सूचवितात. भारत देश पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे, त्यामध्ये कॉर्पोरेट विमा सेवांचे महत्व अधोरेखित होते. ते सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राच्या विमा उद्योगातील विस्ताराशीही संबंधित आहेत. हे सर्व राष्ट्रीय प्राधान्याचे विषय असून सुरक्षिततेची व्याप्ती आणि परस्पर सहकार्य विमा क्षेत्रातही महत्वाचे आहे. भारत क्षमतेचा विकास, ज्ञानाचे वाटप, आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार यामध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. विम्याचे भविष्य डेटा उपक्रमांमध्ये, ग्राहकांच्या सूचीबद्धतेमध्ये असल्याने आयबीएआयने यामध्येही सहभागी होवून भविष्यातील अर्थव्यवस्थेचे प्रेरणास्थान बनावे,असेही राज्यपाल राधाकृष्णन यांनी सांगितले.

### विद्यापीठ स्तरावर विमा प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी पुढाकार

युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. राज्यातील विद्यापीठात आयबीएआयसोबत संयुक्तपणे विमा शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्याचा मानस राज्यपाल राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.यावेळी आयबीएआयच्या २५ वर्षांतील स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन, लोगोचे अनावरण झाले. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणचे सदस्य सत्यजित त्रिपाठी, विमा समितीच्या सदस्या श्रीमती टी.एल. अलामेलू यांनीही विचार व्यक्त केले. अध्यक्ष. भरिंदवाल यांनी प्रास्ताविक केले तर आभार निर्मल बजाज यांनी मानले.

# शैफी यांना 'बेस्ट मुस्लिम लीडरशिप 2025' पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार

प्रतिनिधी
■ मुंबई



प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि एम्पल मिशन फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनिल काशी मुरारका यांनी भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे ज्येष्ठ नेते हाजी शकील शैफी यांना बेस्ट मुस्लिम लीडरशिप २०२५' पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार केला. हा सन्मान त्यांना भारत सरकारने अलिकडेच प्रदान केला आहे. हाजी शकील शैफी हे जागतिक शांतता सौहार्दाचे अध्यक्ष आणि सैफी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे सीईओ म्हणूनही काम करत आहेत. याप्रसंगी डॉ. मुरारका यांनी हाजी शैफी यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली. कार्यक्रमादरम्यान डॉ. मुरारका यांनी राष्ट्रीय विकास आणि सांप्रदायिक सौहार्दासाठी शैफी यांच्या समर्पणाचे कौतुक केले. ते म्हणाले की, देशाच्या प्रगतीसाठी आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याला चालना देण्यासाठी सतत कार्यरत असलेले शैफी जी सारखे लोक आजच्या भारतात अत्यंत आवश्यक आहेत.

# धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळातील कृषी विभागाची ती खरेदी नियमानुसारच

## उच्च न्यायालयाचा निर्णय

प्रतिनिधी
■ मुंबई

तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेती पूरक साहित्य खरेदी साठी राबवलेल्या विशेष कृती आराखड्यांतर्गत कृषी साहित्याच्या थेट खरेदी व वितरणाच्या निर्णयास मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरवले असून, यास विरोध करणाऱ्या दोन्ही याचिका फेटाळल्या आहेत.

न्यायालयाने नमूद केले की DBT योजना व विशेष कृती आराखडा यांचा एकमेकांशी संबंध नाही. शासनाने धोरणात्मक निर्णय घेतले असून त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही.

न्यायमूर्ती आलोक आराधे व संदीप व्ही. मर्णे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या भोवती या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात आरोपांची राळ उठवून व्यावसायिक दृष्टिकोन ठेऊन चुकीचे आरोप करण्यात आले होते. मात्र धनंजय मुंडे यांनी राज्य मंत्रिमंडळाची रीतसर मान्यता घेऊनच शेतकऱ्यांच्या हितासाठी हा धोरणात्मक निर्णय घेऊन सदर प्रक्रिया राबवली, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.या प्रकरणी विशेषतः याचिकाकर्ते तुषार पाडगिलवार यांनी न्यायालयीन प्रक्रियांचा गैरवापर करत "फोरम शॉपिंग" केल्याबद्दल ₹1 लाख दंड ठोठावण्यात आला. हा दंड ४ आठवड्यांत हायकोर्ट विधी सेवा प्राधिकरणाकडे भरावा लागेल; अन्यथा संबंधित जिल्हाधिकाऱ्याद्वारे भूमिकराप्रमाणे वसुलीचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्य शासनाने १२ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार, बॅटरीवर चालणारे स्प्रेयर, नॅनो युरिया, नॅनो डीएपी, मेटाल्डिहाईड कीटकनाशक व कापूस साठवणीसाठी बॅग्स यांसारख्या पाच वस्तू शेतकऱ्यांना थेट खरेदी करून महाराष्ट्र अ‍ॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (MAIDCL) व महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कॉर्पोरेशन (MSPCL) यांच्यामार्फत पुरवण्याचे नियोजन करण्यात आले होते.

# शिवसेना वरळी विधानसभेचा वर्धापन दिन 27 जुलैला

■ मुंबई

शिवसेना वरळी विधानसभेचा वर्धापन दिन सोमवार २७ जुलै रोजी सायंकाळी सात वाजल्यापासून रवींद्र नाट्य मंदिर प्रभादेवी मुंबई येथे शिवसेना वरळी विधानसभा प्रमुख दत्ता नरवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जल्लोषात होणार आहे. या कार्यक्रमात वरळी विधानसभेची स्मरणिका प्रकाशन, अपंग बांधवांना मोफत व्हीलचेअर वाटप, डायलेसीस रुग्णांना वैद्यकीय मदत, ज्येष्ठ नागरिकांना वैद्यकीय तसेच औषधाची मदत करण्यात येणार आहे. तसेच या ठिकाणी या वर्धापन दिनाला शिवसेनेचे प्रमुख नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विविध मंत्रीगण उपस्थित राहणार आहेत.तरी विभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या वर्धापन दिनाला उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना वरळी विधानसभा प्रमुख रत्ना महाले आणि कार्यक्रमाचे निमंत्रक, विधानसभा समन्वयक प्रशांत गवस यांनी केले आहे.

# जी, दक्षिण विभागीय जनता दरबारात पालकमंत्र्यांचा थेट संवाद

## शेकडो नागरिकांचे प्रश्न मार्गी, एसआरए भाडेप्रश्नावरही लक्ष

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्य शासनाच्या जनता दरबार अभियानात मुंबईतील नागरिकांना थेट आपल्या अडचणी मांडण्याची अनोखी संधी मिळाली. यावेळी मुंबई उपनगरचे पालकमंत्री ना. मंगल प्रभात लोढा यांनी शुक्रवार दिनांक २५ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३.०० वाजे पर्यंत जी / दक्षिण विभाग कार्यालयात उपस्थित राहून जनतेशी संवाद साधला आणि त्यांच्या विविध समस्या ऐकून घेतल्या. या विशेष उपक्रमात स्थानिक नागरिकांनी सहभाग घेतला. पाणीपुरवठा, रस्ते, वीज, आरोग्य, झोपडपट्टी पुनर्वसन, आणि नागरी मूलभूत सुविधांबाबत अनेक तक्रारी मांडण्यात आल्या. यापैकी अनेक तक्रारींवर मंत्र्यांनी तत्काळ निर्णय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. या दरम्यान एस.आर.ए. प्रकल्पातील पुनर्विकास इमारतींसंदर्भात भाडे वेळेवर




न मिळण्याचा एक गंभीर प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला.

अनेक कुटुंबांना पुनर्विकास प्रक्रियेदरम्यान घर मिळूनही अनेक वर्षे झाले, तरी विकासकांकडून त्यांना ठरलेले भाडे मिळत नाही, अशी तक्रार होती. या तक्रारीकडे ना. मंगल प्रभात लोढा यांनी गांभीर्याने लक्ष दिले असून, संबंधित एस.आर.ए. अधिकाऱ्यांना त्वरित चौकशी करून विकासकांवर योग्य कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.मंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या या संवाद बैठकीमुळे नागरिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. त्यांच्या समस्या थेट मंत्र्यांपर्यंत पोहोचल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. ना. लोढा यांनी सांगितले की, "नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने उपाय करणे हीच आमची जबाबदारी आहे.

# सेप्टीक टँक दुर्घटना : मृतकांच्या कुटुंबीयांना 90 लाख

## आमदार अस्लम शेख यांच्या पाठपुराव्याला यश, धनादेश वितरित

■ मुंबई

मागील वर्षी मालवणी, अंबोजवाडी येथील मनपा शौचालयाच्या सेप्टीक टँक मध्ये पडून खाजगी कामगार असलेल्या रामलगन केवट व त्यांचे दोन मुलगे विकास केवट, सुरज केवट यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आमदार अस्लम शेख यांनी राज्यसरकार व महानगरपालिका यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मृतकांच्या कुटुंबीयांना महानगरपालिकेकडून आधी ३० लाख व शुक्रवारी ६० लाख रुपये असे एकूण ९० लाखांचे धनादेश वितरित करण्यात



आले. गेल्या वर्षी घडलेल्या दुर्घटनेत रामलगन केवट यांच्या पत्नी इंद्रावती केवट यांनी आपले पती व दोन मुलगे गमावले. कुटुंबाचा आधारच गेल्याने लहान मुलाचा, मुलीच्या भवितव्याचे काय? हा प्रश्न इंद्रावती यांच्या समोर उभा राहिला होता. इंद्रावती यांचे सासरे देखील वयोवृद्ध व आजारपणाने बेजार झालेले असल्यामुळे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न देखील उभा राहिला होता.केवट कुटुंबीयांनी जे गमावलं त्याची भरपाई होऊ शकत नाही. मात्र ह्या रकमेमुळे केवट यांच्या पत्नी इंद्रावती व त्यांचा मुलगा व मुलगी यांचे भविष्य सुरक्षित होईल. असे आमदार अस्लम शेख यावेळी म्हणाले.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

E-Tenders are invited on line from experienced and reputed Manufacturers/Suppliers/Contractors for the supply/works of following at Gas Turbine Power Station, Uran:

| e-Tender / RFx No. | Description | Estimated Cost/ EMD (Rs) | Sale Period | Last date of submission (up to 11.00 hrs) |
|---|---|---|---|---|
| RFx No. 3000060083 | Work of Safe operating Procedure under The factory act 1948 at GTPS, Uran. | 03.74 Lakhs 7,244/- | 26.07.2025 To 08.08.2025 | 09.08.2025 |
| RFx No. 3000060206 | Work contract for Erection/replacement of overhead/underground MSERW pipeline at WTP, GTPS, Uran. | 13.65 Lakhs 17,160/- | 26.07.2025 To 08.08.2025 | 09.08.2025 |
| RFx No. 3000060310 | Work of arresting oil leakage of GT-7 Generator Transformer at Gas Turbine Power Station, Uran through Open Tender process. | 03.40 Lakhs 6,900/- | 26.07.2025 To 01.08.2025 | 02.08.2025 |
| RFx No. 3000060342 | Supply, Retrofitting and Commissioning of spares for 15 KVA single phase and 50 KVA three phase power supply source at TIC GTPS, Uran. | 41.50 Lakhs 45,000/- | 26.07.2025 To 04.08.2025 | 05.08.2025 |

Tender Cost Rs.1180/- for all tenders. Tender cost and EMD to be paid online only. Tenders are available for sale on our website from dt. **26.07.2025** for more details, pl. visit our website **https://eprocurement.mahagenco.in.**
Contact Details:- EE (P&C) - 91-9167007841.

Vendors are requested to register their firms for E-Tendering,
Please log on to our website **https://eprocurement.mahagenco.in**

Sd /-
Chief Engineer
GTPS Uran

## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाच विभागीय घटक)

म्हाडा MHADA

### निविदा सुचना (२री व ३री बोली)

संदर्भ :- का.अ./सी.-१/मुं.ई.दु.व पू.मंडळ / ई.- नि.सू.क्र.०६/२०२५

कार्यकारी अभियंता, सी-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, ए ६६, ददरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई - ३४ यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग / कें. सा.बां.वि./ रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव व तपशील | निविदा रक्कम ₹ | इसारा रक्कम ₹ [ १%] | सुरक्षा अनामत [२%] (५०% रक्कम सुरुवातील व नंतर व ५०% रक्कम देयकातून) ₹ | कोऱ्या निविदेची रक्कम + G.S.T. (विना परतावा) ₹ | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा उघडण्याची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | इमारत क्र २८-३० बापू खोटे स्ट्रीट (आमदार निधी) (दुसरी बोली) | ₹१,३७,४९२/- | ₹ १,३७५/- | ₹३,०००/- (₹१,५००/- प्रथम व नंतर ₹१,५००/- देयकातून ) | ₹ २३६/- | दि.२८.०७.२०२५ ते ०५.०८.२०२५ सकाळी ११:०० ते दुपारी ०२:०० वाजेपर्यंत | दि.०६.०८.२०२५ व ०७.०८.२०२५, दुपारी १२:०० ते ०४:०० वाजेपर्यंत | दि.०८.०८.२०२५ सकाळी ११.०० वाजल्या पासून, (शक्य झाल्यास) | १२ महिने (पावसाळ्या सहित) | वर्ग ९ व त्यावरील |
| २ | 42 पहिला भोईवाडा लेन (मंडळ निधी) (दुसरी बोली) | ₹१,९०,८५८/- | ₹ १९०९/- | ₹४,०००/- (₹२,०००/- प्रथम व नंतर ₹२,०००/- देयकातून ) | ₹ २३६/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ३ | 49 दुसरी भोईवाडा लेन ( मंडळ निधी) (तिसरी बोली) | ₹२,८४,९९८/- | ₹ २८५०/- | ₹६,०००/- (₹३,०००/- प्रथम व नंतर ₹३,०००/- देयकातून ) | ₹ २३६/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ४ | 23 बोरा स्ट्रीट (आमदार निधी) (दुसरी बोली) | ₹२,८८,२५३/- | ₹ २८८३/- | ₹६,०००/- (₹३,०००/- प्रथम व नंतर ₹३,०००/- देयकातून ) | ₹ २३६/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ५ | इमारत क्र ९३-१०३ मौलाना शौकत अली रोड (मंडळ निधी) (दुसरी बोली) | ₹३,५६,६१८/- | ₹ ३,५६६/- | ₹८,०००/- (₹ ४,०००/- प्रथम व नंतर ₹४,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | वर्ग ८ व त्यावरील |
| ६ | इमारत क २२ - २२ओ, २रा भोईवाडा लेन [मंडळ निधी] (तिसरी बोली) | ₹३,७९,४६०/- | ₹ ३,७९५/- | ₹८,०००/- (₹ ४,०००/- प्रथम व नंतर ₹४,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ७ | इमारत क १३५ किका स्ट्रीट [मंडळ निधी] (तिसरी बोली) | ₹३,९७,१६५/- | ₹ ३,९७१/- | ₹८,०००/- (₹ ४,०००/- प्रथम व नंतर ₹४,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ८ | इमारत क्र २०-२२ बापू खोटे स्ट्रीट / ६९ बनियान स्ट्रीट ( मंडळ निधी ) (दुसरी बोली) | ₹३,९९,७०७/- | ₹ ३,९९७/ | ₹८,०००/- (₹ ४,०००/- प्रथम व नंतर ₹४,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ९ | इमारत क २७-३१, १ली अग्यारी लेन [ मंडळ निधी] (तिसरी बोली) | ₹५,३८,८४१/- | ₹ ५,३८८/- | ₹११,०००/- (₹ ५,५००/- प्रथम व नंतर ₹५,५००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | वर्ग ७ व त्यावरील |
| १० | ५३-५९-५९ अ इरास्कीन रोड / 16 बोरा स्ट्रीट (मंडळ निधी) (दुसरी बोली) | ₹५,९०,४३३/- | ₹ ५,९०४/- | ₹१२,०००/- (₹ ६,०००/- प्रथम व नंतर ₹६,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ११ | इमारत क ५८-५८ अ, २रा भोईवाडा लेन -[ मंडळ निधी] (तिसरी बोली) | ₹५,९२,४२२/- | ₹ ५,९२४/- | ₹१२,०००/- (₹६,०००/- प्रथम व नंतर ₹६,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| १२ | इमारत क १-१३ निजाम स्ट्रीट / १९४-१९६ इब्राहिम रहिमतुला रोड-[मंडळ निधी] (तिसरी बोली) | ₹६,०६,४१०/- | ₹ ६,०६४/- | ₹१३,०००/- (₹ ६,५००/- प्रथम व नंतर ₹६,५००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| १३ | इमारत क १०९-११३ मुंबादेवी रोड [ मंडळ निधी] (तिसरी बोली) | ₹६,७९,८००/- | ₹ ६,७९८/- | ₹१४,०००/- (₹७,०००/- प्रथम व नंतर ₹७,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| १४ | इमारत क ५६-५६ओ- ५६ बी, २रा भोईवाडा लेन- [मंडळ निधी] (तिसरी बोली) | ₹ ७,३४,४१२/- | ₹ ७,३४४/- | ₹१५,०००/- (₹ ७,५००/- प्रथम व नंतर ₹७,५००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| १५ | इमारत क्र ८८-९० अब्दुल रहमान स्ट्रीट ( मंडळ निधी) (दुसरी बोली) | ₹ ७,७५,८०७/- | ₹ ७,७५८/- | ₹१६,०००/- (₹८,००० /- प्रथम व नंतर ₹८,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| १६ | इमारत क्र १२१ किका स्ट्रीट ( मंडळ निधी) (दुसरी बोली) | ₹ ८,००,९६३/- | ₹ ८,०१०/- | ₹१७,०००/- (₹८,५००/- प्रथम व नंतर ₹८,५,००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| १७ | इमारत क्र १०० बापू खोटे स्ट्रीट (मंडळ निधी) (दुसरी बोली) | ₹ ८,१२,१४५/- | ₹८,१२९१/- | ₹१७,०००/- (₹८,५००/- प्रथम व नंतर ₹८,५,००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| १८ | इमारत क्र १०६-११४ किका स्ट्रीट (मंडळ निधी) (दुसरी बोली) | ₹ ९,९९,९१३/- | र ९,९९९/- | ₹२०,०००/- (₹१०,००० /- प्रथम व नंतर ₹१०,०००/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |

१. कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा. / सा.बां. विभाग / कें. सा.बां.वि. / रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
२. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी / निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नांव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
३. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
४. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ यांच्या नांवावर द्यावी.
५. संयुक्तबोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
६. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्यानी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ८ दिवसाच्या आत भरली नाही, तर द्वितीय न्यूनतम देकाराच्या निविदाधारकास लेखी विचारणा करण्यात येईल व द्वितीय न्यूनतम निविदाकार हे प्रथम न्यूनतम निविदाधारकापेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजूर करण्यात येईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कमेबाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.
७. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता सी-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, ए ६६, दादरकर कंपाऊंड ताडदेव मुंबई - ३४, यांचेकडून रकाना क्र. ७ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दि. ०८.०८.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून कार्यकारी अभियंता सी - १ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
८. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
९. निविदा स्विकृती दिनांकाच्या शेवटच्या दिवसापासून ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीपर्यंत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राह्य असले पाहिजे अन्यथा त्या कंत्राटदाराचा विचार केला जाणार नाही.
१०. भाडेकरु / रहिवाशी यांनी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे संरचनात्मक दुरुस्तीसाठी किंवा पुनर्विकासाठी प्रस्ताव दाखल केल्यास, ठेकेदारास जरी स्वीकारपत्र / कार्यादेश देण्यात आले असतील तरी कुठल्याही नुकसानीबद्दल हक्क किंवा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही.
११. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
१२. स्थळ पाहणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
१३. निवीदा भरण्यापूर्वी कंत्राटदाराने क्षेत्रीय पाहणी केल्याचे प्रमाणपत्र निवीदा कागदपत्रामध्ये जोडणे अनिवार्य आहे.
१४. निविदा सूचनेमध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या अटी व शर्तीनूसार तसेच निविदा सादर करावयाच्या कार्यपध्दतीनुसार लखोटा बंद निविदा सादर कराव्यात.

CPRO/A/611

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us: @mhadaofficial

-/ स्वाक्षरीत //-
( आनंद जी. तोनशाळ )
कार्यकारी अभियंता, सी - १ विभाग,
इ. दु. व पु. मंडळ, म्हाडा, मुंबई.

उलट उत्तर देणं अयोग्य आहे पण तुम्ही ऐकत राहिलात तर लोकं बोलत राहण्याची हद्द ओलांडतात.

- गुलजार
प्रसिद्ध कवी-लेखक

वृत्तमानस
मुंबई, शनिवार, २६ जुलै २०२५

# या धोक्यांचे करायचे काय?

सायबर क्राईमच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक ते एखाद्या देशाची सर्व प्रकारची व्यवस्था ढासळू शकते, इतकी त्याची व्याप्ती व आवाका गंभीर स्वरूपाचा आहे ही बाब महत्वाची आहे. सायबर क्राईम या प्रकारात सायबर गुन्हेगार अथवा हॅकर एखाद्या संगणकातील माहिती पेनड्राईव्ह, डेटा बँक, सीडीचा वापर करून चोरतो. या माहितीचा गैरवापर होऊ शकतो अथवा ही माहिती विकली जाते. कॉर्पोरेट क्षेत्रात अशा स्वरूपाचे गुन्हे वारंवार घडतात. दुसरा प्रकार आहे सायबर स्टॉकिंग, ई-मेल अथवा फेसबुक, सोशल साईटद्वारा चॅटिंग वा सर्किंगच्या माध्यमातून गुन्हेगार आपली संगणकीय ओळख, पासवर्ड हॅक करतात. विशिष्ट व्हायरस आपल्या संगणकात डाऊनलोडसाठी पाठवून आपली संपूर्ण वैयक्तिक माहिती, संगणकावर केल्या जाणाऱ्या सर्व क्रिया, बँक अकाऊंट नंबर, पासवर्ड चोरून नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागल्याची अनेक उदाहरणे आहेत. कोणत्याही संगणक, संगणक प्रणालीमध्ये अनधिकृत केलेला प्रवेश म्हणजे हॅकिंग आणि तो करणारा हॅकर. सायबर क्राईममध्ये हॅकिंग व हॅकर या दोन संकल्पना वारंवार पुढे येताना दिसतील. ई-कॉमर्स साईटवर हॅकिंगचे प्रमाण अधिक आहे. हॅकिंगला डिनायल ऑफ सर्व्हिस म्हटले जाते. एखाद्या ई-मेलद्वारे व्हायरसची एक्झिक्युटेबल फाईल पाठवून दुसऱ्या संगणकात डाऊनलोड करून हॅकिंगद्वारा अनधिकृत प्रवेश केला जातो व विविध प्रकारे त्या यंत्रणेला नुकसान पोहोचवले जाते. व्हायरस अटॅकमध्ये एखाद्या संगणक प्रणालीत ई-मेल, चॅटिंग याद्वारे व्हायरस पाठवून संगणक प्रणाली हॅकरच्या नियंत्रणाखाली आणली जाते. आज जवळपास प्रत्येक क्षेत्र, व्यवसाय, इंटरनेटने प्रभावित झालेला दिसतो. इंटरनेटच्या या मायाजालाचा हॅकर अतिशय क्लुप्तीने गैरवापर करतात. ई-मेल, चॅटिंगच्या माध्यमातून विशेषतः महिलांचे बैंक अकाऊंट क्रमांक, पासवर्ड, आयडी क्रमांक, वैयक्तिक माहिती, वेब कॅमेर्याने आक्षेपार्ह छायाचित्रे काढणे, या महिलांना ब्लॅकमेल करणे, धमकी देणे, पैसे उकळणे असे अनेक गुन्हे उघडकीस आले आहेत. मुंबईतील एक महिला पत्रकार अशाच प्रकारे एका हॅकरच्या कचाट्यात सापडले होती. फ्रॉड मेल, धमकी देणारे मेल, किडनॅपिंग, फिशिंग, पोर्नो ग्राफी आर्दीचे गुन्हे गुन्हे उघड करणे अतिशय सोपे आहे. यासाठी वापरात आलेल्या संगणक किंवा मेलवरून गुन्हेगाराचा आयपी अड्रेस शोधला जातो. असा मेल कोणत्या सर्व्हरवरून आला हे शोधले जाते. आयपी ऍड्रेसवरून वापरण्यात आलेला संगणक, त्याचा प्रकार, इंटरनेट स्पीड, सर्व्हरचे लोकेशन व सदरचा मेल कोठून आला हे उघड करून गुन्हेगाराला शोधता येते. मात्र, आता सायबर क्राईम करणारे गुन्हेगारदेखील अद्ययावत यंत्रणेचा वापर करू लागले आहेत. आपला आयपी ऍड्रेस सापडू नये यासाठी प्रॉक्सी सर्व्हरचा वापर केला जाऊ लागला आहे. एखाद्याची ओळख हॅक करून तिचा वापर सायबर क्राईमसाठी केला जातो. सुरक्षितता, सावधगिरी बाळगून इंटरनेटचा वापर करणे ही काळाची गरज आहे. तज्ज्ञांच्या निष्कर्षानुसार आज डेटा थेप्ट, सायबर स्टॉकिंग, हॅकिंग, व्हायरस अटैक, पोर्नोग्राफी ही महत्त्वाची सायबर आव्हाने तर आहेतच. त्याशिवाय सॉफ्टवेअर पायरसी, फिशिंग, स्युफिंग, स्टॉकिंग, क्रेडिट कार्ड फ्रॉड, थ्रेटनिंग, ड्रग्ज ट्रैफिकिंग, सायबर टेररिझम अशा व्यापक स्वरूपात देखील सायबर क्राईमपुढे आला आहे. आज भारतात हॅकिंग, पोर्नोग्राफी व डेटा थेप्ट हे अशा स्वरूपाचे गुन्हे आयटी सेक्शनखाली नोंदविले जातात. तथापि यात व्यापकता येऊन सायबर क्राईमखाली येणारे सर्व गुन्हे आयटी सेक्शनखाली नोंद होणे महत्त्वपूर्ण ठरेल. अतिरेकी कारवायांमध्ये इंटरनेटचा प्रभावी वापर झाल्याचे वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. वॉरड्रायव्हिंग अटॅक, सोशल साईट् अटॅक असे सायबर अटॅक मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. सोशल साईट्सवर निषेध नोंदविण्यासाठी असे सायबर अटॅक वेळोवेळी होतील. व्हर्च्यूअल वर्ल्ड ऍपिरियन्स यासारख्या सोशल साईटवर सायबर क्रिमिनल अधिक लक्ष केंद्रित करण्याची शक्यता आहे. नव्याने आलेल्या 5-जी मोबाइल सेवेवर सायबर क्रिमिनल लक्ष केंद्रित करण्याची शक्यता आहे. स्मार्टफोन, इंटरनेट सुविधा, सेवा पुरविण्याऱ्या सायबर कंपन्यांनी सुरक्षिततेचे बळकट उपाय योजण्याची गरज आहे. वैयक्तिकरित्या इंटरनेट वापरणाऱ्यांनी क्राईमबाबत जागरुकता बाळगणे महत्त्वाचे ठरेल. सायबर क्रिमिनलच्या साईट्स, ओळख, एथिकल हॅकिंगद्वारे उघडकीस आणायला पुढे येणे महत्त्वाचे ठरेल. एथिकल हॅकिंग भविष्यातील गुन्हे उघडकीस आणण्यासाठी चांगल्या संधी आहेत. वाय-फाय कनेक्शनबाबत देखील सुरक्षित वापर महत्त्वाचा आहे. आपण जेव्हा संगणकावर काम करतो तेव्हा केलेल्या कामाची एक डुप्लीकेट फाईल तयार होऊन ती हार्ड डिक्सवर सेव्ह होते. जेव्हा इंटरनेट चालू करतो तेव्हा अलगदपणे ही माहिती हॅकरला मेलद्वारे प्राप्त होते. त्यामुळे पुढील फसगत टाळण्यासाठी अशा प्रकारचे फसवे मेल डीलीट करणे हाच मोठा प्रतिबंधात्मक उपाय ठरतो. इंटरनेटच्या सकारात्मक वापराबरोबरच दुष्प्रवृत्तीद्वारे केला जाणारा दुरुपयोग सर्वसामान्यांचे जीवन, राष्ट्राची सुव्यवस्था, अर्थव्यवस्था डळमळीत करू शकतो. सध्या सायबर गुन्हेगारी रोखण्याकामी प्रत्येक पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना याबाबत प्रशिक्षण देण्यात येत आहे. व्हिडिओ, ऑडिओ, सॉफ्टवेअर पायरसी रोखण्यासाठी पावले उचलली आहेत. सोशल मीडियावर आक्षेपार्ह, जातीय तेढ, अफवा अथवा एखाद्या व्यक्ती, समाजाबद्दल निंदा अशा आशयाचे संदेश टाकणे अथवा फॉरवर्ड करणार्यांवर सायबर सेल लक्ष ठेवून आहे. सायबर गुन्ह्यात फसवणूक झालेल्या नागरिकांनी पोलिसांकडे निर्भयपणे तक्रारी नोंदवणे आवश्यक आहे. सायबर क्राईम नावाच्या नव्या आव्हानाचा या पुढील काळात सर्वांना सामना करावा लागणार आहे. अलीकडेच या प्रकारच्या हल्ला होऊन एक मोठी कंपनी कायमची बंद पडली व या विषयाचे महत्त्व अधोरेखित झाले. सायबर हल्ल्यांचे आव्हान दिवसेंदिवस वाढत आहे. या हल्ल्यांमुळे होणारे धोके आणि नुकसानीची शक्यता खूप जास्त आहे. त्यामुळे, सायबर हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. मुळात सध्या डिजिटल काळ असल्याने हे हल्ले मोठ्या प्रमाणात होऊ शकतात. सायबर हल्ला म्हणजे नेटवर्क, संगणक प्रणाली किंवा डिजिटल उपकरणात अनधिकृत प्रवेशाद्वारे डेटा, अनुप्रयोग किंवा इतर मालमत्ता चोरण्याचा, उघड करण्याचा, बदलण्याचा, अक्षम करण्याचा किंवा नष्ट करण्याचा कोणताही जाणूनबुजून केलेला प्रयत्न. संगणकीय क्षेत्रात सायबर क्राईमचा झालेला शिरकाव हा अनेक अनर्थ व संकटांना आमंत्रण देणारा आहे. साधारणतः सर्वसामान्य नागरिकांचा असा समज आहे की, सायबर क्राईमशी आपला काही संबंध नाही. या समजामुळे नागरिक सायबर क्राईम बाबत अनभिज्ञ आहेत. पण, जरा सूक्ष्मविचार करून पाहिलं तर आपल्याला रोजच या सायबर क्राईमचा सामना करावा लागतो ही वस्तुस्थिती आहे यात शंका नाही. आपल्या ई-मेलवर स्पॅममेल येत असतात, मोबाइलवर अनावश्यक कॉल, मेसेजेस येतात, नेट बँकिंग अकाऊंट असेल तर त्याचा पासवर्ड, आय. डी. हॅक होतो. हे सर्व प्रकार सायबर गुन्हेगारीमध्ये मोडतात. संगणक, इंटरनेट यांच्या माध्यमातून एखाद्या व्यक्ती, संस्था आदींच्या संगणक प्रणालीमध्ये शिरून त्यातील माहिती हॅक करणे, त्याचा गैरवापर करणे, व्हायरस पाठविणे, मेलद्वारे फसवणूक, धमकी देणे, खंडणी मागणे अशा कारवायांना सायबर क्राईम म्हणता येईल. परंतु, सायबर क्राईमची व्याप्ती व तंत्र हे रोज बदलते असल्याने त्याला विशिष्ट अशा रचनेत वा संकल्पनेत बसविणे थोडे जिकिरीचे आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रशासन : सुशासनाच्या नव्या पर्वाकडे वाटचाल

**हाई 'एआय' बड्ड काम करय माय!**

काळानुरूप समाज, राज्य आणि शासन व्यवस्थेतील आवश्यकतेनुसार तंत्रज्ञानाची भूमिका केवळ पूरक राहिली नाही, तर ती परिवर्तनाची सूत्रधार बनली आहे. एकेकाळी शासन म्हणजे फाईलींच्या ढिगाऱ्यात हरवलेली प्रक्रिया, कार्यालयांतील रांगा, संथ हालचाल आणि गुंतागुंतीचे नियम असा सर्वसामान्यांचा अनुभव होता. परंतु आता हा अनुभव झपाट्याने बदलतो आहे. तंत्रज्ञानातील विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (Artificial Intelligence-AI) वापरामुळे शासनाच्या कार्यपद्धतीला एक नवचैतन्य प्राप्त झाले आहे.



कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणकीय प्रणालीची अशी क्षमता जी मानवी बुद्धिप्रमाणे विचार करू शकते, शिकू शकते, अनुभवाच्या आधारे निर्णय घेऊ शकते आणि त्यावरून भविष्यातील उपाययोजना आखू शकते. ही प्रणाली शासन-प्रशासनासाठी एक अशी क्रांतिकारी संधी ठरते आहे, जी वेग, अचूकता आणि पारदर्शकतेच्या त्रिसूत्रावर आधारित प्रशासन शक्य करते.

**प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता का गरजेची आहे?**

भारतातील लोकसंख्येची वाढ, नागरीकरणाचा वेग, तांत्रिक साक्षरतेत आलेली प्रगती आणि जनतेच्या वाढत्या अपेक्षा या सर्वांमुळे शासनाच्या पारंपरिक कार्यपद्धतीवर ताण निर्माण झाला. शासनाकडे असंख्य अर्ज, समस्या, योजना, लाभार्थ्यांची माहिती, आर्थिक व्यवहार, सामाजिक अभिलेख इत्यादींचे दैनंदिन व्यवस्थापन करण्याची जबाबदारी असते. हे सर्व पारंपरिक पद्धतीने करणे केवळ वेळखाऊ नव्हे तर त्रुटींचं प्रमाणही वाढवणारे ठरतं. त्यामुळेच डेटा आधारित, शहाणपणाने शिकणारी आणि गतीने काम करणारी प्रणाली म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशासनात अनिवार्य झाली आहे.

**भारत व महाराष्ट्रातील महत्त्वाचे उपक्रम**

भारत सरकारने 'इंडिया एआय' या धोरणात्मक आराखड्याच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण, शेती, महिला सुरक्षा, न्यायव्यवस्था आणि पर्यावरण अशा अनेक क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू केला आहे. पीएम-किसान PM-Kisan, फास्टॅग Fastag, आरोग्य सेतू Aarogya Setu, ई-कोर्ट्स, SUPACE, आणि पीएम गती-शक्ती अशा राष्ट्रीय योजना आणि प्रणाली एआय च्या साहाय्याने चालवल्या जात आहेत.

"एआय फॉर ऑल (AI for All)" उपक्रमातून भारतात एआय साक्षरतेवर विशेष भर दिला जात आहे. "एआय फॉर युथ" योजनेद्वारे विद्यार्थ्यांना एआय विषयी शिकवले जात आहे. न्यायप्रणालीमध्ये 'सुपेस' पोर्टलमुळे सर्वोच्च न्यायालयीन प्रकरणांमधील माहितीचे संक्षेप, मुद्दे, पुरावे यांचं वेगवान विश्लेषण सहज शक्य होत आहे.

महाराष्ट्रात महसूल खात्याच्या "माझी जमीन माझा अधिकार" उपक्रमांतर्गत ड्रोन व एआय च्या साहाय्याने जमिनीच्या मोजणीपासून ते डिजिटल प्रमाणपत्रांपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह बनली आहे. गडचिरोली, नंदुरबार, गोंदिया यांसारख्या दुर्गम भागांतही हे काम प्रभावीपणे सुरू आहे.

मुंबई पोलिस विभागात क्राईम-मॅपिंग Crime Mapping व फेशियल रेकगनाईजेशन Facial Recognition प्रणाली वापरून गुन्ह्यांचा संभाव्य ठिकाणी पूर्वानुमान लावून बंदोबस्त वाढवला जात आहे. पुणे स्मार्ट सिटी अंतर्गत वाहतूक नियंत्रण, कचरा संकलन व पाणीपुरवठा व्यवस्थापनात एआय चा वापर प्रभावीपणे केला जात आहे. शिक्षण विभागात दिक्षा, मित्रा (DIKSHA, MITRA) प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण, शिक्षक प्रशिक्षण व शिक्षण सुधारणा केली जात आहे. आरोग्य सेवा डिजिटल हेल्थ कार्ड्स, एआय डॉक्टर असिस्टंट (AI Doctor Assistant) प्रणाली आणि आरोग्य सेतू (Aarogya Setu) ॲपच्या माध्यमातून अधिक सक्षम बनली आहे.

**कृषी, आरोग्य, शिक्षण, न्याय आणि महसूल यंत्रणांतील प्रभाव**

'एआय'च्या साहाय्याने कृषी क्षेत्रात हवामान माहिती संकलन व विश्लेषण प्रणाली वाईड्स (WINDS) तयार करण्यात आली असून, ती शेतकऱ्यांना पेरणीचा योग्य काळ, हवामानाचा अंदाज, कीटक प्रकोप याबाबत अचूक सल्ला देते.

आरोग्य क्षेत्रात 'एआय'चा वापर रुग्णालयांतील निदान, वैद्यकीय इमेजिंग, औषध योजना आणि संभाव्य साथींच्या प्रसाराचा अंदाज लावण्यासाठी केला जात आहे. जिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून एआय आधारित सल्ला दिला जात आहे.

शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेनुसार अभ्यासक्रम आखणे, त्यांच्या अडचणींचा मागोवा घेणे आणि पालक-शिक्षक संवादाला डेटा-आधारित दिशा देणे या बाबतीत एआय कार्यरत आहे.

न्याय विभागात केसेस ट्रॅकिंग, तारखांचे व्यवस्थापन आणि निर्णय सहाय्य अशा बाबतींत एआय प्रभावी ठरतो आहे. ई-कोर्ट (e-Courts) प्रणाली न्यायाधीश व वकिलांना कामकाजात वेग आणि अचूकता देते.

महसूल यंत्रणेत भू-नकाशे, सीमेचे निर्धारण, मालकीची पडताळणी हे काम ड्रोन व एआय च्या मदतीने जलद आणि वादरहित पद्धतीने पूर्ण होत आहे.

चित्रकला, प्रेझेंटेशन, बांधकाम, रस्तेविकास आणि दुर्गम भागांतील क्रांती

एआय चा वापर सृजनशील क्षेत्रांमध्येही होत आहे. माहिती व जनसंपर्क विभागातील पोस्टर, जनजागृती बॅनर, व्हिडिओ ग्राफिक्स, लोकशाही प्रचार मोहीम, निवडणुका व कोविडसारख्या आपत्कालीन कालखंडांमध्ये एआय आधारित सृजनशीलतेचा उपयोग मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

बांधकाम क्षेत्रात भूगर्भीय तपशील, हवामान आकडे, पर्यावरणीय विश्लेषण आणि वाहतुकीची डेटा आधारित माहिती वापरून एआय सुरक्षित इमारत डिझाईन, थ्रीडी मॉडेलिंग व रचना सल्ला देते. सेन्सर-आधारित गुणवत्ता तपासणीमुळे काम वेळेत पूर्ण होते.

प्रेझेंटेशन आणि सादरीकरण यामध्ये अधिकारी सध्या एआय आधारित डॅशबोर्ड वापरतात. या डॅशबोर्डमधून विभागीय खर्च, लाभार्थी संख्येचे विश्लेषण, कार्यक्षमतेचे निदर्शन आणि धोरणात्मक कमतरतांची नोंद घेतली जाते.

रस्तेविकासात उपग्रह प्रतिमा, ड्रोन मोजणी, हवामान डेटा, पावसाळी धोके आणि वाहतुकीचा दाब यांचा एआय एकत्रित अभ्यास करून रस्त्यांच्या डिझाईन, मजबुतीकरण आणि देखभाल आराखडे तयार करतो.

दुर्गम भागांमध्ये एआय आधारित ऑफलाइन साधने वापरून आरोग्य तपासणी, शैक्षणिक व्हिडिओ, भाषांतर सेवा आणि सौर उर्जेच्या व्यवस्थापनासारख्या मूलभूत सुविधा पोहोचल्या आहेत. वनरक्षण, जलस्त्रोत व्यवस्थापन, आपत्तीची सूचना/ संकेत/ अलकाचे या ठिकाणीही एआय चे योगदान मोठे आहे.

**फायदे आणि जबाबदाऱ्या**

कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशासनाला गतिमान करते. ही प्रणाली मोठ्या प्रमाणात माहितीचा वेगाने अभ्यास करते, त्रुटी ओळखते, धोरण आखते, आणि पुनरावृत्ती न करता निर्णय घेते. यामुळे शासन अधिक प्रभावी, लोकाभिमुख आणि पारदर्शक बनते.

तथापि, ही यंत्रणा वापरताना डेटा गोपनीयता, नैतिकता आणि मानवी मूल्यांचा विचार गरजेचा असतो. नागरिकांच्या माहितीचा गैरवापर, पूर्वग्रह असलेली प्रणाली, सामाजिक भानाचा अभाव यामुळे एआय चा निर्णयही चुकीचा ठरू शकतो. त्यामुळे एआय ही एक सहाय्यक प्रणाली असली, तरी अंतिम निर्णय मानवी विवेकावर आधारित असायला हवा.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही आज प्रशासनाचा अविभाज्य भाग बनली आहे. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने तिचा उपयोग प्रभावीपणे करून दाखवला आहे. महसूल, कृषी, आरोग्य, पोलीस, शिक्षण, बांधकाम, माहिती विभाग, आणि दुर्गम भागांमध्ये ती क्रांती घडवत आहे.

एआय प्रशासनाला केवळ गती देते असे नाही, ती प्रशासनाला भविष्याकडे पाहण्याची दृष्टी देते. सुशासनाची व्याख्या बदलून आता प्रशासन डेटा-सक्षम, अचूक, गतिमान आणि जनतेच्या गरजेनुसार झपाट्याने बदलणारं यंत्र बनत आहे. या दृष्टीकोनातून पाहिलं, तर कृत्रिम बुद्धिमत्ता ही तांत्रिक क्रांती नसून जनहिताची नैतिक जबाबदारी बनते. कारण शेवटी शासनाची खरी ताकद ही त्याच्या लोकांमध्ये असते आणि त्या लोकांपर्यंत न्याय, सेवा आणि विश्वास अचूकपणे पोहोचवण्याचं सामर्थ्य आता एआय कडे आहे. थोडक्यात आमच्या बोली भाषेत सांगायचं झालं तर हाई एआय बड्ड काम करत माय !

**शासनातील एआय आधारित महत्त्वाचे प्रयोग**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजना (PM-Kisan) एआयद्वारे लाभार्थी तपासणी व स्क्रूटनी

फास्टॅग (FASTag) टोल वसुलीसाठी वाहन ओळख व ट्रॅफिक विश्लेषण

आरोग्य सेतू (Aarogya Setu) कोविड संदर्भात संपर्क ट्रेसिंग व धोका विश्लेषण

ई-कोर्ट्स (e-Courts) न्यायालयीन वेळबचतीसाठी केस मॅनेजमेंट

सुपेस (SUPACE) सर्वोच्च न्यायालयासाठी एआय सहाय्यक पोर्टल

पुणे स्मार्ट सिटी वाहतूक, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा क्षेत्रांमध्ये एआय वापर

"माझी जमीन माझा अधिकार (महाराष्ट्र) डिजिटल नकाशे, सीमांकन, मालकीचे प्रमाणपत्र

मुंबई पोलिस फेशिएल रेकगनायजेशन व क्राईम मॅपिंग प्रणाली

दुर्गम आदिवासी भागांत सौर ऊर्जेचे नियमन, शिक्षण, आरोग्य सेवा एआय च्या सहाय्याने

- रणजितसिंह राजपूत
(जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार)

# सणांचा - व्रत वैकल्याचा महिना श्रावण

काल म्हणजे शुक्रवारपासून श्रावण महिना सुरू झाला. हिंदू धर्मात श्रावण महिन्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. श्रावण महिन्यातील सोमवार हिंदू धर्मात पवित्र मानला जातो. या दिवशी महादेवाची पूजा केली जाते. तसे श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा व व्रत करण्याची हिंदू व जैन धर्माची परंपरा आहे. श्रावण महिन्याला सणांचा महिना म्हंटले जाते. कारण श्रावण महिन्यातच सर्वात जास्त सण येतात. या महिन्यात व्रत वैकल्याची रेलचेल असते. श्रावण महिन्यात नाग पंचमी, रक्षा बंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, मंगळागौर, बैल पोळा हे सण येतात. त्यानंतर येणारे गौरी गणपतीही याच महिन्यात खुणावत असतात. नाग पंचमी पासून दसरा दिवाळी पर्यंत सगळ्या हव्या हव्याशा सणांची सुरुवात याच महिन्यापासून होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत घराघरात असतो. श्रावणातील प्रत्येक दिवस सण होऊन जातो. अशा आनंदी वातावणामुळे असेल कदाचित पण श्रावणात मनाच्या सांदी कोपऱ्यात उत्साहाचे नवे ऋतू फुलत असतात.

बहुतेक सगळ्या सणामध्ये आणि अंगिकारल्या जाणाऱ्या व्रत वैकल्यांमधून संकटातून निर्भिडपणे आणि यशस्वीपणे बाहेर येण्यासाठी शक्ती मिळवण्यासाठी प्रेरणा मिळते. संसारातील सर्व सुख दुःखाचा सारीपाट मांडला असताना मन मोकळं करून सख्याना समजून घेण्याचे हक्काचे क्षण हा महिना देऊन जातो. श्रावण महिना केवळ हिंदुसाठीच नव्हे तर मुस्लिम आणि पारशी बांधवांसाठी ही पवित्र महिना मानला जातो कारण याच महिन्यात मुस्लिमांची बकरी ईद आणि पारशी बांधवांची पतेती हे सण येतात. त्यामुळे हिंदू प्रमाणेच जैन, मुस्लिम आणि पारशी बांधव श्रावण महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतात. मुस्लिम आणि पारशी बांधव देखील त्यांचे सण उत्साहात आणि जल्लोषात साजरे करतात. श्रावण महिन्यात निसर्गाला उधाण आलेले असते. आषाढ महिन्यात झालेला पावसाने सर्वत्र हिरवळ दाटलेली असते. निसर्ग आषाढ सरी पिऊन हिरवे गालिचे पसरून बहरलेला असतो. हा हिरवा गालिचा पाहूनच

**हिरवे हिरवेगार गालिचे**
**हरित तृणाच्या मखमालीवर....**

ही कविता बालकवींना सुचली असावी. श्रावण महिन्यात सगळीकडे वसुंधरेवर श्रावणाच्या धारा बरसत असतात. श्रावणाच्या धारा बरसत असल्याने निसर्ग सौंदर्य तृप्तीचा हुंकार देत असतो. निसर्गाचे बहरलेले सौंदर्य पाहताच हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला या ओळी ओठी गुणगुणावश्या वाटतात. श्रावण म्हणजे चैतन्य..... श्रावण म्हणजे उत्साह.....

**श्रावण मासी हर्ष मानसी**
**हिरवळ दाटे चोहिकडे**
**क्षणात येते सरसर शिरवे**
**क्षणात फिरून उन पडे**

या कवितेत बालकवींनी श्रावण महिन्याचे चित्रण यथार्थपणे मांडले आहे.

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## पत्र मानस

### हातरिक्षाची अमानवीय पद्धत बंद व्हावी

पर्यावरणदृष्टया संवेदनशील असलेले माथेरान हे महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण असून तेथील अढळ निसर्ग सौंदर्यामुळे दरवर्षी लाखो पर्यटक माथेरानला भेट देतात. परंतु आजही माथेरानमध्ये पर्यटकांच्या वाहतुकीसाठी हाताने ओढल्या जाणाऱ्या हातरिक्षांचा वापर केला जातो. हातरिक्षाच्या साहाय्याने माणसाने माणसाला ओढणे ही पद्धत अमानवीय असल्याचे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला हातरिक्षा चालकांना सामावून घेणारी पर्यायी वाहतूक व्यवस्था शोधण्याचे निर्देश नुकतेच दिले. तसेच राज्य सरकारने यासाठी गुजरातमधील सरदार सरोवर धरण परिसरात वापरात आणलेल्या ई-रिक्षा वाहतूक व्यवस्थेचा विचार करावा असे सुचवले आहे. वास्तविक संपूर्ण देशात कोलकाता व्यतिरिक्त माथेरान हे एकमेव ठिकाण आहे जिथे अमानवीय पद्धतीने हाताने ओढलेल्या रिक्षा किंवा गाड्या अजूनही सुरू आहेत. माथेरानमध्ये ई-रिक्षाच्या माध्यमातून हातरिक्षा चालकांचे पुनर्वसन करणे शक्य असून माथेरानमध्ये काही हातरिक्षा चालकांना प्रायोगिक तत्त्वावर ई-रिक्षाची परवानगी देण्यात आली होती. त्याच धर्तीवर उर्वरित सर्वच हातरिक्षा चालकांना ई-रिक्षाची परवानगी मिळाली तर माणसाने माणसाला हाताने ओढल्या जाणाऱ्या हातरिक्षाची अमानवीय प्रथा लवकर संपुष्टात येईल.

- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

### किती भयंकर?

नागरी विमान वाहतूक महासंचालनालय भारतातील सुरक्षित हवाई प्रवासासाठी वचनबद्ध आहे.तरीही यंदा २१ जुलैपर्यंत पाच भारतीय विमान कंपन्यांनी आपल्या विमानांतील १८३ तांत्रिक दोषांची माहिती नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला दिली.सन २०२४मध्ये ४२१ , २०२३ मध्ये ४४८ तर २०२२ मध्ये ५२८ नोंदवण्यात आलेल्या तांत्रिक दोषांची संख्या होती. प्रवाशांचा सुरक्षित प्रवास होतो का? भारतीय विमान कंपन्या फायदा कमवण्याच्या प्रयत्नात तांत्रिक दोषांसहीत विमान उडवून प्रवाशांच्या जीवाशी खेळत आहेत.जोपर्यंत अपघात होत नाही तोपर्यंत तांत्रिक दोषांला महत्व दिले जात नाही. भारतीय विमान कंपन्यांच्या कारभारावर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचे नियंत्रण आहे का नाही? विमानात नोंदवलेले दोष वारंवार दिसून आले,ज्यामध्ये अप्रभावी देखरेख आणि दोष तसेच वारंवार दोषांवर अपुरी दुरुस्ती करणा-या विमान कंपन्यांवर कारवाई झाली पाहिजे.विमानाला अपघात झाल्या विमानातले सर्व प्रवासी मृत्युमुखी पडतात.यासाठी सर्व विमानांचे उड्डाण तांत्रिक दोषाशिवाय झाले पाहिजेत. विमानात तांत्रिक दोष असतील तर ती विमाने नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने बाद करावीत. तांत्रिक दोष निर्माण झाल्यानंतर वैमानिक काही करू शकत नाहीत. त्यामुळे या अपघाताचे खापर वैमानिकांवर फोडून सत्य लपवून ठेवता येणार नाही. भविष्यात अपघात घडू नयेत, यासाठी पूर्ण निष्ठेने झालेल्या या अपघातांचे अन्वेषण झाले पाहिजे! अपघात घडू नयेत म्हणून नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने प्रयत्न करावेत.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

## पालिका कर्मचाऱ्यांचा संपावर जाण्याचा इशारा

**ठाणे :** थकीत वेतन, वेतन फरक पूर्ण दिला जात नसल्याने ठाणे महानगरपालिका आणि ठाणे महापालिका परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांनी ७ ऑगस्ट रोजी संपावर जाण्याचा इशारा महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी यूनियनचे अध्यक्ष रवींद्र चांगो शिंदे यांनी दिला आहे. यासंदर्भात रवींद्र चांगो शिंदे म्हणाले, ठाणे महापालिकेतील नियमित कर्मचारी किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मागील चार वर्षांपासूनचा थकीत वेतन आणि त्यातील वेतन फरक पूर्ण दिलेला नाही. गेली अनेक वर्षे महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी यूनियन त्याविरोधात लढत आहे. संघटनेच्या लढ्यामुळे गतसाली २४ हजार रुपये बोनस देण्यात आला. पण त्याचवेळी पैसा असूनही महापालिकेने थकीत वेतन फरक दिला नव्हता. १३ मार्च रोजी होळीच्या दिवशी आत्मदहन करण्याचा इशारा दिल्यावर गुढीपाडव्याच्या आधी दोन हप्तापैकी १८० कोटी रुपये कर्मचाऱ्यांना वितरित करण्यात आले. आता श्रावण महिन्यापासून होणाऱ्या सणासुदीला कर्मचाऱ्यांना आर्थिक चणचण भासू नये म्हणून थकीत रक्कम त्वरित देण्यात यावी. तसेच कर्मचाऱ्यांची पदोन्नती, रिक्त जागांवर सुमारे १० हजार कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी या संपाची हाक देण्यात आली असून त्यात पालिकेतील सर्व कर्मचारी संघटना सहभागी होणार आहेत.

# कसारा महामार्गावर 3 वाहनांचा भीषण अपघात

### 25 जखमी 7 जण गंभीर जखमी




प्रतिनिधी

■ **कसारा**

मुंबई नाशिक महामार्गवरील कसारा जवळील ओहळाची वाडी जवळ ट्रक, पिकअप, व एका कार गाडीचा भीषण आपघात होऊन 25 जण जखमी झाले असून सर्व जखमी पिकअप गाडीतील होते या जखमी पैकी 7 जणांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना एस एम बी टी रुग्णालयात हालवण्यात आले.

आज संध्याकाळ च्या सुमारास दशक्रिया विधिस आलेले टाकेद येथील ग्रामस्थ डोळखांब येथून टाकेद ला जातं असता कसारा जवळील ओहळाचिवाडी जवळ पिकअप क्रमांक एम. एच 15 जे डब्लू 1654 च्या चालकाला नाशिक दिशेने जाणाऱ्या ट्रक चा अंदाज न आल्याने पिकअप पुढे असलेल्या ट्रक क्रमांक एम एच 42 टी. 3636 वर जाऊन धडकली त्याच दरम्यान पिकअप च्या मागून येणारी कार क्रमांक एम एच 03 डी जी 5779 ही पिकअप वर जाऊन धडकली ह्या भीषण अपघातात पिकअप ला दोन्ही बाजूने जोरदार धडक बसल्याने पिकअप गाडीतील 27 प्रवासी जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन टीम चे सदस्य भास्कर सदगीर, दत्ता वाताडे, शाम धुमाळ, अक्षय लाडके, सतीश खरे, सुनील करवर यांनी घटनास्थळी धाव घेत मदत कार्य सुरु केले व जखमीना खासगी रुग्णवहीका, कसारा रुग्णालयातील रुग्णावाहीका, टोल कंपनी च्या रुग्णवाहिकेतून कसारा प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले जखमींमध्ये महिलांचा समावेश जास्त असून 27 पैकी 4 महिला व 3 पुरुष हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना कसारा प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी एस. एम. बी. टी रुग्णालयात पाठवण्यात आले.

# नवी मुंबईत साडेतीन कोटींचा गुटखा जप्त

### चार आरोपी अटकेत



■ **नवी मुंबई**

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला तब्बल ३ कोटी ७७ लाख २८ हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केला आहे. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

नशा मुक्त नवी मुंबई हे उद्दिष्ट ठेवणे नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शखाली पोलीस विभाग काम करत आहे. त्याच अनुशंघाने नशेचे पदार्थ पुरवठादार यांच्यावर विशेष लक्ष ठेवल्याने अनेक गुन्हेगारांना तुरूगाची हवा खावी लागली आहे. अशीच धडाकेबाज कारवाई नुकतीच करण्यात आली आहे.

# शहापूरमध्ये तीन सख्ख्या बहिणींचा विषबाधेने मृत्यू

### नातेवाईकांनी व्यक्त केला संशय

प्रतिनिधी

■ **शहापूर**

शहापूरमध्ये तीन लहान बहीणींचा विषबाधेमुळे मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण कुटुंबात शोकाकूल वातावरण आहे. दरम्यान मुलींच्या मृत्यूप्रकरणी नातेवाईकांनी संशय व्यक्त केला आहे.



अन्नातून विषबाधा झाल्याने तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शहापूर तालुक्यातील आस्नोली येथे घडली. काव्या(10), दिव्या(8) व गार्गी भेरे (5) अशी तीन मुलींची नावे असून त्यांना सोमवारी अन्नातून विषबाधा झाली होती. यापैकी दोघींवर नायर व एकीवर एसएमबीटी येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. याबाबत किन्हवली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पण हा मृत्यू नैसर्गिक नसून घातपात असावा असा संशय मुलींच्या नातेवाईकांनी व्यक्त केला आहे.

शहापुर लगत असलेल्या चेरपोली येथील संदीप भेरे यांची पत्नी संध्या तीन मुलींसह गेल्या आठ महिन्यांपासून तालुक्यातील आस्नोली येथे तिच्या माहेरी राहत होती. सोमवारी 21 जुलै रोजी काव्या, दिव्या व गार्गी या तिघींना पोटदुखी व उलट्यांचा त्रास होऊ लागल्याने मुलींच्या आईने आस्नोली येथील खासगी डॉक्टर व नंतर शहापुर उपजिल्हारुग्णालयात दाखल केले. मात्र तिघींची प्रकृती चिंताजनक असल्याने मुंबईच्या नायर व घोटी येथील एसएमबीटी या रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु मृत्यूशी झुंज सुरू असताना त्या तिघींवर काळाने झडप घातली. उपचारादरम्यान यामधील काव्या व गार्गी चा गुरुवारी तर दिव्याचा शुक्रवारी सकाळी दुर्दैवी मृत्यू झाला. या धक्कादायक घटनेमुळे तालुक्यात चर्चांना उधाण आले असून तर्कवितर्क केले जात आहेत. किन्हवली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून नातेवाईकांनी संशय व्यक्त केल्याने शवविच्छेदनाच्या अहवालानंतरच चित्र स्पष्ट होईल अशी माहिती किन्हवली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खैरनार यांनी दिली.

# बदलापूरमध्ये पावसाची दमदार हजेरी

### बारवी धरणात 81 टक्क्यांवर पाणीसाठा

■ **बदलापूर**

बदलापूरमध्ये मागील आठवड्यापासून शांत झालेल्या पावसाने पुन्हा एकदा दमदार हजेरी लावली आहे. या आठवड्यात पावसाच्या रिमझिम सरी बरोबर एखादी मोठी सर पडत होती.पण गुरुवारी मध्यरात्रीपासून बदलापूरमध्ये पावसाने जोर पकडला आहे. ठाणे जिल्ह्याची तहान भागवणाऱ्या बारावी धरणात ८१ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.

अंबरनाथ, बदलापूरमध्ये शुक्रवारी सकाळपासून पावसाने दमदार हजेरी लावली आहे. मे, जून, जुलै महिन्यात काही अंशी चांगला पाऊस झाला आहे. त्यानंतर जुलैमध्ये मागील आठवड्यात पावसाने थोड्या प्रमाणात विश्रांती घेतली होती. रिमझिम सरी बरोबर एखादी मोठी सर येत होती. मात्र गुरुवारी मध्यरात्रीपासून बदलापूरमध्ये जोरात पाऊस पडू लागला आहे. शुक्रवारी सकाळपासून अंबरनाथ, बदलापूरमध्ये संततधार पावसाची सुरुवात झाली आहे. पुढील ३ तासांत मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, ठाणे आणि पुणे जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन हवामान खात्याकडून करण्यात आले आहे. बारवी धरणात ८१ टक्क्यांच्यावर पाणीसाठा उपलब्ध ठाणे जिल्ह्याची तहान भागवणाऱ्या बारवी धरणात ८१ टक्क्यांच्यावर पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. बारवी धरणात सध्या ७२.६० मीटरपैकी ७०.३८ मीटर इतकी उंची पाण्याने गाठली आहे. तर धरणात २७५.६५ घनमीटर इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षात २५ जुलै रोजी ६०.९९ टक्के इतका पाणी साठा होता. गेल्या सहा वर्षांच्या तुलनेत यंदा बारवी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झालेला आहे. यंदा ठाणे जिल्ह्याची पाणी चिंता काही अंशी मिटली आहे. यावर्षी पावसाने विक्रमी हजेरी लावली आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आयुक्त डॉ. शिंदे यांचे आवाहन

प्रतिनिधी

■ **नवी मुंबई**

सन 2025 या वर्षात श्रीगणेशोत्सव हा दि. 27 ऑगस्ट 2025 ते 06 सप्टेंबर 2025 आणि नवरात्रौत्सव हा दि. 22 सप्टेंबर 2025 ते दिनांक 02 ऑक्टोबर 2025 या कालावधीत संपन्न होणार आहे.

त्या अनुषंगाने या उत्सवांचे सुव्यवस्थित आयोजन करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका, पोलीस विभाग, वाहतुक पोलीस विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व नवी मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव / नवरात्रौत्सव मंडळाचे पदधिकारी यांची विशेष बैठक महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झाली.

या बैठकीप्रसंगी उपस्थित 63 गणेशोत्सव/ नवरात्रौत्सव मंडळाचे पदाधिकारी, नवी मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी तसेच पोलीस विभाग, अग्निशमन विभाग, महाराष्ट्र राज्य प्रदूषण



मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी सूचना केल्या. त्या सर्व सूचना लक्षात घेऊन त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

वेळी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी प्लास्टिक व थर्माकोलमुक्त पर्यावरणपूरक, पारंपारिक सजावट करण्याचे तसेच प्रतिष्ठापना करावयाच्या सार्वजनिक तसेच घरगुती श्रीगणेशमूर्तीही पर्यावरणपूरक असाव्यात असे उपस्थितीतांना आवाहन केले.

श्रीगणेशोत्सव व नवरात्रौत्सव दरम्यान ध्वनीप्रदूषण होणार नाही व त्याचा नागरिकांना तसेच शाळेतील मुलांना त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असेही सूचित करण्यात आले.

गतवर्षी ज्या मंडळांनी परवाना घेतला असेल तो 05 वर्षांकरिता असणार आहे. त्यामुळे यावर्षी सदर मंडळांनी अग्निशमन, पोलीस व वाहतुक पोलीस विभागाकडून ना हरकत दाखला प्राप्त करुन घेणे बंधनकारक असल्याचे सूचित करण्यात आले.

# मराठी तरुणीला मारहाण करणाऱ्या गोकुळचा मुक्काम तुरुंगातच

### 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी

प्रतिनिधी

■ **कल्याण**

कल्याणमध्ये एका मराठी तरुणीला एका परप्रांतीय व्यक्तीकडून अमानुष मारहाण करण्यात आली. या घटनेचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या मारहाणीमध्ये तरुणीला गंभीर दुखापत झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी गोकुळ झा याला अटक केली आहे. गोकुळ झा आणि त्याचा भाऊ रणजीत झा या दोघांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

कल्याणमधील मराठी तरुणी मारहाण प्रकरणामधील आरोपी गोकुळ



झा आणि रणजीत झा यांना कल्याण सत्र न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. मुख्य आरोपीवर मानपाडा येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. एका व्यक्तीवर जीवघेणा हल्ला प्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात मुख्य आरोपी फरार असल्याची माहिती समोर आली आहे.

# जेष्ठ महिलांसह तरुणींनी केला नववधूच्या वेशात 'रॅम्प वॉक'

### विविध राज्यांच्या विवाहसंस्कृतीचे दर्शन

### "ऑनलाइन नवरा नको गं बाई..." विषयावर प्रबोधन व्याख्यान संपन्न




प्रतिनिधी

■ **वाशी**

सध्याच्या बदलत्या सामाजिक संरचनेत ऑनलाइन विवाहसंस्थेमध्ये वाढत चाललेली फसवणूक, खोट्या ओळखी आणि गुन्हेगारी प्रवृत्ती यावर जनजागृती करणारा "ऑनलाइन नवरा नको गं बाई..." हा प्रबोधनात्मक कार्यक्रम वाशी येथील साहित्य मंदिर सभागृहात नुकताच पार पडला. तसेच पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देत, देशातील विविध राज्यांतील विवाहसंस्कृती आणि नववधूंच्या वेशभूषेचे सजीव दर्शन घडविणाऱ्या एका वैविध्यपूर्ण फॅशन शोचे नुकतेच उत्साही आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात तरुणींप्रमाणेच जेष्ठ महिलांनीही नववधूच्या वेशात रॅम्प वॉक करत उपस्थितांची मनं जिंकली. "नेत्रा एंटरप्रायझेसच्या "वुई मुक्ता" या बहुउद्देशीय व्यासपीठा अंतर्गत व स्विफ्ट डिटेक्टिव्ह अॅन्ड इन्व्हेस्टिगेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून प्रिया काकडे (संचालिका, स्विफ्ट डिटेक्टिव्ह अँड इन्व्हेस्टिगेशन्स) यांनी महिलांना प्रत्यक्ष उदाहरणांसह अत्यंत मोलाचं मार्गदर्शन केलं. पारंपरिक नववधू वेशभूषेच्या माध्यमातून विवाहसंस्कृतीतील सौंदर्य, विविधता आणि सुरक्षिततेचा संदेश या कार्यक्रमात देण्यात आला.

प्रिया काकडे यांनी आपल्या भाषणात काही अलीकडील घटनांचे उदाहरण देत महिलांना सावधगिरीचा सल्ला दिला. पुण्यातील एका तरुण आयटी इंजिनीअर महिलेला ऑनलाईन मॅट्रिमोनियल साईटवरून ओळख झालेल्या युवकाने लग्नाच्या नंतर अवघ्या काही महिन्यांत १६ ते १७ लाखांचा चुना लावून फरार झाल्याचा धक्कादायक प्रकार त्यांनी उलगडून दाखवला. तर दुसऱ्या घटनेत, शिक्षणासाठी पुण्यात राहणाऱ्या एका तरुणीने एका ७५ वर्षीय वृद्धाशी 'शुगर डॅडी' नातं ठेवत त्यांच्याकडून तिच्यासाठी वैयक्तिक खर्च करू लागल्याने तसेच प्रॉपर्टी हडप करण्याचा प्रयत्न होऊ लागल्याने त्याची पत्नीच स्विफ्ट डिटेक्टिव्ह एजन्सीकडे मदत मागण्यासाठी आली. याशिवाय, विवाहबाह्य संबंध, घटस्फोटासाठी आवश्यक पुरावे गोळा करणे, आणि सोशल मीडियामुळे वाढणाऱ्या दुराव्याविषयीही त्यांनी सखोल माहिती दिली. या व्याख्यानात प्रिया काकडे यांनी स्पष्ट केलं की, अनेक महिला प्रेम, लग्न किंवा भावनिक सुरक्षेच्या नावाखाली जाळ्यात ओढल्या जात आहेत. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर 90% प्रोफाईल फेक असतात, आणि काही प्रकरणांमध्ये मुलींच्या आर्थिक फसवणुकींसह त्यांची विक्री करण्यापर्यंतची मजल गेली असल्याची उदाहरणंही आहेत.

कार्यक्रमाचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे "नववधू रॅम्प वॉक स्पर्धा", या स्पर्धेची खास गोष्ट म्हणजे वयाच्या बंधनांना फाटा देत अनेक जेष्ठ महिलांनीही नववधूप्रमाणे सजून रॅम्पवर सादरीकरण केले. त्यांच्या पोशाखांमधून त्यांच्या तरुणपणाचा उत्साह आणि विवाहसंस्कारांविषयीचा आदर दिसून येत होता. प्रेक्षकांनीही या फॅशन शोला उदंड प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी महिलांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

या फॅशन शोमध्ये देशातील राजस्थान, गुजरात, केरळ, महाराष्ट्र आदी राज्यांतील तसेच मारवाडी आणि बौद्ध समाजातील नववधू पोशाखांचे सजीव सादरीकरण करण्यात आले. कोणी महाराष्ट्रीय नववधू म्हणून नऊवारी साडी नेसली होती, कोणी राजस्थानी नववधू म्हणून पारंपरिक गोटा-पट्टीने सजलेला घागरा-चोली परिधान केला होता, तर डोक्यावर बांधणी ओढणी घेऊन बोरला आणि झुबे घालून तीने खास राजपुताना थाट दाखवला. गुजराती नववधू म्हणून काही महिलांनी "पानेटर" साडी आणि "घर्चोळया"सह उजव्या खांद्यावरून घेतलेला सिधा पल्लू सादर केला; त्यावर पारंपरिक मोठ्या चूड्या आणि झुमक्यांनी सजलेली रूपं विशेष लक्ष वेधून घेत होती. केरळच्या नववधूने पारंपरिक पांढऱ्या-सोनेरी किनार असलेल्या "कसावू" साडीमध्ये आणि सोनेरी दागिन्यांनी सजून कोमलतेचा प्रतीक ठरलेला अविष्कार सादर केला. मारवाडी वधूच्या सादरीकरणात लाल व जांभळ्या रंगांच्या घागऱ्यांमध्ये झळकलेल्या महिलांनी पारंपरिक ओढणीने चेहरा अर्धा झाकून, गहन दागिन्यांनी सजून, परंपरेचा गौरव राखला. तर बौद्ध समाजातील नववधू म्हणून सहभागी महिलांनी निळ्या किंवा शुभ्र साड्यांमध्ये, साध्या पण आत्मभान दाखवणाऱ्या वेशात, संकल्पनात्मक सौंदर्य आणि शांततेचे प्रतीक बनून रॅम्पवर आत्मविश्वासाने पावले टाकली.

अशा उपक्रमांमुळे विवाहसंस्थेतील आधुनिक गुन्हेगारी प्रवृत्ती ओळखण्यास मदत होते, तसेच महिलांना आत्मरक्षणाचे साधनही मिळते, असा विश्वास कार्यक्रमाच्या आयोजकांनी व्यक्त केला.

# उद्या ठाण्यात जनसुरक्षा कायदा विरोधी सभेचे आयोजन

■ **ठाणे**

मुलभूत अधिकार संघर्ष समिती च्या वतीने टीप टॉप प्लाझा, ठाणे येथे उद्या रविवार 27 जुलै 2025, संध्याकाळी 4 वाजता जनसुरक्षा कायदा विरोधी सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या विषयांवर जनजागृती करण्यासाठी 'फ्रेंड्स ऑफ डेमोक्रसी' आणि 'मूलभूत अधिकार संघर्ष समिती' यांच्या संयुक्त विद्यमाने 'हुकूमशाही तथा जनसुरक्षा कायदा विरोधी सभे'चे आयोजन केले आहे.

यावेळी मार्गदर्शक करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून संजय राऊत, खासदार, राज्यसभा, आमदार जितेंद्र आव्हाड, माजी मंत्री, , कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार ,निवृत्त जस्टीस अभय ठिपसे आदी मान्यवर उपस्थितीत राहणार आहेत. भाजप सरकारची स्वप्नं आणि वास्तवः १०० स्मार्ट शहरे, ५ ट्रिलियन अर्थव्यवस्था, २ कोटी रोजगार, प्रत्येकी १५ लाख रुपयांची स्वप्नं दाखवत सत्तेत आलेल्या भाजपने ११ वर्षांत देशात आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक हुकूमशाही माजवली आहे. या हुकूमशाहीने प्रत्येक नागरिक त्रस्त आहे. प्रश्न विचारणाऱ्यांना पाकिस्तानी, खलिस्तानी, अर्बन नक्षल, देशद्रोही ठरवले जात आहे.

जनसुरक्षा विधेयकः EVM मॅनेजमेंट आणि मतदार याद्यांतील घोळानंतर आता राज्यात जनसुरक्षा विधेयक लागू झाले आहे. त्यामुळे नवीन संकट उभे राहिले आहे. हे विधेयक सामान्य माणसाचा भाजपाच्या निरंकुश सत्तेला विरोध करण्याचा हक्क हिरावून घेत आहे. त्यामुळे सामान्य माणसाचे हक्क धोक्यात आले आहे. असे आयोजक डॉ. कल्पना हजारे, अभिषेक देशपांडे, छाया थोरात, डॉ. विवेक कोरडे यांनी म्हटले आहे.

# बदलापूरमध्ये नदीची चौपाटी पाण्याखाली

### पावसाचा जोर कायम; नदीच्या पातळीत वाढ

■ **बदलापूर**

बदलापूरमध्ये संततधार पडणाऱ्या पावसामुळे उल्हास नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. उल्हास नदीच्या शेजारील चौपाटी परिसर पाण्याखाली गेले आहे. बदलापूर नदी परिसरातील सखल भागात पाणी साचले आहे. बदलापूरमध्ये गुरुवारी मध्यरात्रीपासून पावसाने जोर पकडला आहे. मागील आठवड्यात पावसाने काही अंशी विश्रांती घेतली होती.

अधून मधून रिमझिम सरी बरोबर एखादी पावसाची मोठी सर पडत होती. मात्र शुक्रवारी पावसाने दमदार हजेरी लावली आहे. उल्हास नदीच्या पाणी पातळीत १३ मीटर पर्यंत वाढ झाली. बदलापूर शहर परिसरात आणि आसपासच्या शहरांमध्येही पाऊस जोमाने सुरु आहे. त्यामुळे उल्हास नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. नदीचा चौपाटी परिसर पाण्याखाली गेला असून चौपाटीतील असलेली खेळणी पाण्याखाली गेली आहेत. यावर्षी चौपाटी परिसर पाण्याखाली जाण्याचे अनेक वेळा घडले आहे. उड्डाणपुलाखालील, रेल्वे रुळाच्या खालचा भुयारी मार्गत नाल्याचे पाणी वाहत होते. नागरिकांना जाण्यासाठी हा मार्ग बंद होता. रस्त्यांवर काही ठिकाणी पाणी साचले.

**पश्चिम रेल्वे**

**विद्युत (पॉवर) काम**

सीनियर डीईई/पी/मुंबई सेंट्रल, मुंबई यांनी ई-निविदा क्रमांक: EL-81-784-WA-21 (R) दिनांक 21-07-2025 आमंत्रित केले आहे. काम आणि ठिकाण: चर्चगेट-जळगाव: ट्रॅक मशीन साइडिंगमध्ये TTR (CS)-12 सेट, TTR (FS+CS+CMSC)-8 सेट आणि संबंधित सुविधांचे पुनर्वसन यांच्याशी संबंधित विद्युत (पॉवर) काम. कामाची अंदाजे किंमत: रु. 19,41,822/-. EMD: रु. 38,800/-. तारीख आणि सबमिशनची वेळ: 25.08.2025 पर्यंत, 15:00 तास. उघडण्याची तारीख आणि वेळ: 25.08.2025 रोजी 15:30 वाजता. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०४२५

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**मध्य रेल्वे**

**ई-लिलाव अधिसूचना**

मुंबई विभाग, मध्य रेल्वेने www.ireps.gov.in वर ई-लिलाव लीजिंग मॉड्यूलद्वारे खालील मालमत्ता भाडेपट्ट्याने घेण्यासाठी लिलाव मागवला आहे. इच्छुक बोलीदारांनी ई-लिलाव लीजिंग मॉड्यूलमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे आणि ई-लिलावापूर्वी सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक बोलीदारांना खाली नमूद केलेल्या ई-लिलावाची तपशीलवार माहिती जाणून घेण्यासाठी www.ireps.gov.in वेबसाइटला भेट देण्याचीकरण्यात येते:

| अनु. क्र. | श्रेणी | उप श्रेणी | लिलाव सुरु |
|---|---|---|---|
| १. | जाहिराती | आरडीएन – डिजिटल आणि नॉन डिजिटल | २९.०७.२०२५,०६.०८.२०२५ |
| | | एम ए | २८.०७.२०२५ |
| | | एटीएम | ०६.०८.२०२५ |
| २. | पे आणि पार्किंग | पार्किंग – मिक्स्ड | २५.०७.२०२५,०१.०८.२०२५ ०७.०८.२०२५ |
| ३. | पार्सल | एफएसएलआर १, ४ एफएसएलआर | ३१.०७.२०२५,०५.०८.२०२५ |
| | अन्य माध्यम | रोहा/ कर्जत आणि लोणावळा येथे वेटिंग रूम | ३०.०७.२०२५ |
| | | लोणावळा स्थानक: रिलसेशन मसाज चेअर बसविणे आणि प्रचालन | ०५.०८.२०२५ |
| | | रेल्वे बाउन्ड्रीवर चित्रे/ वॉल पेपर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण, कॉटन ग्रीन ते चेंबूर | २४.०७.२०२५ |
| | | कल्याण ते कसारा विभाग, कल्याण ते कर्जत-खोपोली विभाग, ट्रान्स हार्बर आणि बीएसयू मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण विभाग या मार्गावर उपनगरीय गाड्यांमध्ये उपभोग्य आणि अवास्तव वस्तूंची विक्री. | ०६.०८.२०२५ |
| | | प्रमोशनल किओस्क | २४.०७.२०२५ |

विषय लिलावाच्या संदर्भात पुढील जोड/शुद्धीपत्रक, लॉट/कॅटलॉग मागे घेणे, तारखेतील बदल, वेळ वाढवणे, स्पष्टीकरण इत्यादी काही असल्यास, ते फक्त वेबसाइटवर अपलोड केले जातील. बोलीदारांनी स्वतःला अपडेट ठेवण्यासाठी नियमितपणे वेबसाइटला भेट द्यावी.

डीआरएम (सी) सीएसएमटी

रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है Sai/296

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**घन कचरा व्यवस्थापन**

**महा.अभि./3452 एल दिनांक 25/07/2025**

**विषय:** - एल विभागातील मुख्य रस्त्यांवरील कचरा संकलन केंद्रांच्या ठिकाणी Bin attendants नियुक्त करण्यासाठी एल विभागातील स्थानिक संस्थामार्फत स्वारस्य अभिव्यकतिद्वारे संस्थांची निवड करण्याबाबत.

**स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात**

'एल' विभागातील मुख्य रस्त्यांवरील कचरा संकलन केंद्रांच्या ठिकाणी Bin attendants नियुक्त करण्यासाठी एल विभागातील इच्छुक स्थानिक नोंदणीकृत असणा-या अशासकीय संस्था, बेरोजगार संस्था इ. संस्थेमार्फत Binattendants करण्याकरीता तसेच स्वयंसेवकातर्फे योजना राबविण्याकरीता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| प्रभाग क्र. | कामाचा स्वरूप | इसारा अनामत रक्कम | अर्जाचे शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| एल- 1 | Bin attendants पुरविण्याबाबत | 20000 | रु. 3630/- अधिक 18 टक्के जी. एस. टी. एकूण रु. 4284/- |
| एल-2 | | 20000 | रु. 3630/- अधिक 18 टक्के जी. एस. टी. एकूण रु. 4284/- |

अर्जाचा नमुना 'एल' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे अर्जाचे शुल्क रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. 'बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त' (Municipal Corporation of Greater Mumbai) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर दि. 26.07.2025 ते दि. 28.07.2025 सकाळी 10:30 ते दुपारी 01:30 यावेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक 'एल' विभाग कार्यालय येथे सुचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील. सदर कामासाठी अर्ज व रक्कम भरणे आवश्यक आहे. सदर योजने अंतर्गत या विभागात प्राप्त होणा-या अर्जापैकी पात्र होणा-या संस्थांचे अर्ज एक वर्षासाठी ग्राह्य / वैद्य धरण्यात येईल.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशिल अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी 'एल' विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने 'एल' विभाग कार्यालयात भरलेले अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. 28.07.2025 दुपारी 03:00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-
सहाय्यक अभियंता (घकव्य)
'एल' विभाग

पीआरओ/११२०/जाही/२०२५-२६

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.

# पंढरपुरातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराला गळती

**पंढरपूर :** पंढरपुरातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराला गळती लागली आहे. गुरुवारी (दि.24) दुपारी झालेल्या पावसात मंदिराच्या छताला गळती लागल्याचं दिसून आले आहे. मंदिराच्या संवर्धनाचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असून, बेजबाबदार प्रशासकीय अधिकारी व संबंधित ठेकेदारावर तातडीने कारवाई करावी. अन्यथा आंदोलन करू, असा इशारा महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी दिला. गणेश अंकुशराव हे मंदिरात दर्शनासाठी गेले असताना संपूर्ण मंदिर गळत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावेळी त्यांनी या घटनेचे छायाचित्रे काढली, व्हिडिओ काढले असून, मंदिर समितीच्या मंदिर संवर्धनाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे दाखवून दिले. हजारो वर्षांपासूनचे पुरातन श्रीविठ्ठल मंदिर असे पावसाळ्यात गळत असल्याचे कधी दिसले नाही. मात्र, मंदिराचे संवर्धनाचे काम झाल्यानंतर असे विदारक चित्र दिसून येत आहे. या संपूर्ण कामात खूप मोठा भ्रष्ट कारभार झालेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.



## म ह त्वा चे

### किरण काळे यांना न्यायालयीन कोठडी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महापालिकेतील रस्त्यांच्या कामातील 400 कोटींचा घोटाळा उघडकीस आणताच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख किरण काळे यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई करण्यात आली. भ्रष्ट अधिकारी आणि स्थानिक राजकारण्यांचा पर्दाफाश केल्याने काळे यांना अटक केली. अटकेनंतर काळे यांना शुक्रवारी येथील सहदिवाणी न्यायाधीश तथा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी ठेवण्याचे आदेश दिले. दरम्यान काळे यांच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ अभिजीत पुप्पाल यांनी जामीनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला. कि-रण काळे यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेतील 776 रस्त्यांच्या सुमारे 400 कोटी रुपयांच्या घोटाळ्याची कागदपत्रे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्याकडे दिली होती. यानंतर खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र देत या प्रकरणावर तात्काळ चौकशी करावी अशी मागणी केली होती. यानंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.

### समुद्राला भरती आल्याने मंदिरापर्यंत उंच लाटा

**गणपतीपुळे :** महाराष्ट्रासह देशभरातली पर्यटकांचं आवडतं पर्यटनस्थळ म्हणजे कोकण, याच कोकणातील अनेक समुद्रकिनाऱ्यांपैकी एक, पर्यटकांच्या आवडीचं ठिकाण म्हणजे गणपतीपुळे. नवरा माझा नवसाचा या चित्रपटानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हे पर्यटनस्थळ, हा समुद्रकिनारा आणि येथील गणपती बाप्पा पोहोचला. त्यामुळे, दरवर्षी हजारो पर्यटक गणपतीमुळेला भेट देतात. मुंबईसह कोकणात गेल्या 4 दिवसांत पावसाने दमदार हजेरी लावल्याने समुद्राला भरती आली असून मुंबईसह कोकणच्या समद्रकिनाऱ्यांनाही अलर्ट देण्यात आला आहे. रत्नागिरीतील समुद्राला सध्या उधाण आलं आहे, समुद्राच्या उधाणाचं पाणी प्रसिद्ध अशा गणपतीपुळे मंदिराच्या भिंतीपर्यंत लागले असून पर्यटक पाण्यात भिजण्याचा आनंद घेत आहेत.

# जालन्यात भरधाव बसने दोन मित्रांना चिरडले

## केदारखेडा-राजूर महामार्गावर रक्ताचा सडा

प्रतिनिधी
■ जालना

हॉलतिकिट घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यासह मित्राच्या दुचाकीला मानव विकासच्या बस चालकाने पाठीमागून जोराची धडक दिली. ही घटना शुक्रवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास केदारखेडा-राजूर महामार्गावर घडली. या भीषण अपघातात दोन्ही मित्रांचा जागीच मृत्यू झाला. यात विकी कैलास जाधव (वय २०, रा. चंदनझिरा, ता. जालना) व भूषण गंगाधर लोखंडे (वय १८, रा. अवघडराव सावंगी) अशी मृतांची नावे आहेत.

भूषण लोखंडे जालना येथील शासकीय आयटीआय कॉलेजचा विद्यार्थी असून, हॉल तिकीट घेण्यासाठी जालन्याकडे जात होता. विकी हा भोकरदन येथून भूषणला घेऊन दुचाकी (एमएच-२१ बीडब्ल्यू-८३३२) वरून जालन्याला जात होते. राजुर येथील मित्र दुसऱ्या गाडीवर तर, विकीच्या गाडीवर अवघडराव सावंगी येथील मित्र भूषण होता. ते जालना येथे शासकीय आयटीआय विद्यालयात हॉल तिकीट घेण्यासाठी जात होते. यादरम्यान, केदारखेडा जवळील रोकोडोबा जिनिंगजवळ पोहोचताच गव्हाण संगमेश्वर येथे विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या मानव विकासच्या बस (एमएच-०६-एस-८७००) ने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात दोघांच्याही डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांच्या डोक्याचा चेंदामेंदा झाल्याने जागीच मृत्यू झाला.



घटनास्थळी रक्ताचा सडा पडला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात होती. अपघाताची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित बस ताब्यात घेण्यात आली असून, बसचा चालक भानुदास पगारे हा अपघातानंतर घटनास्थळावरून फरार झाला आहे. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच शासकीय आयटीआय कॉलेजचे विद्यार्थी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

बसचालकाने पाठमागून दुचाकीला जोराची धडक दिल्यामुळे दोघांचा जागीच मृत्यू झाला. मात्र, ही बस त्यांना चिरडून दोनशे फुटांवर जाऊन थांबली होती. अपघातीतील विकी जाधव हा एकुलता एक होता. या दोन्ही मित्रांचे मृतदेह भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयात हलिविण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नाही

प्रतिनिधी
■ अमरावती

सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले भूषण गवई यांनी निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नसल्याचे म्हटले आहे. मी निवृत्तीनंतर जास्तीत जास्त वेळ दारापूर, अमरावती आणि नागपुरात या आपल्या मूळ गावी घालवणार असल्याचे गवई यांनी म्हटले आहे. सरन्यायाधीश झाल्यानंतर प्रथमच भूषण गवई हे त्यांच्या मूळ गाव असलेल्या दारापुरात पोहोचले होते. यावेळी ते गावकऱ्यांशी बोलत होते.

सरन्यायाधीश भूषण गवळी यांचे गावातील नागरिकांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. सरन्यायाधीशांना पाहण्यासाठी गावकऱ्यांनी देखील मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. गावात पोहोचताच गवई यांनी आपल्या लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच जुन्या घराला देखील भेट दिली. यावेळी सरन्यायाधीश यांनी विकंदर



महाराज, राजे बुवा महाराज, हनुमान मंदिर आदी ठिकाणी भेट देऊन दर्शन घेतले. शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीशांचे अगदी उत्साहात स्वागत केले. तसेच भारत माता की जय, अशा घोषणा दिल्या. एकोप्याने राहणाऱ्या गावाचे प्रतीक म्हणजे दारापूर गाव असल्याचे सरन्यायाधीश यांनी म्हटले आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई यांचे गुरुवारी दुपारी 4 वाजता बेलोरा विमानतळावर आगमन झाले. या वेळी खा. बळवंत वानखडे, आ. रवी राणा, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत आदी उपस्थित होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांचे गुरुवारी दुपारी 4 वाजता बेलोरा विमानतळावर आगमन झाले. या वेळी खा. बळवंत वानखडे, आ. रवी राणा, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत आदी उपस्थित होते. न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे भारताचे 52वे सरन्यायाधीश आहेत.

# कॅंसरग्रस्त महिलेला त्रास देणाऱ्याला चोप

## शिवसैनिकांची महाविद्यालयातील कर्मचाऱ्याला मारहाण

■ बुलढाणा

बुलढाण्यात एका महाविद्यालयातील कर्मचाऱ्याला चांगलाच चोप दिला आहे. सेवानिवृत महिला कर्मचाऱ्याच्या बिलासाठी पैसे मागणाऱ्या कर्मचाऱ्याला शिवसेनेने दणका दिला आहे. सेवानिवृत्त महिला कर्मचारीच्या मुलीला शिवीगाळ करत गैरवर्तन केले, यानंतर शिवसैनिकांनी कर्मचाऱ्याला चांगलाच चोप दिला. हा कर्मचारी मेडिकल बिलासाठी 25 हजार रुपये मागत होता.

बुलढाण्यातील खामगाव येथील नॅशनल एज्युकेशन सोसायटीच्या महिला महाविद्यातील एका कर्मचाऱ्याला शिवसैनिकांनी चांगलाच चोप दिलाय.जयेश नागडा असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे. शिवसेनेच्या महिला पदाधिकाऱ्यांची आई या महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाल्या आहेत. मात्र त्यांचे मेडिकल खर्चाचे बिल काढण्यासाठी जयेश नागडा याने वेळोवेळी मागणी केली. तर सध्या सेवानिवृत महिला कर्मचारी कॅन्सर आजारानं ग्रस्त असून हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत.

# बसची वाट पाहत उभ्या मुलींच्या घोळक्यात भरधाव कार घुसली

## विद्यार्थिनीचा मृत्यू, 5 जण जखमी

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

महाविद्यालय संपल्यानंतर घरी जाण्यासाठी मुली बस थांब्यावर जाऊन उभ्या राहिल्या होत्या. याच वेळी भरधाव वेगाने आलेली कार महाविद्यालयीन तरुणींच्या घोळक्यात घुसली. काही कळण्याच्या घडलेल्या घटनेने तरुणी भांबावून गेल्या होत्या. यात एका विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाला. तर पाच विद्यार्थिनी जखमी झाल्या आहेत. या घटनेने खळबळ उडाली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुकली - परिते मार्गावरील विनंती बस थांब्याजवळ हा अपघात झाला आहे. यात प्रज्ञा दशरथ कांबळे




असे मृत्यूचे नाव आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील भोगावती महाविद्यालय सुटल्यानंतर गुरुवारी सायंकाळी घरी जाण्यासाठी बसथांब्यावर याच महाविद्यालयातील मुली थांबल्या होत्या. त्याचवेळी महाविद्यालयाच्या आवारातून आलेली एक चारचाकी मुलींच्या घोळक्यात घुसली. या थरारक घटनेने प्रत्यक्षदर्शींच्या अंगाचा थरकाप उडाला होता.

दरम्यान कार चालक अल्पवयीन असल्याचे सांगितले जात आहे. तर तो याच महाविद्यालयात शिकत होता व मुलींसोबत त्याची ओळखही होती. त्यामुळे या परिसरात अपघातानंतर उलटसुलट चर्चा सुरू होती. प्रत्यक्षदर्शीच्या मते संबंधित चालक स्टंट करत असल्याचे सांगण्यात आले.

# राधानगरी धरण 99 टक्के भरले; स्वयंचलित दरवाजे उघडण्याची शक्यता

## नागरिकांना सतर्कतेचा इशारा

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

राधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणाची पाणीपातळी ९९ टक्क्यांवर पोहोचली आहे. धरणाची पूर्ण क्षमतेची पातळी ३४७.५० फूट असून, सध्याची पातळी ३४६.९० फूट आहे. म्हणजे केवळ अर्धा फूट पाणी कमी आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास आज (दि.२५) रात्री उशिरा किंवा शनिवारी सकाळपर्यंत धरणाचे स्वयंचलित दरवाजे उघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सध्या धरणातून विजगृहासाठी १५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. दरवाजे उघडल्यास विसर्गात मोठी वाढ होणार आहे. त्यामुळे भोगावती नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

शुक्रवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत ६५ मिमी, तर दुपारी चार वाजेपर्यंतच्या १० तासांत ३७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जूनपासून आतापर्यंत एकूण ३०८३ मिमी पाऊस झाला आहे. धरणात सध्या ८.२४ टीएमसी इतका पाणीसाठा आहे. धरणाच्या पाणीपातळीत वाढ होत असल्याने आणि संभाव्य विसर्ग वाढीमुळे नदी काठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# एसटी आणि टॅंकरचा भीषण अपघात; प्रवासी किरकोळ जखमी

प्रतिनिधी
■ वाशिम

पाचलहून रत्नागिरीकडे जाणारी रत्नागिरी-आजिवली मार्गावरील एसटी बस सौंदळ रेल्वे स्टेशनजवळ (पाटील वाडी बस स्टॉप) अपघातग्रस्त झाली. शुक्रवारी सकाळी 8.10 वाजण्याच्या सुमारास समोरून येणारा भरधाव दूध टॅंकर एसटीवर धडकल्याने हा अपघात झाला. यामध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या अपघातात बसमधील काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. दुधाने भरलेला आयशर ट्रक हा ओणीहून पाचलच्या दिशेने भरधाव वेगात जात होता. यावेळी चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे ट्रकने समोरून येणाऱ्या



एसटी बसला जोरदार धडक दिली. बसमध्ये अंदाजे 30 ते 35 प्रवासी प्रवास करत होते.

अपघातात मोठी हानी टळली असली तरी काही प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. आयशर ट्रकचा चालक आणि क्लिनर यांना जास्त दुखापत झाली असून त्यांना रायपाटण ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातामुळे या मार्गावर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत वाहतूक सुरळीत केली.

# हिंगोली जिल्ह्यात पाच ठिकाणी रास्ता रोको

## माजी आमदार डॉ. संतोष टारफेंचा आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठींबा

प्रतिनिधी
■ हिंगोली

राज्यात शासकिय कार्यालयांमधून अनुसुचीत जमातीच्या ८५ हजार रिक्तजागा तातडीने भरण्यात याव्यात यासह इतर मागण्यांसाठी मागील दहा दिवसांपासून सुरु असलेल्या आंदोलनात पाठींबा दर्शविण्यासाठी समाजाच्या वतीने शुक्रवारी ता. २५ जिल्हाभरात पाच ठिकाणी रास्ता रोको आंदोलन केले. यामुळे जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्था सुमारे एक तास विस्कळीत झाली होती.

यामध्ये राज्यात अनुसुचीत जमातीचे जातप्रमाणपत्र अवैध ठरविल्यामुळे रिक्त झालेल्या पदांवर संबंधित विभागामने कालबध्द



कार्यक्रम राबवून विशेष पदभरती मोहिम घ्यावी, शासकिय व निमशासकिय पदभरतीमध्ये अनुसुचीत जमातीसाठी जातवैधता प्रमाणपत्र बंधनकारक करावे, जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेल्या सशर्त वैधता प्रकरणांची चौकशी करून तातडीने कारवाई करावी यासह इतर मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

यासाठी आदिवासी युवक कल्याण संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. सतीष पाचपुते यांच्यासह संजय गुहाडे, सतिष चिभडे, दशरथ काळे, गोरखनाथ टारफे, सुधाकर पाटणकर, विक्रम मोरे, सोपान धनवे, बालाजी कोकाटे, किरण बर्गे, गोदावरी देशमुखे, आशा भिसे, संगीता पोटे, कोमल पोटे, अश्विनी गायकवाड यांच्यासह विद्यार्थ्यांनी ता. १६ जुलै पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरु केले आहे.

# कंत्राटदारांची थकलेली देयके मिळण्यासाठी ठाकरे शिवसेनेचे कणकवलीत आंदोलन

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची देयके प्रलंबित असल्याने संतप्त झालेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आंदोलन छेडले. भाजप महायुती सरकारवर कंत्राटदारांना आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करत, सांगली येथील तरुण कंत्राटदार हर्षल पाटील याला श्रद्धांजली वाहण्यात आली.

जलजीवन मिशन अंतर्गत




केलेल्या कामांचे पैसे मिळत नसल्याने सांगली येथील तरुण कंत्राटदार हर्षल पाटील यांनी आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कंत्राटदारांमधील असंतोष वाढला आहे. जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाची २४० कोटी रुपये (त्यापैकी कणकवली डिव्हिजनचे १०९ कोटी आणि सावंतवाडी डिव्हिजनचे १११ कोटी रुपये) आणि जलजीवन मिशन योजनेंतर्गत २४.२७ कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत.

# कंत्राटदाराच्या फायद्यासाठी बनावट कागदपत्रांद्वारे अपहार

■ वाशिम

सांगलीमध्ये एका तरुण ठेकेदाराने कर्जाच्या ओझ्याखाली आणि शासनाकडून कामाचे बिल वेळेवर न मिळाल्यामुळे आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना उजेडात आल्यानंतर राज्य सरकारवर विरोधकांनी जोरदार हल्लाबोल केला असून, कंत्राटदारांच्या अडचणींविषयी शासन गंभीर नसल्याचा आरोप केला जात आहे.

या घटनेची झळ अजून ताजी असतानाच वाशिम जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागात मोठा घोटाळा उघड झाला आहे. कंत्राटदाराच्या फायद्यासाठी विभागातील एका अभियंत्याने बनावट कागदपत्रे तयार करून त्यावर सह्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित अभियंत्यावर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाशिम शहरातील विकास कामे वारंवार मुदतवाढ घेऊनही पूर्ण न करणाऱ्या अजयदीप इन्फ्रा या छत्रपती संभाजीनगर येथील कंपनीवर दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकण्याबाबत तक्रार करण्यात आली होती.

# कंत्राटदारांची 12 हजार 500 कोटींची बिले प्रलंबित

## नंदुरबारमधील ठेकेदार आक्रमक

प्रतिनिधी
■ नंदुरबार

प्रशासनातील वेगवेगळ्या विभागांतर्गत निविदा काढून कंत्राटदाराला कामे दिली जात असतात. कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंत्राटदार बिल सादर करत असतात. मात्र मागील काही महिन्यांपासून या कंत्राटदारांना कामांचे बिल मिळालेले नाहीत. साधारण १२ हजार ५०० कोटी रुपयांचे बिले प्रलंबित असल्याचे चित्र नंदुरबार जिल्ह्यात आहे. बिले मिळत नसल्याने कंत्राटदार आक्रमक झाले आहेत.

नंदुरबार जिल्ह्यातील शासकीय ठेकेदार सध्या मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. सार्वजनिक बांधकाम,



आदिवासी विकास, जलजीवन मिशन, ग्रामविकास, नगर विकास, जलसंधारण विभाग आणि जिल्हा नियोजन समितीमार्फत काढलेल्या कामांची जवळपास १२,५०० कोटी रुपयांची देयके जून २०२५ अखेरपर्यंत प्रलंबित आहेत. शासनाने मोठ्या प्रमाणावर कामे काढली असली तरी, त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध न केल्याने ठेकेदार मेटाकुटीला आले आहेत.

# सेवालयाचे मित्र, देणगीदार आणि हितचिंतक यांना आवाहन !

सेवालयाचा पहिला पालक, देणगीदार, हितचिंतक, एक सत्यान्वेषी पत्रकार आणि रवी बापटले यांचा मित्र म्हणून मी आपणा सर्वांना आवाहन करतो की, सेवालयासंदर्भात विविध न्यूज चॅनेलवर, सोशल मिडीयावर येत असलेल्या ब्रेकिंग न्युजमुळे विचलीत, चिंतीत होऊ नका. रवीसह सहाजणांवर बाललैंगिक अत्याचाराच्या आरोपावरून दाखल झालेला हा गुन्हा कोणाच्या तरी कारस्थानाचा भाग आहे, हे मी ठामपणे सांगतो. पोलिस तपासात सगळं सत्य बाहेर येऊन रवीसह सगळेजण या आरोपातून मुक्त होतील, याबद्दल तीळमात्र शंका घेण्याचं कारण नाही. काल रात्री पहिल्यांदा मला ही बातमी समजली तेव्हा रवीशी सविस्तर बोलणं झाल. यात सेवालयाला जाणीवपूर्वक गोवण्यात आलंय.

मी फक्त एकच गोष्ट सांगतो, ज्या मुलीनं सेवालयातील कर्मचारी अनिल महामुनी या कर्मचाऱ्याने बलात्कार केला, असं तक्रारीत म्हटलयं, तो सेवालयाचा कधीच कर्मचारी नव्हता. अनिल महामुनी हा सेवालयात राहात होता. त्याची वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर बाल कल्याण समितीच्या रीतसर परवानगीने त्याने सेवालय सोडलं. त्यानंतर तो एकदाही परत आला नाही. महामुनीने सेवालय सोडून पाच महिने झाल्यानंतर ही तक्रारदार मुलगी समितीच्या आदेशाने सेवालयात आली. महामुनी आणि या मुलीची सेवालयात एकदाही भेट झालेली नाही. यासंबंधीचे सगळे लिखीत पुरावे उपलब्ध आहेत.

समितीच्या परवानगीनेच साधारण दिड महिन्यापूर्वी एका आठवड्यासाठी म्हणून ही मुलगी तिच्या आजी-आजोबाकडे गेली होती. तिला वारंवार फोन करूनही ती येत नव्हती. तेही सेवालयाने बालकल्याण समितीला कळवलं होतं. सतत पाठपुरावा केल्यावर २२ जुलैला ती सेवालयात आली. बालकल्याण समितीकडून रितसर आदेश काढून तिला मुक्त करण्यात आले, ती इथून गेली. २३जुलैला धाराशिव बालकल्याण समितीकडं तिनं तक्रार केली. या समितीच्या लेखी तक्रारीवरून २४ जुलैला रवी बापटले व इतर पाचजणांविरूध्द ढोकी पोलिसात गुन्हा दाखल झाला. हा घटनाक्रम बघितला तर या मुलीला पुढे करून कोणीतरी हा खेळ करतोय हे स्पष्ट होतेय. गुन्हा दाखल झाला तो औसा पोलिसात वर्ग होतोय. सेवालयातून रवी बापटले, रचना बापटले यांना औसा पोलिस घेऊन गेले. पुढे पोलीस तपासात सत्य समोर येईलच.

सेवालयावर, रवीच्या कामावर प्रेम करणारे हजारो लोक महाराष्ट्रातच नाही तर देश-विदेशात आहेत. त्यांना मी एवढंच सांगतो, तुमचा सेवालयावरचा विश्वास अजिबात डळमळीत होऊ देऊ नका... रवीवर प्रेम करणारे जसे आहेत, तसे त्यांचा द्वेष करणारे मुठभर लोकही आहेत. ते अशा ब्रेकिंग न्यूजची वाटच बघत होते... मला याची चिंता नाही. खोट्या आरोपाने कोणी बदनाम होत नाही.

मी पुन्हा सांगतो... काही काळ वाट बघा. रवी या अग्निदिव्यातून अधिक उजळून बाहेर येतील आणि हे सर्व कट-कारस्थान करणारे लोक समाजासमोर येतील, याची मला खात्री आहे.

- महारुद्रा मंगनाळे
ज्येष्ठ पत्रकार
लातूर

**जाहीर सूचना**

सर्व जनतेला माझ्या अशिलांच्या वतीने सूचना देण्यात येत आहे की श्री. दीपक रामचंद्र मयेकर आणि श्रीमती दिव्या दीपक मयेकर हे सदनिका क्र. २०२, २ रा मजला, ए विंग, हरिकृपा कॉ-ऑप. हौ. सोसायटी लि., बिल्डींग क्र. ए मोरया नगर, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), जिल्हा पालघर ४०१३०५ ज्याचे ३१० चौ. फू. म्हणजेच २८.८१० चौ. मी. बिल्ट अप मोजमाप आहे, सर्वे क्र. २४७/१ असून माझे अशील नमूद करतात की भदान बिल्डर्स आणि प्रवीण प्रभाकर पाठारे आणि प्रीती प्रवीण पाठारे ह्यांच्या दरम्यान असलेला पहिला नोंदणीकृत करार दि. २६/१२/१९८३ हरवला होता. त्यानंतर प्रवीण प्रभाकर पाठारे आणि प्रीती प्रवीण पाठारे ह्यांनी नमूद सदनिका हेमलता आर पतंगे ह्यांना नोंदणीकृत करार दिनांकित २८.०५.१९८६ अनुसार विकली आणि हेमलता आर पतंगे ह्यांनी नमूद सदनिका पी.ओ.ए. धारक त्यांचा मुलगा श्री. सचिन रत्नाकर पतंगे ह्याने नमूद सदनिका सुधा जगदीश दोशी ह्यांना नोंदणीकृत करार दिनांकित २८/०६/२००५ अनुसार विकली आणि सुधा जगदीश दोशी ह्यांचे १४/०५/२००७ रोजी मुंबई येथे त्यांचे पती श्री. जगदीश जे दोशी आणि दोन मुले १) श्री. विरल जगदीश दोशी आणि २) मिहीर जगदीश दोशी ह्यांना मागे ठेवून निधन झाले असून दोन्ही नमूद कायदेशीर वारसांनी नमूद सदनिका मिहीर जगदीश दोशी ह्यांच्या नावे हस्तांतरित केली आहे आणि मिहीर जगदीश दोशी ह्यांनी नमूद सदनिका नोंदणीकृत भेटपत्र करार दिनांकित १५/१२/२०१२ अनुसार श्री. विलास गंगाराम काळे ह्यांना भेट केली. त्यानंतर विलास गंगाराम काळे यांनी नमूद सदनिका संयुक्तपणे (१) श्री. दीपक रामचंद्र मयेकर (२) श्रीमती दिव्या दीपक मयेकर यांना दिनांक ०६/०६/२०१७ रोजी नोंदणीकृत कराराद्वारे विकली आणि आता माझे अशिल उपरोक्त सदनिका संयुक्तपणे (१) श्री. केतन भागोजी शेडगे (२) श्रीमती कार्तिकी केतन शेडगे आणि संबंधित वित्त कंपनी/बँकेकडून कर्ज घेणाऱ्या खरेदीदारांना विकण्यास इच्छुक आहेत, जर कोणत्याही व्यक्तीला पहिला करार आढळला आणि जर वरील मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांना आणि इतर कोणत्याही व्यक्ती/व्यक्ती/दावेदारांना वरील विक्री करार आणि कर्ज प्रक्रियेबद्दल काही आक्षेप असतील तर सार्वजनिक सूचना मिळाल्यापासून १४ दिवसांच्या आत अरुण कुमार जैन, वकील ह्यांना शॉप नंबर १, मिठबाव वाडी, एसबीआय बँक गार्डनसमोर, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), तालुका - वसई, जिल्हा - पालघर - ४०१३०५ यांच्या कार्यालयाशी संपर्क करावा.

**दिनांक: २६/०७/२०२५**

**सही/-**
**अरुण कुमार जैन, वकील**

## राज्य जुनियर बॅडमिंटन अजिंक्यपद; ठाण्याच्या खेळाडूंचा 'स्मॅश' धमाका

**मुंबई :** नांदेड येथे नुकत्याच पार पडलेल्या योनेक्स सनराईज महाराष्ट्र राज्य जुनियर बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये ठाणे बॅडमिंटन अकादमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करत एकूण ८ पदकांची कमाई केली. या पदकांमध्ये ३ सुवर्ण, ३ रौप्य आणि २ कांस्य पदकांचा समावेश आहे.अंडर १९ मिश्र दुहेरी गटात सर्वेश यादव याने श्रावणी वाळेकर हिच्यासोबत भाग घेत अंतिम फेरीत निधीश मोरे – प्रांजल शिंदे यांचा 21-17, 21-10 असा सरळ सेट्समध्ये पराभव करून सुवर्ण पदक पटकावले. उपांत्य फेरीत त्यांनी यशराज कदम – अनन्या अग्रवाल यांच्यावर 21-12, 21-8 असा विजय मिळवला. तसेच या गटात सनिध्य एकाडे याने कांस्य पदक पटकावले.अंडर १९ बॉईज डबल्स गटात आर्यन आणि अर्जुन बिराजदार या जोडीने उत्तम खेळ करत पुन्हा एकवार सुवर्ण पदक पटकावले आहे. अंतिम फेरीत त्यांनी ओम गवंडी – सनिध्य एकडे या ठाण्याच्याच जोडीचा 19-21, 21-17, 21-8 असा पराभव केला. ओम आणि सनिध्य यांनी रौप्य पदक मिळवले. याच गटात यश ढेंबरे यानेही कांस्य पदक पटकावले.



## अडसूळ ट्रस्ट शालेय बुध्दिबळ स्पर्धेत विराज हावळे, ऋषिकेश लोंढे विजेते



प्रतिनिधी
■ मुंबई

आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ दिनाचे औचित्य साधून आनंदराव अडसूळ चॅरीटेबल ट्रस्ट, नागरिक सहाय्य केंद्र-ज्ञानेश्वर विद्यालय व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे झालेल्या शालेय मुलामुलींच्या विनाशुल्क बुध्दिबळ स्पर्धेत लहान गटात ज्ञानेश्वर विद्यालयाच्या विराज हावळेने तर मोठ्या गटात महिला मंडळ माध्यमिक शाळा-कुर्ल्याच्या ऋषिकेश लोंढेने विजेतेपद पटकाविले. विराज हावळेने वजीर व हत्तीच्या सहाय्याने सुशांत उघडेच्या राजाला शह देत प्रथम क्रमांकावर झेप घेतली. मुख्याध्यापक महेंद्र पाटील व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्या १६ स्पर्धकांना पुरस्कारासह गौरविण्यात आले.

शालेय ७६ खेळाडूंच्या उत्स्फूर्त प्रतिसादात रंगलेल्या बुध्दिबळ स्पर्धेमधील मोठ्या गटात महिला मंडळ शाळेचा ऋषिकेश लोंढे विरुद्ध हशू अडवाणी मेमोरियल स्कूल-गोवंडीचा आरव साहू यामध्ये बुध्दिबळ पटावर विजेतेपदासाठी घनघोर युध्द झाले. अखेर वजीर व उंटाच्या अचूक चाली रचत ऋषिकेशने आरवच्या राजाला कोंडीत पकडले आणि १९ व्या मिनिटाला शरणागतीसाठी भाग पाडले. मोठ्या गटात ऋषिकेश लोंढेने प्रथम, आरव साहूने द्वितीय, फैझ पठाणने तृतीय, यश पोकळेने चतुर्थ आणि लहान गटात विराज हावळेने प्रथम, सुशांत उघडेने द्वितीय, मनवा कदमने तृतीय, सिध्दांत कांबळेने चतुर्थ क्रमांकाचा पुरस्कार जिंकला. मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी व नामवंत फिडे इंस्ट्रक्टर राजाबाबू गजेंगी, क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक आदींचे खेळाडूंना मोफत मार्गदर्शन लाभले. १९ ते २१ जुलै दरम्यान बुध्दिबळाचा उपक्रम पूर्णपणे मोफत साकारल्याबद्दल शिक्षक व पालक वर्गाने आनंदराव अडसूळ चॅरीटेबल ट्रस्ट, नागरिक सहाय्य केंद्र व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीच्या सेवाभावी कार्याचे विशेष कौतुक केले.



**मुंबई : विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी जाऊन शिंदे शिवसेना महिलाआघाडीतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. गोऱ्हे यांना शुभेच्छा देण्यासाठी शिवसेना संपर्कप्रमुख पूजा रावेतकर, सह संपर्कप्रमुख सुदर्शना त्रिगुणाईत, शहर प्रमुख सुरेखा पाटील उपस्थित होत्या.**


## महिला बुद्धिबळात आम्हीच जगज्जेते...
# भारताच्या दोन लेकींत आज जेतेपदाची लढत

### दिव्या आणि कोनेरूत अंतिम झुंज

वृत्तसंस्था
■ बटुमी

मराठमोळी दिव्या देशमुख आणि 'बुद्धिबळ क्वीन' कोनेरू हम्पीने क्रीडा क्षेत्रात भीमपराक्रम करीत भारताचे नाव उज्वल करणारी कामगिरी केली आहे. जॉर्जियात खेळलेल्या जाणाऱ्या फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत दिव्यपाठोपाठ कोनेरू हम्पीने आपल्या चिनी प्रतिस्पर्ध्याला पराभूत करीत अंतिम फेरी गाठली. आता उद्या शनिवारपासून होणाऱ्या महिला जगगजेत्यासाठीच्या फायनलमध्ये सर्वकाही भारतीय असा आनंदी मामला असेल. दिव्या आणि कोनेरू यांच्यापैकी कुणीही जिंकले तरी फिडेचे जागतिक महिला विश्वविजेतेपद भारताकडे येणार आहे.

काही वर्षांपासून जागतिक महिला बुद्धिबळात भारताचा झेंडा फडकावण्यात मोलाची कामगिरी बजावलेल्या कोनेरू हम्पीने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली. तिने बुद्धिबळ वर्ल्ड कप स्पर्धेच्या उपांत्य फेरीत कमालीच्या दडपणाखाली; तसेच प्रतिकूल परिस्थितीत खेळ उंचावून अव्वल मानांकित चीनच्या लेई तिंगजिए हिचा टायब्रेकमध्ये ५-३ असा पराभव केला आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यामुळे आता दिव्या देशमुख आणि हम्पी यांच्यात विजेतेपदाची लढत रंगणार आणि महिलांच्या वर्ल्ड कप स्पर्धेत भारताचीच खेळाडू सम्राज्ञी होणार हे निश्चित झाले आहे. अंतिम लढतीला शनिवारपासून सुरुवात होईल.



**तज्ज्ञाचा होरा चुकीचा ठरवत हम्पीचा विजय**

बटुमी (जॉर्जिया) येथील या स्पर्धेत उपांत्य फेरीचा टप्पा सुरू झाला तो भारत वि. चीन असा. त्या वेळी कॅंडिडेटमधील तीन स्थानांसाठी स्पर्धा होती. अनेक बुद्धिबळ तज्ज्ञांना चीनचे पारडे जाणवत होते. मात्र, दिव्याने तॅन झाँगयी हिचे आव्हान संपवले. त्यापाठोपाठ हम्पीने लेई तिंगजिए हिचे. टायब्रेकमधील १५ मिनिटांचे दोन डाव बरोबरीत सुटले. त्यानंतर दहा मिनिटांच्या टायब्रेकमधील पहिला डाव हम्पीने गमावला. मात्र हम्पीने त्यानंतर खेळाची शैली बदलत चित्र पार बदलले. तिने दहा मिनिटांच्या टायब्रेकचा दुसरा डाव जिंकला आणि त्यानंतरचे पाच मिनिटांच्या टायब्रेकचे दोन डाव जिंकले. त्यातही काळे मोहरे असताना तिने प्रतिस्पर्धीस आक्रमणाची संधीही दिली नाही.

## व्यावसायिक मार्गांच्या ठिकाणी आस्थापनांच्या वाहनतळांचा गैरवापर झाल्यास दंडात्मक कारवाई

### पालिका आयुक्त गगराणी यांचे निर्देश

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील कोणत्याही बाबींसंदर्भात नागरिकांच्या तक्रारी असतील तर त्यांना त्या तक्रारीची सद्यस्थिती सहज जाणून घेता येईल, अशी व्यवस्था असावी. तसेच, नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करण्यास संबंधित अधिकाऱ्यांनी प्राधान्य द्यावे. मुंबईतील सुलभ वाहतूक आणि नागरिकांच्या मार्गक्रमणात अडथळा निर्माण करणारी बेवारस वाहने आणि भंगार / टाकाऊ साहित्य तत्काळ निष्कासित करावे. व्यावसायिक मार्गांच्या (कमर्शियल स्ट्रीट) ठिकाणी असलेल्या आस्थापनांना तळमजल्यात वाहनतळ परवाना देण्यात आला असूनही त्या जागेचा वापर इतर कारणांसाठी केला जात असल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी अकस्मात भेटी देऊन तत्काळ आणि कठोर कारवाई करावी, असे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. तसेच, १ ऑक्टोबर २०२५ पासून केल्या जाणाऱ्या रस्ते कॉंक्रिटीकरणासंबंधी नागरिकांसाठी आगाऊ स्वरुपात म्हणजे १५ ऑगस्ट २०२५ रोजी माहिती सार्वजनिक करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले प्राणिसंग्रहालय आणि वनस्पती उद्यान (भायखळा) येथे पार पडलेल्या बैठकीत गगराणी यांनी हे निर्देश दिले.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, सह आयुक्त (दक्षता) डॉ. गंगाधरण डी. यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तसेचसह आयुक्त, उपायुक्त, संचालक, सहायक आयुक्त, विभाग प्रमुख, खाते प्रमुख आदी या बैठकीस उपस्थित होते. तक्रार निवारणाची व्यवस्था नागरिकांसाठी सुलभ, सुरळीत असायला हवी. त्यांना तक्रारींची सद्यस्थिती जाणून घेता येईल, अशी व्यवस्था करावी. तसेच, नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करावे., १ ऑक्टोबर २०२५ पासून केल्या जाणाऱ्या रस्ते कॉंक्रिटीकरणासंबंधी नागरिकांसाठी आगाऊ स्वरुपात म्हणजे १५ ऑगस्ट २०२५ रोजी माहिती सार्वजनिक करण्यात येईल., रस्त्यांची कामे झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव रस्ते नव्याने खोदले जाऊ नयेत. तसेच, रस्ते खोदण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी परवानगी देऊ नये. सध्या अस्तित्वात असलेले आणि उत्तम स्थितीत असलेले पदपथ तोडू नयेत.,यंदाच्या पावसाळ्यात पाणी साचण्याची काही ठिकाणे समोर आली आहेत. त्याठिकाणी त्वरित योग्य उपाययोजना कराव्यात., न्यायालयांच्या निर्देशांनुसार, धोकादायक इमारती निष्कासित करण्यासाठी कारवाई करावी.असे निर्देश यावेळी आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले.

## अणुशक्तीनगर तालुका क्रीडा संकुल उभारणीच्या प्रक्रियेस गती द्या!

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश



प्रतिनिधी
■ मुंबई

अणुशक्तीनगर येथे म्युनिसिपल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससाठी आरक्षित असलेल्या १०,३३३.९१ चौ.मी. क्षेत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करून स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या कामास गती द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.अणुशक्तीनगर येथे म्युनिसिपल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारणेबाबत तसेच अल्पसंख्याक विकास विभागाच्या विविध समस्यांबाबत मंत्रालयात बैठक पार पडली . यावेळी ते बोलत होते. बैठकीस क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, माजी मंत्री नवाब मलिक, आमदार सना मलिक यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, मुंबई शहरात क्रीडापटूंना दर्जेदार क्रीडा सुविधा व प्रशिक्षण देण्यास हे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स महत्वाचे ठरणार आहे. संबंधित भूखंड हा म्युनिसिपल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससाठी आरक्षित असल्याने, यापूर्वी त्या जागेसंदर्भात दि चिल्ड्रन एड सोसायटीसोबत असलेले भाडेकरार संपुष्टात आणावे. यासंदर्भात महसूल विभागाशी ही समन्वय साधून सदर भूखंड हा महानगरपालिकेकडे क्रीडा संकुल उभारणीसाठी हस्तांतरित करावा. तसेच या जागेवर अतिक्रमण असल्यास ते निष्कासित करण्यात यावे. या क्रीडा संकुलात अद्ययावत सुविधांसह क्रीडा संकुल उभारावे यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव व विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख,महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव,आयुक्त नयना गुंडे, सह आयुक्त राहुल मोरे, क्रीडा आयुक्त शीतल तेली, उपसचिव सुनील पांढरे, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, उपाध्यक्ष जावेद शेख, अल्पसंख्याक विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ग.पी.मगदम यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

**मुलींसाठी अभियांत्रिकी महाविद्यालय**

मौजे अनिक, चेंबूर येथे शैक्षणिक संस्थेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर अल्पसंख्याक मुलींसाठी अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने कार्यवाही करण्याचे निर्देशही यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. महाविद्यालय निर्मितीनंतर आवश्यक शैक्षणिक पदांची निर्मिती, पदभरती, देखभाल दुरूस्ती याचीही तरतूद करण्यात यावी. तसेच छत्रपती संभाजीनगर येथे असलेले अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे कार्यालय पूर्ण क्षमतेने सुरू करावे. मान्यता असलेल्या ११ पदांची भरती तत्काळ करावी.

## मुंबई महानगरपालिकेचा जलशुद्धीकरण प्रकल्प निविदा वादाच्या भोवऱ्यात

### कॉंग्रेसच्या सचिन सावंत यांची चौकशीची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेतील जलशुद्धीकरण प्रकल्प निविदा प्रक्रिया म्हणजे भ्रष्टाचाराचा महाघोटाळा असल्याचा गंभीर आरोप मुंबई कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते सचिन सावंत यांनी काल मुंबई कॉंग्रेसच्या आझाद मैदानातील कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केला. मुंबई कॉंग्रेसच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या "महायुती सरकार मस्त मुंबईकर मात्र त्रस्त" या अभियाना अंतर्गत काल मुंबई कॉंग्रेस कार्यालयात कॉंग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांची पत्रकार परिषद संपन्न झाली.या पत्रकार परिषदेसाठी कॉंग्रेस नेते सचिन सावंत, मुंबई कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस, मा. नगरसेवक मोहसिन हैदर, प्रवक्ते निजामुद्दीन राईन उपस्थित होते

मुंबई महापालिकेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पांतील निविदा प्रक्रियेमध्ये भयानक मोठा भ्रष्टाचार होत असून, ही संपूर्ण यंत्रणा दलालांच्या प्रभावाखाली असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. विशेषतः भांडुप कॉम्प्लेक्स (२००० MLD) व पांजरापूर (९१० MLD) जलशुद्धीकरण प्रकल्पांसंदर्भातील निविदा प्रक्रियेतील धक्कादायक बाबी सार्वजनिक करण्यात आल्या आहेत.

महायुती सरकारच्या काळात मुंबई महापालिका ही भ्रष्टाचाराचा किल्ला बनली असून, महापालिका अधिकाऱ्यांवर सरकारचा दबाव आहे. मंत्रालयात दलालांचा मुक्त वावर असून, कामांचे वाटप आणि ठराव त्यांच्या मर्जीने होतात. अधिकाऱ्यांच्या संगनमताने निविदांमध्ये छेडछाड करून नियम मोडले जातात, असा आरोप करण्यात आला आहे. केंद्रीय दक्षता आयोग व स्पर्धा आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे सर्रास उल्लंघन केले जात आहे. असेही सांगण्यात आले.




**भांडुप जलशुद्धीकरण प्रकल्पात नियमांचे उल्लंघन**

भांडुप येथील २००० MLD क्षमतेच्या प्रकल्पासाठी ४३७६ कोटींची निविदा १० ऑक्टोबर २०२३ रोजी काढण्यात आली. बोलीपूर्व बैठक २६ ऑक्टोबर २०२३ रोजी झाली. मात्र निविदा सहा वेळा पुढे ढकलण्यात आली. सातव्या जोडपत्रकात मूळ पात्रता निकषात बदल करून भारतातीलच अनुभव आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले. यामुळे जागतिक कंपन्यांचे दार बंद करून एका ठराविक कंपनीला लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न झाला आहे. निविदेतील या बदलामुळे केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचे सरळसरळ उल्लंघन झाले असून, यामुळे महापालिकेला कोट्यवधींचे नुकसान झाल्याचा दावा आहे. सदर १६ जुलै २०२५ रोजी या संपूर्ण प्रक्रियेच्या चौकशीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना सविस्तर पत्र पाठवण्यात आले आहे. हे प्रकरण केवळ महापालिकेच्या निधीच्या अपहाराचे नसून, जागतिक स्पर्धेला संपवून भ्रष्ट यंत्रणेला पाठीशी घालण्याचे चिंताजनक लक्षण आहे. असेही सावंत म्हणाले.

## राष्ट्रीय सहकार धोरणाच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात एक नवी क्रांती घडणार

### भाजप गटनेते आ. प्रविण दरेकरांचा विश्वास

प्रतिनिधी
■ मुंबई

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली काल गुरुवारी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर केले. या राष्ट्रीय सहकार धोरणाचे सर्व स्तरातून, विशेषतः सहकार क्षेत्राकडून, महिला आणि युवा पिढीकडून स्वागत केले जात आहे. भाजपा गटनेते व मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर यांनीही या धोरणाचे स्वागत केले असून राष्ट्रीय सहकार धोरणाच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात एक नवी क्रांती घडणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

राष्ट्रीय सहकार धोरणाची वैशिष्ट्ये सांगताना आ. दरेकर म्हणाले की, या राष्ट्रीय सहकार धोरणामुळे देशातील प्रत्येक जिल्ह्यात एक सहकार गाव विकसित केले जाईल. दहा वर्षात सकल राष्ट्रीय उत्पन्नातील सहकार क्षेत्राचा वाटा तिपटीने वाढवला जाईल. राष्ट्रीय सहकार धोरणात पुढील २५ वर्षातील सहकारी क्षेत्राचा वाटचालीचा कृती आराखडा तयार करण्यात आला असून देशातील प्रत्येक गावात सहकारी संस्थांची जाळी उभारली जाणार आहेत. महिला, तरुण यांना केंद्रबिंदू मानून सहकारातून त्यांना सक्षम करण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यांनी राष्ट्रीय सहकार धोरणानुसार राज्याचे सहकार धोरण तयार करण्याची आवश्यकता आहे. सहकारी बँका, साखर कारखाने यांना भरीव मदतीसह सर्व राज्यात सहकाराचा समांतर विकास, शहरातील टॅक्सी चालकांच्या सहकारी संस्था स्थापन करून ही सेवा डिसेंबरपूर्वी सुरू केली जाऊन त्यातून मिळणारे सर्व लाभ टॅक्सी चालकांना मिळणार आहेत. त्यामुळे प्रवासी तसेच टॅक्सी चालकांची पिवळणूक थांबवणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

तसेच केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी केंद्रीय सहकारिता मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण संकल्पना आतापर्यंत मांडल्या, त्याची अंमलबजावणी देशात सुरू आहे. राष्ट्रीय सहकार धोरणाच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात एक नवी क्रांती घडेल आणि आपण सर्वजण त्याचे साक्षीदार, लाभार्थी असू. महाराष्ट्रातील सहकारी बँका यात महत्वाची भूमिका बजावण्यासाठी सज्ज आहेत. या राष्ट्रीय सहकार धोरणाचे मनापासून स्वागत करतो, असेही दरेकर यांनी म्हटले आहे.

## महावितरणकडून मुख्यमंत्री १५० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी

प्रतिनिधी
■ मुंबई

नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी तसेच विविध विभागातील कामांना चालना देण्यासाठी व विभागातील कामे तळागळापर्यंत व अधिक लोकाभिमुख करण्यासाठी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी १५० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमाची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर, महावितरणच्या भांडूप परिमंडलाने नवीन वीज जोडणी, नावात बदल, पत्यात दुरुस्ती, वीजबिल बाबत तक्रार निवारण, वीजपुरवठा खंडित तक्रार निवारण अश्या प्रकारची विविध कामे यशस्वीरीत्या राबविण्यात आली.

कोंकण प्रादेशिक परिक्षेत्राचे सह व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. दिलीप जगदाळे यांनी भांडूप परिमंडलात या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले होते. त्या प्रमाणे, भांडूप परिमंडलाचे, मुख्य अभियंता श्री. संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, दि. २ मे २०२५ ला सुरु झालेल्या या १५० दिवसाचा कृती आराखडा कार्यक्रमात महावितरणच्या भांडूप परिमंडलाने ११,८६२ नवीन वीज जोडणी दिली आहे. २२,७३५ ग्राहकांच्या नावात बदल करण्यात आले आहेत. ४,९८२ ग्राहकांच्या पत्यात दुरुस्ती करण्यात आली आहेत . तर ३४,५६५ ग्राहकांच्या बिलिंग बाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले आहेत. याशिवाय, वीज पुरवठा खंडित होण्याबाबतच्या ८३,९४५ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहेत. २ मे २०२५ ते १० जुलै २०२५ रोजी पर्यंत आपले सरकार पोर्टलवर प्राप्त झालेल्या ३० तक्रारींचे निवारण करण्यात आले असून आपले सरकार पोर्टलवर शून्य तक्रारी शिल्लक आहेत. याशिवाय, पीजी पोर्टलवर प्राप्त झालेल्या ४ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून पीजी पोर्टलवर ही शून्य तक्रारी शिल्लक आहेत. भांडूप परिमंडलचे, मुख्य अभियंता श्री. संजय पाटील म्हणाले की, "महावितरण ही एक ग्राहकाभिमुख कंपनी असून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना सर्वोच्च प्राधान्य देऊन चांगली सेवा देण्याचे लक्ष घेऊन काम करावे".

## पालिकेतील रिक्त शेड्युल्ड पदे भरणार!

### म्युनिसिपल कामगार सेनेची माहिती

प्रतिनिधी
■ मुंबई

पालिकेतील सुमारे ५६ हजार रिक्त पदे टप्प्या-टप्पाने भरण्याची कार्यवाही केली जाईल असे आश्वासन अतिरिक्त आयुक्त डॉ.अश्विनी जोशी यांनी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेच्या वतीने आयोजित केल्या गेलेल्या बैठकीत अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ. संजय कांबळे-बापेरकर यांना दिले.

मुंबई महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त डॉ.अश्विनी जोशी यांच्या दालनात काल बैठक पार पडली. म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेच्या वतीने आयोजित केल्या गेलेल्या सभेत अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ. संजय कांबळे-बापेरकर यांनी कर्मचाऱ्यांचे प्रश्न मांडले.



महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार सफाई खात्यातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच मलःनिसारण, मुख्य मलःनिसारण, गटारे, स्मशान भूमी आदी घाणीशी संबंधित काम करणाऱ्या कामगारांना लाड- पागे समितीच्या शिफारशींअन्वये वारसाहक्क नोकऱ्या दिल्या जाणार आहेत. नविन पेंशन योजना लागू असणार्या कर्मचाऱ्यांचे मागील २ वर्षांपासून रखडलेले देय दावे लवकर निकाली काढण्यासाठी (डी सी-१ दावे) सुधारीत व सोपी नियमावली प्रसारीत करण्याच्या सुचना डॉ. जोशी यांनी दिल्या.

एकाच ठीकाणी राहुन, कर्मचाऱ्यांची पिळवणुक करणाऱ्या सफाई खात्याच्या पी.टी. केस खात्यातील ३ लिपिक व केईएम रुग्णालयात सुमारे २६ वर्षे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याची तात्काळ बदली करण्याचे आदेश झाल्याने, बदली परिपत्रकाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची मागणी मान्य करण्यात आल्याची माहीती डॉ. बापेरकर यांनी दिली. सदर बैठकीस प्रशासनाच्यावतीने उपायुक्त किशोर गांधी, किरण दिघावकर, प्रमुख कामगार अधिकारी सुनिल जांगळे,प्रमुख कर्मचारी अधिकारी शारदा गोसावी व प्रमुख लेखापाल तर युनियनच्या वतीने खजिनदार महेंद्र पवार, मंदार गांवकर उपस्थित होते.



**मुंबई: मुंबईत मागील दोन दिवसापासून जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे अनेक सखल भागात पाणी साचले होते. या पावसातच महानगरपालिकेचे कामगार / कर्मचारी प्रत्यक्ष कार्यस्थळावर अविरत कार्यरत होते. लवकरात लवकर साचलेल्या पाण्याचा निचरा कसा होईल यासाठी त्यांचे प्रयत्न जारी होते. मनुष्य प्रवेशिका (मॅनहोल) विनाअडथळा वाहत्या रहाव्यात यासाठी ते काम करीत होते आवश्यक तिथे संयंत्रांचा वापरही केला जात होता.**

## बेस्टमध्ये तत्काळ नोकर भरती सुरु करावी, बेस्टला सरकारने 10 हजार कोटी द्यावेत

### मागणीसाठी कामगारांचे आंदोलन



प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट कामगार सेनेच्या वतीने काल बेस्ट उपक्रमातील विविध समस्या बाबत वडाळा आगार येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. हजारो कामगारांनी भरपावसात या आंदोलनात सहभाग घेतला होता.

बेस्ट कामगारांचे नेते सुहास सामंत यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात सेवानिवृत्त कामगारांची ग्रॅज्युईटी त्वरीत देण्यात यावी , बेस्टचा स्वमालकीचा बसताफा ३३३७ झालाच पाहिजे, सर्व विभागातील कर्मचाऱ्यांचे प्रमोशन तात्काळ सुरू करा, नवीन नोकरभरती सुरू करा , कामगारांची प्रलंबित थकबाकी प्रदान करा, बेस्टला सरकारने दहा हजार कोटी आर्थिक मदत करावी, बेस्ट मधील लावण्यात आलेल्या अदानी कंपनीचे नवीन स्मार्ट मीटर विरोधात भूमिका जाहीर करावी या मागण्या करण्यात आल्या.माजी आमदार दगडू दादा संकपाळ, आमदार सुनील शिंदे, युनियनचे सरचिटणीस रंजन चौधरी, माजी बेस्ट समिती अध्यक्ष अनिल कोकिळ, .कमलाकर शेनॉय ,ज्येष्ठ समाजसेवक., निवृत बेस्ट अधिकारी वर्गातर्फे धनंजय पवार. बेस्ट कामगार सेनेचे उपाध्यक्ष भास्कर तोरसकर, उमेश सारंग, मनोहर जुन्नरे, या मान्यवर पदाधिकारी वर्गानेही या आंदोलनात सहभाग घेऊन मार्गदर्शन केले.

## वन अधिकाऱ्याच्या घरात दीड कोटींची रोकड

**भुवनेश्वर:** ओडिशाच्या दक्षता विभागाने बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याच्या आरोपावरून एका वन अधिकाऱ्याच्या घरासह सहा ठिकाणी छापे टाकले आहेत.जयपूर वन परिक्षेत्रात कार्यरत असलेले उप-वनक्षेत्रपाल (Deputy Ranger) रामा चंद्र नेपाक यांच्याशी संबंधित ठिकाणांवर टाकलेल्या या धाडीत आतापर्यंत दीड कोटी रुपयांपेक्षा जास्त रोकड, सोन्याची बिस्किटे आणि सोन्याची नाणी जप्त करण्यात आली आहेत. जप्त केलेल्या नोटा इतक्या होत्या की त्या मोजण्यासाठी अधिकाऱ्यांना नोटा मोजण्याचे मशीन मागवावे लागले. दक्षता विभागाला रामा चंद्र नेपाक यांनी त्यांच्या ज्ञात स्रोतांपेक्षा जास्त मालमत्ता जमा केल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे, शुक्रवारी पहाटे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनेक पथकांनी जयपूर आणि भुवनेश्वरमधील सहा ठिकाणी एकाच वेळी कारवाई सुरू केली. ही कारवाई अजूनही सुरू असून बेहिशेबी मालमत्तेचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.



# राजस्थानात प्रार्थना सुरु असताना शाळेचं छत कोसळलं; 7 विद्यार्थ्यांचा मृत्यू

वृत्तसंस्था
जयपूर

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यातील पिपलोदी गावात आज सकाळी शाळेचे छत कोसळले. प्रार्थना सुरू असतानाच प्राथमिक शाळेच्या इमारतीचे छत अचानक कोसळले, ज्यामुळे शाळा परिसरात एकच गोंधळ उडाला. यात सात मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेनंतर शिक्षणमंत्री मदन दिलावर यांनी घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

ढिगाऱ्याखाली अडकलेले सर्व विद्यार्थी इयत्ता सातवीचे असल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी, तसेच बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मुलांना बाहेर काढण्याचे काम सुरू केले. स्थानिक नागरिकही मदतीसाठी पुढे सरसावले. सर्वांनी एकत्र येऊन



ढिगारा हटवला आणि मुलांना बाहेर काढले.

ही दुर्घटना झालावाड जिल्ह्यातील मनोहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शाळेचे छत बऱ्याच काळापासून जीर्ण झाले होते आणि सततच्या मुसळधार पावसामुळे ते कधीही कोसळण्याची भीती व्यक्त केली जात होती. तरीही याकडे दुर्लक्ष करण्यात आले, ज्याचा परिणाम म्हणून निष्पाप मुलांना आपला जीव गमवावा लागला. गंभीर जखमी झालेल्या मुलांना झालावाड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बचाव पथकासोबत गावकरीही ढिगारा हटवण्याच्या कामात पूर्णपणे गुंतले होते.

मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त करत मृत्यू झालेल्या मुलांच्या आत्म्यांना शांती मिळो, अशी प्रार्थना केली. तसेच, त्यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे निर्देशही दिले आहेत.

झालावाड शाळा दुर्घटनेत मुलांच्या मृत्यूबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ट्विटद्वारे मोदी म्हणाले, “ही दुर्घटना अत्यंत दुःखद आहे. या कठीण काळात माझ्या संवेदना पीडित विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांसोबत आहेत. जखमी विद्यार्थी लवकरात लवकर बरे व्हावेत, अशी मी प्रार्थना करतो.” यासोबतच पंतप्रधानांनी सर्वतोपरी मदतीचे आश्वासनही दिले आहे.

## पॅलेस्टाईनला फ्रान्सकडून स्वतंत्र राष्ट्राची मान्यता


# फ्रान्सच्या निर्णयावर इस्रायल, अमेरिकेचा संताप

वृत्तसंस्था
पॅरिस

फ्रान्सने सप्टेंबर 2025 मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेत (UNGA) पॅलेस्टाईनला स्वतंत्र राष्ट्र म्हणून औपचारिक मान्यता देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी गुरुवारी संध्याकाळी ‘X’ (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडियावर ही घोषणा केली.

मॅक्रॉन यांनी पॅलेस्टाईन अथॉरिटीचे अध्यक्ष महमूद अब्बास यांना पत्र पाठवून आपल्या निर्णयाची माहिती दिली. या पत्रात त्यांनी म्हटले की, “मध्यपूर्वेत न्याय आणि शाश्वत शांततेच्या ऐतिहासिक वचनबद्धतेप्रमाणे, मी फ्रान्सकडून पॅलेस्टाईनला मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. मी ही औपचारिक घोषणा संयुक्त राष्ट्र महासभेत पुढील सप्टेंबरमध्ये करणार आहे.”

मॅक्रॉन यांनी हेही स्पष्ट केले की, गाझामधील युद्ध थांबवणे आणि सामान्य नागरिकांचे प्राण वाचवणे हे आत्ता सर्वात महत्त्वाचे आहे. “आपल्याला आता पॅलेस्टाईन राज्याची उभारणी करावी लागेल, त्याची व्यवहार्यता सुनिश्चित करावी लागेल आणि ते इस्रायलला पूर्ण मान्यता देईल व नाश न करता शांतीपूर्ण सहअस्तित्व स्वीकारेल, याची काळजी घ्यावी लागेल,”



असेही त्यांनी लिहिले. इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी फ्रान्सच्या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया दिली. त्यांनी म्हटले, “हा निर्णय दहशतवादाला बक्षीस देतो आणि इस्रायलच्या विनाशासाठी आणखी एक इराणी पिट्ठू निर्माण करू शकतो.” अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनीही तीव्र नाराजी व्यक्त करत हा निर्णय “बेजबाबदार” असल्याचे म्हटले. त्यांनी असेही सांगितले की, “हा निर्णय 7 ऑक्टोबर रोजी झालेल्या हमासच्या हल्ल्याच्या बळींसाठी अपमानास्पद आहे.”

पॅलेस्टाईन अथॉरिटीचे उपाध्यक्ष हुसेन अल-शेख यांनी मॅक्रॉन यांच्या निर्णयाचे स्वागत करत लिहिले की, “फ्रान्सने आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार आमच्या स्वातंत्र्य व आत्मनिर्णयाच्या अधिकाराला पाठिंबा दिला आहे.” हमासनेही मॅक्रॉन यांच्या घोषणेचे समर्थन करत ती “दबलेल्या पॅलेस्टाईन जनतेसाठी न्याय मिळवण्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल” असल्याचे म्हटले.



**अयोध्या :** श्रीरामभक्त, शिवसेना आमदार दिलीपमामा लांडे यांनी श्रावणमास प्रारंभाचे औचित्य साधून, अयोध्या येथे प्रभू श्री रामचंद्राचे दर्शन घेतले आणि मनोभावे पूजा केली. आमदार दिलीपमामा लांडे हे विशेष दर्शनासाठी आज अयोध्येतील राम मंदिरात उपस्थित होते.

# ‘ऑपरेशन सिंदूर’ अजून संपलेलं नाही

## CDS जनरल अनिल चौहान यांचे मोठे विधान

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

भारतीय सैन्याने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारेपाकिस्तानवर जोरदार कारवाई केली. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये युद्धविराम झाला असला तरी, ‘ऑपरेशन सिंदूर’ अजून थांबले नाही. देशाचे सीडीएस जनरल अनिल चौहान यांनी आज याबाबत महत्वाचे अपडेट दिले आहे. ते म्हणाले की ‘ऑपरेशन सिंदूर’ अजूनही सुरू आहे. सैन्याला नेहमीच सतर्क राहावे लागते.

अनिल चव्हाण म्हणाले, आजचे युद्ध पारंपारिक आणि आधुनिक पद्धतींचे मिश्रण आहे. यामध्ये



गतिज (शस्त्रांवर आधारित) आणि गैर-गतिज (माहितींवर आधारित) दोन्ही रणनीतींचा समावेश आहे. हे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीच्या युद्ध तंत्रांचे समन्वय आहे. युद्धासाठी शास्त्र आणि शस्त्र (ज्ञान) दोन्ही आवश्यक आहेत. ऑपरेशन सिंदूर अजूनही थांबलेले नाही. सैन्याने सर्व परिस्थितीत २४x७, ३६५ दिवस तयार असले पाहिजे.

गुरुवारी राज्यसभेत परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह म्हणाले की, २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने दिलेला प्रत्युत्तर म्हणजून ऑपरेशन सिंदूर ७ मे रोजी सुरू करण्यात आले होते. ही कारवाई दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट करणे आणि दहशतवाद्यांना मारणे यावर केंद्रित होती. ऑपरेशन सिंदूर आंतरराष्ट्रीय दबावाखाली सुरू करण्यात आले होते का? असे सरकारला विचारले असता, परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले की, ही भारताची उत्स्फूर्त आणि ठोस प्रतिक्रिया होती. यात आंतरराष्ट्रीय दबाव नव्हता.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने पाकिस्तान आणि पीओकेमध्ये असलेले जैश-ए-मोहम्मद, हिज्बुल मुजाहिदीन आणि लष्कर-ए-तोयबा सारख्या दहशतवादी संघटनांचे ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले आणि १०० हून अधिक दहशतवादी ठार केले. जेव्हा पाकिस्तानने भारतीय लष्करी आणि नागरी लक्ष्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा भारताने पाकिस्तानी हवाई तळ आणि लष्करी तळांवरही हल्ला केला.

चार दिवसांच्या संघर्षानंतर पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी भारतीय लष्करप्रमुखांना युद्धविरामाची विनंती केली. त्यानंतर १० मे रोजी दोन्ही देशांमध्ये युद्धविरामावर सहमती झाली.

पान 1 वरुन...

### मुख्यमंत्र्यांच्या राजधानीत गाठीभेटी...

जागतिक बँकेकडून मदत मागण्यात आली आहे. या तिन्ही प्रकल्पांसाठी वित्तमंत्रालयाने मंजुरी द्यावी, यासाठीचे निर्देश निर्मला सीतारामन यांनी या बैठकीत दिले. या बैठकीला वित्त विभाग सचिव अनुराधा ठाकूर, मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी आणि मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे उपस्थित होत्या. केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांच्या भेटीत विदर्भात एक खतांचा मोठा प्रकल्प उभारण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा केली. नागपूर जिल्ह्यात गेल, फर्टिलायझर विभाग आणि महाराष्ट्र सरकारच्या संयुक्त उपक्रमातून हा 12.7 लाख टनाचा प्रकल्प असणार आहे. सुमारे 10,000 कोटींचा हा प्रकल्प असणार आहे. या प्रकल्पासाठी सबसिडी देण्याची मागणीही करण्यात आली आहे. यासंदर्भातील मंत्रिमंडळ प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना जे. पी. नड्डा यांनी दिल्या. फर्टिलायझर विभागाचे सचिव रजतकुमार मिश्रा यावेळी उपस्थित होते.

### मुंबईत पावसाची संततधार

शहर भागात - १७.८० मिमी, पूर्व उपनगर भागात - ६८.४२ मिमी आणि पश्चिम उपनगरात - ६७.४३ मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात आली. उद्या म्हणजे शनिवारी दुपारी १.२० वाजताच्या सुमारास समुद्रात पुन्हा एकदा मोठी भरती आहे. त्यावेळी समुद्रात ४.६७ मिटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत. तसेच, कुलाबा वेधशाळेने आगामी २४ तासांत शहर आणि उपनगर भागात आकाश ढगाळ राहणार असून जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची आणि ४० ते ५० मिटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे. हवामान खात्याने शनिवारी देखील ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे आज शनिवारी जोरदार वादळी वारे आणि जोरदार पावसाची शक्यता लक्षात घेता शक्यतो समुद्र किनारी जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईत काल कोसळकेल्या संततधार पावसामुळे शहर भागात ५ ठिकाणी, पूर्व उपनगरात - ६ ठिकाणी तर पश्चिम उपनगरात सर्वात जास्त ४ ठिकाणी अशा एकूण १५ ठिकाणी झाडे/ फांद्या यांची पडझड झाल्याच्या घटना घडल्या. तसेच, शहरात - ३ आणि पूर्व उपनगरात १ ठिकाणी अशा एकूण ४ ठिकाणी घराच्या भिंतींची पडझड झाल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच, शहर भागात - ४ ठिकाणी, पूर्व उपनगरात - १ आणि पश्चिम उपनगरात - २ ठिकाणी अशा एकूण ७ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना घडल्या आहेत. मात्र सुदैवाने या घटनांत जीवित हानी झालेली नाही.

### शारीरिक संबंधासाठी सहमतीचं वय १८

मानसिक व शारीरिक अवस्था त्यांना अशा प्रकारच्या निर्णय घेण्यास सक्षम करत नाही. सरकारने हा मुद्दा मांडला की, जर वयोमर्यादा कमी केली गेली, तर यामुळे शोषण करणाऱ्यांना न्याय प्रणालीतील फायद्याचा अवकाश मिळेल, ज्यामुळे त्यांना ‘सहमती’चा बचाव मिळू शकतो. सरकारने खास करून पोक्सो कायदा आणि इतर बाललैंगिक शोषणाविरोधी कायद्यांच्या संदर्भात याची माहिती दिली. सरकारने सांगितले की, या कायद्यांमुळे 18 वर्षाखालील मुलांना लैंगिक शोषणापासून संरक्षण मिळते.

# उल्लू, ऑल्ट बालाजीसह अनेक OTT ॲप्सवर बंदी

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय

नवी दिल्ली

डिजिटल प्लॅटफॉर्मवरील अश्लील आणि असभ्य कंटेटविरोधात केंद्र सरकारने आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई केली आहे. प्रेक्षकांमध्ये वादग्रस्त ठरलेल्या ‘उल्लू’ (ULLU), ‘ऑल्टबालाजी’ (ALTBalaji) यांसारख्या प्रसिद्ध ओटीटी प्लॅटफॉर्मसह अनेक ॲप्स आणि वेबसाईट्सवर बंदी घालण्यात आली आहे. या कारवाईमुळे डिजिटल मनोरंजन विश्वात मोठी खळबळ उडाली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, हे प्लॅटफॉर्म्स सातत्याने अश्लील, असभ्य आणि महिलांचे आक्षेपार्ह चित्रण करणारी सामग्री प्रसारित करत होते. या प्लॅटफॉर्म्सवर कारवाई करण्यासाठी अनेक दिवसांपासून विविध स्तरांवरून मागणी होत होती. अखेर सरकारने यावर कठोर पाऊल उचलले आहे.

डिजिटल प्लॅटफॉर्म्सचे नियमन करण्याच्या आणि ऑनलाइन अश्लील सामग्रीचा प्रसार रोखण्याच्या प्रयत्नांचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे अनेक ओटीटी प्लॅटफॉर्म्सना मोठा धक्का बसला आहे. बंदी घालण्यात आलेल्या प्रमुख ॲप्स आणि वेबसाइट्सची यादी

- **ऑल्टबालाजी (ALTBalaji)**
- **उल्लू (ULLU)**
- **बिग शॉट्स ॲप (Big Shots App)**
- **देसीफ्लिक्स (Desiflix)**
- **बूमेक्स (Boomex)**
- **नवरस लाईट (Navarasa Lite)**
- **गुलाब ॲप (Gulab App)**

# अहमदाबादेत दहावीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

अहमदाबाद

अहमदाबाद शहरातील एका खासगी शाळेत दहावीच्या विद्यार्थिनीने आत्महत्या केल्यानंतर एका दिवसानंतर शुक्रवारी एक व्हिडिओ समोर आला. विद्यार्थिनीने चौथ्या मजल्यावरून उडी मारली. तिच्या पायांना आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर तिला एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. गुरुवारी रात्री उशिरा उपचारादरम्यान विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. मात्र, विद्यार्थिनीच्या आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. विद्यार्थिनीच्या स्कूल बॅग किंवा घरातून कोणतीही सुसाईड नोट सापडलेली नाही. पोलिसांनी विद्यार्थिनीचा मोबाईलही जप्त केला होता. वर्गमित्र, मित्र आणि शाळेतील शिक्षकांचीही चौकशी केली जात आहे.

# बाबा 1 कोटी रुपये द्या, तरच...! 12 वर्षांच्या मुलीची सर्वोच्च न्यायालयात अजबच मागणी

## CJI गवईंनी आईलाच सुनावलं

नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयात एक असा प्रकार घडला, जो पाहून न्यायमूर्तींपासून ते वकिलांपर्यंत सर्वच स्तब्ध झाले. खरे तर, एका 12 वर्षांच्या मुलीच्या कस्टडीसाठी न्यायालयात पती-पत्नीचा वाद सुरू आहे. दरम्यान या मुलीने आपल्या वडिलांसोबत राहण्यासाठी तब्बल 1 कोटी रुपयांची मागणी केली. “मला सोबत ठेवायची इच्छा असेल, तर १ कोटी रुपये द्यावे लागतील,” अशी मागणी मुलीने आपल्या वडिलांकडे केली आहे. मुलीची ही मागणी ऐकून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बीआर गवईही थक्क झाले आणि त्यांनी या संपूर्ण प्रकारावरून, मुलीच्या आईलाच सुनावले.

मुलीने आपल्या वडिलांकडे १ कोटी रुपयांची मागणी करताच, सरन्यायाधीश बीआर गवई संतापले आणि त्यांनी तिच्या आईला फटकारले. सरन्यायाधीश म्हणाले, मुलीचे डोके बिघडवू नका आणि तिला अशा प्रकारे प्रोत्साहन देऊ नका. सरन्यायाधीश पुढे म्हणाले, आई आपल्या मुलीला चुकीच्या मार्गावर गेऊन जात आहे. मुलीच्या डोक्यात चुकीच्या गोष्टी भरवत आहे. तसेच, मुलीने योग्य पद्धतीने विचार करावा आणि समजून घ्यावे. तिने तिच्या वडिलांवर पैशासाठी दबाव आणू नये, अशी न्यायालयाची इच्छा आहे. न्यायालय हे प्रकरण गांभीर्याने घेत आहे. वडिलांच्या वतीने वरिष्ठ वकील पीआर पटवालिया यांनी सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद केला. ते म्हणाले, संबंधित दाम्पत्यात वैवाहिक वाद सुरू होता. यानंतर, जिल्हा न्यायालयाने मुलीची कस्टडी वडिलांना दिली होती. एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, या आदेशाला आईकडून आव्हान देण्यात आले अशून ते सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मात्र, तिने मुलीची कस्टडी वडिलांना दिलेली नाही.

# थायलंड-कंबोडियात दुसऱ्या दिवशीही गोळीबार

## सीमावर्ती भागातून 1 लाख लोकांना बाहेर काढले

वृत्तसंस्था
बँकॉक

थायलंड आणि कंबोडियामध्ये सुरू असलेला संघर्ष दुसऱ्या दिवशीही सुरूच आहे. शुक्रवारी सकाळी दोन्ही देशांच्या सैनिकांनी सीमेवर गोळीबार केला. थायलंड सरकारने शुक्रवारी सांगितले की १ लाखाहून अधिक लोकांना त्यांचे घर सोडण्यास भाग पाडले गेले आहे. आतापर्यंत थायलंडमधील १६ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये १ सैनिक आणि १५ नागरिकांचा समावेश आहे. ४६ लोक जखमी झाले आहेत.

कंबोडियाने आतापर्यंत मृतांचा किंवा जखमींचा अधिकृत आकडा दिलेला नाही. हा वाद ९०० वर्षे जुन्या शिवमंदिरावरून (प्रसत ता

### आतापर्यंत 16 जणांचा मृत्यू



मुएन थॉम) सुरू झाला आहे, जेव्हा थाई सैन्याच्या मते, कंबोडियन सैन्याने थाई लष्करी तळांवर ड्रोन उडवले होते. थायलंडच्या लष्कराने सांगितले की त्यांनी संवादाद्वारे तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला, परंतु जेव्हा ते यशस्वी झाले नाही तेव्हा सकाळी ८:२० वाजता जोरदार गोळीबार सुरू झाला. थायलंड आणि कंबोडियामधील सीमा वाद ११८ वर्षांपूर्वीचा आहे, जो प्रेह विहार मंदिर आणि आजूबाजूच्या परिसरांबाबत आहे. दोन्ही देशांमधील ८१७ किमी लांबीची सीमा १९०७ मध्ये कंबोडिया फ्रेंच राजवटीखाली असताना आखण्यात आली होती. थायलंडने नेहमीच याला विरोध केला कारण नकाशात प्रेह विहार नावाचे ऐतिहासिक मंदिर कंबोडियाचा भाग म्हणून दाखवण्यात आले होते.

यावर दोन्ही देशांमध्ये वाद झाला. १९५९ मध्ये कंबोडियाने हे प्रकरण आंतरराष्ट्रीय न्यायालयात नेले आणि १९६२ मध्ये न्यायालयाने मंदिर कंबोडियाचे असल्याचा निकाल दिला. थायलंडने हे मान्य केले, परंतु आजूबाजूच्या जमिनीवर वाद सुरूच ठेवला.

## एप्रिलनंतर आता पुन्हा एकदा Intel च्या कर्मचाऱ्यांवर संकट

# 25000 कर्मचाऱ्यांची कपात होणार

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

कम्प्युटर चिप्स बनवणारी जगातील आघाडीची आयटी कंपनी इंटेल (Intel) आता आपल्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकणार आहे. रिपोर्ट्सनुसार, इंटेल या वर्षाच्या अखेरीस आपल्या २५,००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकणार असल्याची माहिती समोर आलीये. खरंतर, इंटेल कंपनी गेल्या काही काळापासून खूप कठीण परिस्थितीचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत, कंपनीचा हा निर्णय तिच्या बाजारात पुन्हा एन्ट्री करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

गेल्या वर्षाच्या अखेरीस इंटेलच्या कर्मचाऱ्यांची संख्या १,०८,९०० होती पण आता ही संख्या कमी होईल. २०२५ च्या अखेरीस कर्मचाऱ्यांची ही संख्या ७५,००० पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. अशा





परिस्थितीत, कंपनी आपल्या २५,००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याची तयारी करत आहे. यापूर्वी, इंटेलनं एप्रिल २०२५ मध्ये कंपनीच्या खर्चात कपात करण्याचे संकेत दिले होते आणि १५ टक्के कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकणार असल्याचं म्हटलं होतं.

**इंटेलला मोठा तोटा**

इंटेलनं दुसऱ्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर करताना कर्मचाऱ्यांची ही कपात जाहीर केली आहे. या कालावधीत, कंपनीला २.९ अब्ज डॉलर्सचा निव्वळ तोटा झाला आहे. यामध्ये अलिकडच्या कपातीमुळे झालेले पुनर्रचना शुल्क देखील समाविष्ट आहे. या तिमाहीत कंपनीचा महसूल १२.९ अब्ज डॉलर्सवर स्थिर राहिला. कंपनीनं चालू तिमाहीत १२.६ अब्ज डॉलर्स ते १३.६ अब्ज डॉलर्स दरम्यान महसूल मिळण्याचा अंदाज वर्तवला आहे. सप्टेंबरमध्ये संपणाऱ्या तिमाहीत महसूल १२.६ अब्ज डॉलर्स असू शकतो असा अंदाज वर्तवण्यात आलाय.

“गेले काही महिने सोपे नव्हते हे मला माहिती आहे. कंपनीच्या प्रत्येक स्तरावर संघटना सुव्यवस्थित करण्यासाठी, अधिक कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि जबाबदारी वाढवण्यासाठी आम्ही कठीण परंतु आवश्यक निर्णय घेत आहोत,” असं इंटेलचे सीईओ लिप बू टॅन यांनी कर्मचाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलंय. आता जर्मनी आणि पोलंडमध्ये प्रकल्प उभारण्याची योजना स्थगित केली आहे.